वसई धर्मप्रांत

ऑगस्ट २०२६

# सुवार्ता

स्थापना १५ ऑगस्ट १९५५

श्रद्धेच्या प्रकाशात
संपन्न जीवनासाठी




BASSEIN CATHOLIC
CO-OPERATIVE BANK LTD.
ESTD. 1918
(SCHEDULED BANK)
Celebrate the Festive Season with
Bassein Catholic Bank's Special Offer !
HOME LOAN
@ 7.35%*
PMLN LOAN
@ 9.50%*
CAR LOAN
@ 7.95%*
BDLN LOAN
@ 10.25%*
EDUCATION LOAN
@ 8.50%*
PERSONAL LOAN
@ 12.50%*
SOLAR LOAN
@ 8.25%*
CASH CREDIT / BD
ODCC LOAN
@ 10.00%*
ORNAMENT LOAN
@ 7.95%*
SHOP / GALA LOAN
@ 8.60%*
*T & C Apply
Catholic Bank Building, Papdy Naka, Papdy,
Vasai West, Dist. Palghar - 401 207, Maharashtra.
Hurry! Offer Valid For A Limited Period.
Visit Your Nearest Branch Today!
Toll Free Number :
08069420000
Follow Us.

# सुवार्ता ८५३

स्थापना : १५ ऑगस्ट १९५५

**ऑगस्ट २०२६**

**वर्ष ७२ / अंक १ / मूल्य रु. २०/-**



**संपादक : फा. (डॉ.) जोएल डिकुना**

**संपादक मंडळ :** फा. रॉबर्ट गोन्साल्वीस
फा. डॉमनिक डिआब्रिओ, फा. जॉनी निग्रेल

**सहकार्य :** जॉन गोन्सालविस, हेलन डिसिल्वा
जॉन परेरा, नाझरेथ अथाईत

**मुखपृष्ठ रचना :** सुमित परेरा

**सहाय्य :** फा. अविनाश धोधडे

**रेखाचित्रे :** रॉबर्ट परेरा

**अक्षरजुळणी :** रिटा डाबरे

**कार्यालयीन सहकार्य :** रेजीना अथाईत



**'सुवार्ता' कार्यालय**
जीवन दर्शन केंद्र, गिरीज,
वसई - ४०१ २०१.

**-: मोबाईल नंबर्स :-**

**'सुवार्ता' कार्यालय : 97 02 09 02 31**
**जीवन दर्शन केंद्र : 97 02 09 02 32**

**वेळ** : सकाळी ९.३० ते दुपारी १२.३०
दुपारी २.३० ते संध्या. ५.३०

**रविवार बंद.**

E-mail : suvartavasai@gmail.com
Web. : www.suvarta.org


## अंतर्नाद

**पोपमहोदयांचा ऑगस्ट महिन्यातील प्रार्थना हेतु**

**: शहरी परिसरात शुभवर्तमानाचा प्रसार होण्यासाठी :**



अनेकदा अनोळखीपणा व एकाकीपणाची भावना असते अशा मोठ्या शहरांमध्ये, शुभवर्तमानाचा प्रसार करण्याचे नवनवीन मार्ग शोधावे आणि सर्जनशीलतेने समाज उभारण्याचे अभिनव मार्ग सापडावेत म्हणून आपण प्रार्थना करूया.



खरोखर, आपण एका विनाशकारी काळातून मार्गक्रमण करीत आहोत; अशावेळी संदेष्ट्याचे ते विलाप-वचन आपलेच आहे असे मानू शकतो, 'ह्या देशात सत्य नाही, दया नाही आणि परमेश्वराचे ज्ञानही नाही' (होशेय ४:१). तरीदेखील, या अनिष्टतेच्या लाटेत, परम दयाळू कन्या (मरिया) परमेश्वर आणि मानव ह्यांच्यातील शांतीची मध्यस्थिनी म्हणून इंद्रधनुष्याप्रमाणे आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते.

**- पोप संत दहावे पायस** (१८३५-१९०३-१९१४)

# अ नु क्र म


| | | |
|---|---|---|
| | : अंतर्नाद | ३ |
| बिशप थॉमस डिसोजा (अधिकृत) | : धर्मगुरू : देवाच्या हृदयात उमटलेला अनंत स्वर | ४ |
| संपादक | : संपादकीय: पुन्हा स्वातंत्र्यलढ्याच्या मूळ मूल्यांकडे | ६ |
| जीवन दर्शन केंद्र | : ईशपरिज्ञान अभ्यासक्रम | ७ |
| संकलन | : न्याय व शांती आयोग | ८ |
| संकलन | : संपादकांस पत्रे | ९ |
| रॉबर्ट गोन्साल्वीस | : भारत माझा (ही) देश आहे! | १० |
| स्मिता लोपीस | : भारतीयत्वाचा आत्मा : मानवता | ११ |
| स्टीफन आय. परेरा | : स्वर्गनयन : आपल्या पुनरुत्थानाचे प्रतीक | १२ |
| फा. नितीन डिसोजा | : संत फ्रान्सिस : मुक्त मानव | १३ |
| फा. ओनिल फरोज | : अंधत्व आणि अंत:प्रकाश | १४ |
| प्रा. विन्सेंट परेरा, शैला गोन्सालविस | : मुलाखत : आमदार राजन नाईक (नालासोपारा) | १६ |
| लॉना वाझ, लुकस परेरा | : मुलाखत : आमदार स्नेहा दुबे-पंडित (वसई) | १८ |
| स्टॅन्ली गोन्सालविस | : ए आयच्या जगात, आम्ही अश्मयुगात | २१ |
| जॉन लुईस परेरा | : परिस्थिती : जीवनातील गुरू | २२ |
| स्टीफन एम. परेरा | : अतिवृष्टीने उभी केलेली आव्हाने | २३ |
| डॅनिअल डी. सांबऱ्या | : मासेमारी बंदीत वाढ, एक स्वागतार्ह निर्णय | २४ |
| फा. (डॉ.) शैलेंद्र रॉड्रिग्ज | : गाढव ! | २५ |
| डॉ. सुभाष डिसोजा | : धन्य कुमारी मरियेचे राणीपद | २६ |
| टोनी डाबरे | : धर्मगुरू जीवनाचा वास्तवदर्शी वेध | २७ |
| प्रकाश दांडेकर, सुनंदा गिंभल | : तलासरी मिशन : मानवतेचे तीर्थक्षेत्र | २८ |
| फा. ॲण्ड्र्यू डाबरे | : प्रार्थना : नीतिमान जीवनासाठी | २९ |
| ॲड. अतुल आल्मेडा | : स्वत:ला ओळखा | ३१ |
| युरी घोन्सालविस | : अचूक निदानाची नवी ओळख | ३२ |
| जोसेफ तुस्कानो | : कवितेचा अर्थ | ४७ |
| सिस्टर रिटा डिमेलो | : देवाचा सेवक | ४८ |
| ॲड. बॅरीयन डाबरे | : युवक आणि न्यायव्यवस्था | ४९ |
| पायस फ्रान्सिस मच्याडो | : अवयवदान व देहदान... | ५१ |
| मेल्सिना तुस्कानो-परेरा | : तुम्ही नेमकं काय करत होता? | ५३ |
| सिडनी जस्टीन मोरायस | : नायगाव स्टेशनची सत्तरी | ५४ |
| जसिंता बर्नाड लोपीस | : ताराबाई वर्तक : सजग नेतृत्व | ६९ |
| सबिना बोना गुडिनो | : स्त्रियांची सोड्यालिटी : ९५ वर्षांची वाटचाल | ७१ |
| जॉना वि. फरेरा | : लोक परमेश्वरापासून दुरावत आहेत? | ७३ |
| नोएल डाबरे | : एक 'मंथन मेळावा' | ७५ |
| नागेश राऊत, कॅथरीन फरगोज, जोसेफ डाबरे, ब्रिनल क्रास्टो, बॅप्टिस्ट वाझ, डॉ. सुभाष डिसोजा, वनितामेरी डिमेलो, जेम्स लोपीस, फा. फिलीप वाझ, अँथनी डाबरे | : साद-प्रतिसाद | ७७ |
| विजय रॉड्रिग्ज, फा. ॲण्ड्र्यू रॉड्रिग्ज ज्यो परेरा, फ्रँको डिसोजा, रॉनल्ड ग्रेशियस, ब्रिजदिन लोपीस, उज्ज्वला लेमॉस,जेन मच्याडो,फा.जोएल डिकुना | : कविता | ८२ |
| मेलिसा परेरा, फ्रँक डिमोन्टी, आलेक्स डाबरे, थॉमस परेरा | : माझे मत | ८४ |
| फा. रॉबर्ट डिसोजा | : पुस्तक परिचय : भक्तिमय जीवनाचा मार्ग | ८७ |
| झेविअर डिमेलो | : विशाल विश्वात | ८८ |
| संकलन | : वृत्तविहार | ९१ |
| अनिल घोन्साल्वीस | : 'सुवार्ता' शब्दकोडे - १२ | ९५ |
| धर्मप्रांतीय उपासना आयोग | : उपासना वर्ष दिनदर्शिका : ऑगस्ट २०२६ | ९६ |
| फा. जोएल डिकुना | : मनन-चिंतन-मंथन : न संपणारी गोष्ट | ९७ |

# धर्मगुरू : देवाच्या ह्रदयात उमटलेला अनंत स्वर

चर्चच्या उपासनावर्षातील काही दिवस असे असतात की ते केवळ दिनदर्शिकेवर उमटत नाहीत; तर अंतःकरणातही कोरले जातात. संत जॉन मारी वियानी ह्यांचा स्मृतिदिन असाच एक दिवस! तो दिवस आपल्याला आठवण करून देतो की धर्मगुरुपद ही केवळ एक निवड नाही; ती देवाच्या हृदयातून मानवी इतिहासात पडलेली एक प्रकाशरेषा आहे. त्या प्रकाशात सेवा आहे, बलिदान आहे, त्याग आहे, मौन आहे आणि त्या मौनाच्या तळाशी दडलेले आहे, प्रेम. म्हणून दरवर्षी संत जॉन मारी वियानी ह्यांच्या सणानिमित्त ऑगस्ट महिन्यात संपूर्ण चर्च ‘वियानी संडे’ साजरा करते व धर्मगुरूंच्या देणगीबद्दल परमेश्वराचे आभार मानते आणि पाचारणासाठी उत्कट प्रार्थना करते.

आजच्या काळात ही प्रार्थना अधिक तातडीची झाली आहे. आज जगाने वेग घेतला आहे. शब्द वाढले आहेत, पण ऐकणे कमी झाले आहे; व्यवहार वाढला आहे, पण समर्पण कमी झाले आहे आणि माणूस अधिक दिसतो आहे, पण अधिक समजत नाही. जग तंत्रज्ञानाने प्रगत होत असताना, मानवी हृदय अधिक एकाकी, जखमी आणि अर्थशून्य होत आहे. अशा वेळी पोप लिओ चौदावे ह्यांच्या पहिल्या धर्मपत्रा 'Magnifica Humanitas' (‘मानवतेचे अद्भुत वैभव’) मध्ये मांडलेला संदेश आपल्याला नव्या दिशेने विचार करायला भाग पाडतो. माणूस हा यंत्राचा अंश नाही, तर देवाच्या प्रतिमेचा तेजस्वी अंश आहे. मानवाच्या प्रतिष्ठेचे रक्षण, करुणेची संस्कृती आणि आशेचा मार्ग ह्यासाठी चर्चला अशा धर्मगुरूंची गरज आहे, जे केवळ संस्कारांचे सेवक नसून मानवतेचे संदेष्टे ठरतील. धर्मगुरुपदाचे गूढ ह्याच सत्यावर उभे आहे. माणसाला माणूस म्हणून आणि देवाचे अपत्य म्हणून स्पर्श करते.



संत जॉन मारी वियानी ह्यांचे संपूर्ण जीवन ह्या भविष्यवेधी धर्मगुरुपदाचे मूर्त उदाहरण आहे. त्यांचे जीवन म्हणजे अशाच फुलांचा सुगंध. बाह्य दृष्टीने साधेपणा; अंतःदृष्टीने ज्वाला. कमी शब्द, पण खोल अर्थ. कमी साधन, पण विपुल कृपा. त्यांच्या जीवनात तेज नव्हते असे नाही; परंतु ते तेज त्यांच्या नम्रतेत लपलेल होते. फ्रान्समधील आर्स ह्या छोट्याशा गावात त्यांनी प्रसिद्धीचा नव्हे; तर पवित्रतेचा मार्ग निवडला. त्यांचे सामर्थ्य विद्वत्तेत नव्हते; ते होते त्यांच्या प्रार्थनेत, पश्चात्तापात आणि लोकांवरील अपार प्रेमात. त्यांनी कुमसार साक्रामेंताच्या आसनाला दयेच्या सिंहासनात रूपांतरित केले. त्यांनी लोकांच्या पापांपेक्षा त्यांच्या जखमा पाहिल्या आणि त्यांना देवाच्या प्रेमाचा अनुभव दिला. कुमसाराच्या खिडकीजवळ, वेदीच्या पायथ्याशी आणि प्रार्थनेच्या गुडघ्यांवर त्यांनी एक धर्मग्राम नव्हे; तर संपूर्ण जनसमुदायाचे अंतःकरण घडवले. त्यांच्या जीवनाने शिकवले की पवित्र याजक तोच, जो स्वतःच्या नावाची सावली कमी करून ख्रिस्ताच्या चेहऱ्याला अधिक स्पष्ट करतो. आजच्या धर्मगुरूंच्या सेवेसाठी हीच सर्वांत मोठी शिकवण आहे.

पोप लिओ चौदावे 'Magnifica Humanitas' मध्ये सांगतात की, प्रत्येक मनुष्य हा देवाच्या प्रतिमेत निर्माण झालेला असल्यामुळे त्याचे जीवन अमूल्य आहे. मानवी प्रतिष्ठा ही केवळ सामाजिक किंवा राजकीय संकल्पना नाही; ती देवाने दिलेली पवित्र देणगी आहे. त्यामुळे धर्मगुरूंचे पहिले कार्य म्हणजे प्रत्येक व्यक्तीत देवाचे प्रतिबिंब ओळखणे. धर्मगुरुपद हा गौरवाचा मुकुट नाही; तो झिजण्याचा मुकुट आहे. तो हाती धरायचा दंड नाही; तो खांद्यावर पेलायचा क्रूस आहे. तो अधिकाराचा मंच नाही; तो दयेचा उंबरठा आहे. धर्मगुरूंचे हात अभिषेकासाठी असतात, पण तेच हात रुग्णाच्या कपाळावर करुणेचा स्पर्शही करतात. याजकाचे ओठ क्षमेसाठी उघडतात, पण तेच ओठ तुटलेल्या हृदयासाठी आशेचे शब्दही पेरतात. त्याचे मौनसुद्धा बोलके असते; कारण ते मौन ख्रिस्ताच्या उपस्थितीने भरलेले असते. धर्म, भाषा, जात, आर्थिक स्थिती किंवा सामाजिक ओळख ह्यांच्या पलीकडे जाऊन प्रत्येकाला देवाच्या प्रेमाचा अधिकार आहे. ईश्वरी पाचारणाला होकार देणे म्हणजे अशा मानवतेची सेवा करण्यासाठी स्वतःला पूर्णपणे अर्पण करणे.

आजच्या युवकांसमोर अनेक आकर्षणे आहेत. करिअर, आर्थिक सुरक्षितता, सामाजिक प्रतिष्ठा, प्रसार माध्यमांचा वाढता प्रभाव आणि डिजिटल जगातील आभासी यश ह्यांच्या गर्दीत देवाचा आवाज अनेकदा क्षीण होतो. पण देवाचे आवाहन आजही तितकेच जिवंत आहे. प्रभूची हाक अजूनही अरण्यातून, शेतातून, आणि अंतःकरणाच्या खोल अंधारातून ऐकू येते : ‘पीक विपुल आहे, पण कामकरी थोडे आहेत.’ ही हाक एक साधी सूचना नाही; ती आर्त विनंती आहे. पिकलेली शेते नुसती शांत दिसतात, पण त्या शांततेत एक विलंबलेली गरज असते - कोणीतरी यावे, कोणीतरी कणसे गोळा करावे, कोणीतरी श्रमाला कृपेत बदलावे आणि जेव्हा एखादे हृदय त्या हाकेला प्रतिसाद

देते, तेव्हा इतिहासाच्या माळेत एक नवे फूल उमलते. पण प्रश्न एवढाच आहे की, ते ऐकण्यासाठी स्थिरता, शांतता, प्रार्थना आणि विवेक ह्यांना आपण आपल्या जीवनात स्थान देतो का? प्रत्येक ईश्वरी पाचारणाची सुरुवात देवाच्या या मूक हाकेला दिलेल्या उदार प्रतिसादातून होते. देव अजूनही बोलावतो. त्याची हाक कधी वाऱ्यासारखी हलकी असते, कधी अग्नीप्रमाणे जळती, कधी पाण्यासारखी शांत, तर कधी अश्रूंमध्ये मिसळलेली. पण ती हाक खरी असते. मानवाच्या इतिहासात काही आवाज असे असतात की ते कानांनी ऐकू येत नाहीत; ते आत्म्याला स्पर्श करतात. ते शब्द नसतात, तर तो प्रकाश असतो; आज्ञा नसते, तर आमंत्रण असते. देवाचे आवाहन असेच असते. ते वादळासारखे कोसळत नाही; ते पहाटेच्या दवासारखे अलगद उतरते. जे अंतःकरण शांत असते, त्यालाच त्याचा नाद ऐकू येतो आणि जेव्हा एखादा तरुण त्या हाकेसमोर 'हो' म्हणतो, तेव्हा एका जीवनात नव्हे, तर अनेकांच्या जीवनात आशेची पहाट उगवते.



आज धर्मगुरूंची संख्या कमी होणे ही केवळ आकडेवारीची समस्या नाही; ती विश्वासाच्या संस्कृतीशी निगडित आहे. ज्या कुटुंबांत प्रार्थना संपते, तेथे ईश्वरी हाकेची भूमीही ओसाड होते. ज्या समाजात यशाचे मोजमाप केवळ पैसा, संपत्ती आणि प्रतिष्ठेने केले जाते, तेथे त्यागाचे सौंदर्य लोप पावते. म्हणून प्रत्येक ख्रिस्ती कुटुंब हे पाचारणाची पहिली सेमिनरी आहे; प्रत्येक पॅरिश हे पाचारणासाठी सुपीक भूमी आहे आणि प्रत्येक उपासना ही देवाच्या हाकेला प्रतिसाद देण्याची शाळा आहे.

'Magnifica Humanitasns' पोप लिओ ह्यांचे परिपत्रक आपल्याला आठवण करून देते की, धर्मगुरू हा केवळ व्यवस्थापक किंवा प्रशासक नसतो. तो आशेचा साक्षीदार असतो. तो जखमी मानवतेला ख्रिस्ताच्या करुणेशी जोडणारा पूल असतो. कृत्रिम बुद्धिमत्ता, युद्धे, स्थलांतर, पर्यावरणीय संकट, राजकीय अस्थिरता, स्वार्थी प्रवृत्ती आणि वाढते मानसिक तणाव ह्यांच्या काळात चर्चला अशा धर्मगुरूंची गरज आहे जे लोकांसोबत चालतील, त्यांचे अश्रू पुसतील, त्यांच्या प्रश्नांना ऐकतील आणि सुवार्तेच्या प्रकाशात त्यांना आशेची दिशा दाखवतील.

संत जॉन मारी वियानी ह्यांनी एकदा म्हटले होते, 'धर्मगुरुपद म्हणजे येशूच्या हृदयाचे प्रेम.' ही व्याख्या आजही तितकीच खरी आहे. धर्मगुरूंचे सामर्थ्य त्याच्या अधिकारात नसून त्यांच्या पवित्रतेत आहे. त्यांच्या भाषणात नव्हे, तर त्यांच्या साक्षीत आहे. लोक आज परिपूर्ण धर्मगुरूंच्या शोधात नाहीत; ते प्रामाणिक, नम्र, प्रार्थनाशील आणि करुणामय धर्मगुरूंच्या शोधात आहेत. आजच्या काळात भविष्यवेधी धर्मगुरू म्हणजे अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, गरिबांच्या बाजूने उभे राहणे, सृष्टीचे रक्षण करणे, विभाजनाऐवजी संवाद वाढवणे आणि निराशेच्या वातावरणात आशेची ज्योत पेटवणे. अशा धर्मगुरूंचे जीवनच सुवार्तेचे सर्वात प्रभावी प्रवचन ठरते.

ह्या धर्मगुरूंच्या सणानिमित्ताने आपण स्वतःला काही प्रश्न विचारू या. आपल्या कुटुंबात देवाच्या बोलावण्याला प्रोत्साहन देणारे आध्यात्मिक वातावरण आहे का? कुटुंब ही पाचारणासाठी पाळणाघर आहे. आईची गुडघ्यावरची प्रार्थना, वडिलांची श्रद्धा, घरातील बायबल वाचन, रोजची प्रार्थना, ह्यांची सुपीक मातीत याजकपदाची बीजे अंकुरतात. आपल्या पॅरिशमध्ये युवकांना धर्मगुरूंच्या जीवनाचे सौंदर्य अनुभवायला मिळते का? आपण धर्मगुरूंची केवळ टीका करतो की त्यांच्यासाठी प्रार्थनाही करतो? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे - जर देवाने मला किंवा माझ्या कुटुंबातील एखाद्याला धर्मगुरुपदासाठी बोलावले, तर माझा प्रतिसाद काय असेल?

संत जॉन मारी वियानी ह्यांच्या पवित्र मध्यस्थीने आणि पोप लिओ चौदावे यांच्या 'Magnifica Humanitas' च्या प्रेरणेने आपण अशी चर्च घडवू या जिथे प्रत्येक मानवी व्यक्तीचा सन्मान राखला जाईल, प्रत्येक ईश्वरी पाचारणाला पोषक वातावरण मिळेल आणि प्रत्येक धर्मगुरू ख्रिस्ताच्या करुणामय हृदयाचा जिवंत साक्षीदार बनेल. आज चर्चला अधिक धर्मगुरूंची गरज आहे; पण त्याहून अधिक, तिला पवित्र, भविष्यवेधी, करुणामय आणि मानवतेवर प्रेम करणाऱ्या धर्मगुरूंची गरज आहे. अशा ईश्वरी पाचारणासाठी प्रार्थना करणे, त्यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांना साथ देणे ही प्रत्येक श्रद्धावंताची सामायिक जबाबदारी आहे. 'प्रभू, तुझ्या शेतासाठी कामगार पाठव आणि त्यांना संत जॉन मारी वियानी ह्यांच्यासारखे तुझे हृदय प्रदान कर.'

**+ बिशप थॉमस डिसोजा**

# पुन्हा स्वातंत्र्यलढ्याच्या मूळ मूल्यांकडे

आपला देश परकीय मगरमिठीतून मुक्त व्हावा म्हणून सर्वंकष विकासाच्या संकल्पनेने झपाटलेल्या स्वातंत्र्य सैनिकांनी कोण प्रयत्न केले, काय त्याग केला, किती काबाडकष्ट केले ते व्यक्त करण्यासाठी पुरेसे शब्द नाहीत. काही लोकांनी आपले शिक्षणअर्ध्यावर सोडले आणि ते स्वातंत्र्य लढ्यात उतरले; उच्च विद्याविभूषित माणसांनी नोकरीवर लाथ मारली नि ते स्वातंत्र्य सेनानी बनले; शिकले-सवरलेले वर्षानुवर्षे तुरुंगात खितपत पडले पण त्यांनी माघार घेतली नाही; अतिरथी-महारथी-सव्यसाची माणसे तोफेच्या तोंडी गेली. आज त्या विविध धर्मीय व प्रांतीय त्यागकर्त्यांची नावे हुतात्म्यांच्या यादीत कदाचित नसतील पण अशा देशभक्तांच्या घाम-अश्रू-रक्तामुळे आपला देश चमकत आहे.

**तो मूळ ध्यास**

त्या काळात जातपात-धर्म-वर्ण-वर्ग-भाषा-प्रांत-लिंग असा भेदभाव नव्हता; सारे एकाच ध्येयाने एकवटले, स्वातंत्र्य-समता-बंधुता ह्या एकात्म विचाराने कार्यप्रवृत्त झाले, संघटित नेतृत्वाने सांधले गेले. म्हणून स्वातंत्र्य मिळण्याआधी महात्मा गांधींचे अहिंसामय नेतृत्व मानले गेले व स्वातंत्र्योत्तर काळात नेहरूंचे सर्वधर्मनिरपेक्ष (secular) पुरोगामी धोरण भारत देशाच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत ठरले. अर्थात हे अभिजात विचार संतुलितरीत्या मूर्त होण्यासाठी १८५७ सालचा 'पहिला स्वातंत्र्य लढा' आणि लोकमान्य टिळक, काका बाप्तिस्टा, सुभाषचंद्र बोस, अब्दुल कलाम आझाद व बाबासाहेब आंबेडकर ह्यांची दूरदृष्टी उपयुक्त ठरली. अगदी महमद जिना ह्यांचा 'विरोधी' विचार 'वेगळा' मतप्रवाह म्हणून मानला गला. ह्या साऱ्या मतभिन्नतेच्या संमिश्र रसायनाचे फलित म्हणजे आपले सर्वसमावेशक व अद्वितीय संविधान होय.



**पहिले मंत्रिमंडळ : सर्वधर्म स्नेहभावाचे दर्शन**

जवाहरलाल नेहरू (पंतप्रधान, परराष्ट्रमंत्री), सरदार वल्लभभाई पटेल (उप-पंतप्रधान, गृहमंत्री), डॉ. राजेंद्र प्रसाद (अन्न व शेती मंत्री), अब्दुल कलाम आझाद (शिक्षण मंत्री), डॉ. जॉन मथाई (रेल्वे व परिवहन मंत्री), सरदार बलदेवसिंग (संरक्षण मंत्री), जगजीवन राम (कामगार मंत्री), सी. एच. भाभा (व्यापार मंत्री), रफी अहमद किडवाई (दळणवळण मंत्री), राजकुमारी अमृत कौर (आरोग्य मंत्री), डॉ. बी. आर. आंबेडकर (न्याय व कायदे मंत्री), षण्मुखम चेट्टी (अर्थ मंत्री), डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी (उद्योग मंत्री), एन. व्ही. गाडगीळ (काम, खाणी व ऊर्जा मंत्री).

उपरोक्त विविध धर्मीय व भिन्न पक्षीय 'राष्ट्रीय मंत्रिमंडळ' ही एक अभिजात संरचना होती. ती १५ ऑगस्ट १९४७ रोजी अस्तित्वात आली. त्यातील १४ मंत्र्यांनी सर्वांना बरोबर घेऊन पुढे जाण्याचा 'पायंडा' सुरू केला नि ती एक स्तुत्य 'परंपरा' बनली. त्यासाठी शीर्षस्थ नेत्यांनी उदाहरण घालून दिले. म्हणूनच जगभर एक सहिष्णू व आदरातिथ्यासाठी प्रसिद्ध अशी आपल्या भारताची विशेष ओळख होऊ लागली.

**विचित्र चित्र**

अर्थात, यथावकाश राजनीतीचे रूपांतर राजकारणात होऊ लागले. हळूहळू सत्य व सत्त्व ह्यांना सत्ता, पैसा व मोहाच्या वेदीवर बळी दिले जाऊ लागले. गरीब, गरजवंत व निराधार ह्यांचे प्रतिनिधित्व करायला कुणी नाही असे विचित्र चित्र दिसू लागले. स्वार्थ, लाचलुचपत, भ्रष्टाचार ह्यांमुळे भलीभली माणसे एकदम बदलू लागली. त्यात बदल करण्यासाठी काही अतिरेकी व नक्षलवादी जन्मू लागले; काही प्रादेशिक व विशिष्ट विचारप्रणालीचे पक्ष उदयास आले. भारतीय स्वातंत्र्य लढ्याची व त्या स्वातंत्र्य सैनिकांच्या त्याग व त्यांच्या स्वप्नांची आठवण सुरू होऊ लागली...

**विशेष बाब**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत 'स्वतंत्र' (Independent) झाला खरा, पण 'स्वावलंबी' (Self-Reliant) झाला नाही, 'मुक्त' (Liberation) होण्याचे आव्हान पहिल्याच दिवसापासून सर्वांना घेरू लागले. आपण 'स्वतंत्र' झालो म्हणजे परकीय सत्ता व बाह्य शक्तींपासून आपली सुटका झाली, करून घेतली. पण नागरी हक्क व मानवी प्रतिष्ठा तसेच सर्वसमावेशक सुशासन प्रस्थापित

करण्याची जबाबदारी सर्वांवर येऊन पडली. धर्मावर आधारित भारत-पाकिस्तान असे दोन देश निर्माण झाले तरी पाकिस्तानमधील मुसलमानांपेक्षा अधिक मुसलमानांनी भारतात राहणे पसंत केले. चतुर्वर्णावर आधारित जाती-व्यवस्था, गरिबी, निरक्षरता, आरोग्यविषयक मर्यादा, नोकऱ्या, बालके-तरुणाई - महिला-शेतकरी आदी प्रश्न अजूनही भेडसावत आहेत.

**सर्वसमावेशक संविधानाला प्राधान्य**

भारताने संसदीय लोकशाही पद्धती निवडली खरी, परंतु काही प्रश्न अनुत्तरित राहतात : किती पक्षांतील घराणेशाही संपली? जात, धर्म, वर्ण, वर्ग ह्यांना मतांसाठी झुकते माप अजूनही दिले जाते का? सर्वसमावेशक संविधानाला प्राधान्य देताना व्यक्तीऐवजी पैसा व सत्ता प्रमाण मानतात का? अहिंसा, न्याय, शांती, मानवता सर्वांनी वाढवायला हवी? अर्थपूर्ण जीवन जगण्यासाठी आर्थिक व्यवहारात पारदर्शकता दिसते का? टॅक्सद्वारे गोळा केलेला पैसा लोकांच्याच हितासाठी (CommonGood) वापरला गेला तर? सर्वांचा विकास होईल का? आपली युवा शक्ती व बुद्धीचा विनियोग सर्वांच्या उत्थानासाठी कसा होईल? नोकरीच्या शोधात परदेशी जायलाच हवे का? आपण सर्व १५ ऑगस्ट व २६ जानेवारीलाच नव्हे, तर स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे रोज गाऊ या? 'वंदे मातरम', 'जय भारत'!

**- फा. (डॉ.) जोएल डिकुना**

## मुखपृष्ठ




यंदा १५ ऑगस्ट रोजी आपण आपल्या भारत देशाचा ७९वा स्वातंत्र्यदिन, पवित्र कुमारी मरियेचा स्वर्गनयन सोहळा, वसई धर्मप्रांताचा २८ वा वर्धापन दिन... तसेच ४ ऑगस्ट रोजी 'धर्मगुरूंचा आदर्श' संत जॉन-मारी वियानी ह्यांचा सण आणि ९ ऑगस्ट रोजी 'आंतर-राष्ट्रीय आदिवासी दिन' साजरा करतो. त्या पाच उत्सवांची झलक... तद्वत ब्रदर लिरॉन डिकुना (ज्योती, आगाशी) ह्यांना बिशप थॉमस डिसोजा उपगुरुदीक्षा (Diaconate) देताना क्षणचित्र... सोबत 'सुवार्ता'च्या ७१व्या वर्षातील १२ अंकांचा धावता मागोवा...

**प्रापंचिकांसाठी ईशपरिज्ञान अभ्यासक्रम [LET-CE]: २०२६-२०२७**

चार वर्षीय चक्रीय पद्धत (वर्ष दुसरे): शनिवार, सायं. ५.०० ते ७.००

विषय: **नवीन करार**. जीवन दर्शन केंद्र, गिरीज

| तारीख | विषय |
|---|---|
| शनि. ४/०७/२०२६ सं. ४ | उद्घाटन सोहळा, जीवन दर्शन केंद्र, गिरीज |
| १. सं. ५ ११.०७.२०२६ | नवीन करार: यहुदी समाजाची स्थिती |
| २. १८.०७.२०२६ | प्रस्तावना: नवीन कराराचे तारण इतिहासातील महत्व |
| ३. २५.०७.२०२६ | समदर्शी शुभवर्तमाने (Synoptic Gospels) |
| ४. ०१.०८.२०२६ | मार्ककृत / मार्कच्या अनुसार शुभवर्तमान |
| ५. ०८.०८.२०२६ | मत्तयकृत / मत्तयच्या अनुसार शुभवर्तमान |
| ६. २२.०८.२०२६ | लूक कृत / लूकच्या अनुसार शुभवर्तमान |
| ७. २९.०८.२०२६ | योहानकृत / योहानच्या अनुसार शुभवर्तमान |
| ८. ०५.०९.२०२६ | डोंगरावरील प्रवचन (मत्तय ५:१-११) पठारावरील प्रवचन (लूक ६:२०-३६) |
| ९. १२.०९.२०२६ | दृष्टान्त / दाखले आणि चमत्कार व चिन्हे |
| १०. १९.०९.२०२६ | मिशनरी शिकवण (Missionary Discourses) |
| ११. २६.०९.२०२६ | येशूच्या जन्म व बालपण कथा (Infancy Narratives) |
| १२. ०३.१०.२०२६ | येशूच्या दुखसहन कथा (Passion Narratives) |
| १३. १०.१०.२०२६ | येशूचे पुनरुत्थान, दर्शने (Resurrection Narratives) व स्वर्गारोहण कथा |
| १४. १७.१०.२०२६ | **प्रभुसह सायंकाळ :** जीवन दर्शन केंद्र, गिरीज |
| १५. २४.१०.२०२६ | शौल / पॉलचे परिवर्तन व मिशनरी यात्रा |
| १६. ३१.१०.२०२६ | प्रेषितांची कृत्ये |
| १७. ०७.११.२०२६ | प्रस्तावना: पॉलची बोधपत्रे |
| १८. १४.११.२०२६ | पॉलचे रोमकरांस बोधपत्र |
| १९. २१.११.२०२६ | पॉलचे गलतीकरांस बोधपत्र |
| २०. २८.११.२०२६ | पॉलची करंथिकरांस बोधपत्रे (१ व २) |
| २१. ०५.१२.२०२६ | पॉलचे इफिसकरांस बोधपत्र |
| २२. १२.१२.२०२६ | पॉलचे कलस्सैकरांस बोधपत्र |
| २३. १९.१२.२०२६ | **गटवार अभ्यास, नंतर प्रश्नोत्तरे अधिवेशन (२५ डिसेंबर: ख्रिस्त जन्म सोहळा)** |
| २४. ०२.०१.२०२७ | पॉलची थेस्सलनिकाकरांस बोधपत्रे (१ व २) |
| २५. ०९.०१.२०२७ | पॉलचे फिलिप्पैकरांस बोधपत्र |
| २६. १६.०१.२०२७ | पॉलचे तिमथिला बोधपत्र (१ व २) |
| २७. २३.०१.२०२७ | पॉलची तिता आणि फिलेमोन ह्यांना बोधपत्रे |
| २८. ३०.०१.२०२७ | इब्री लोकांस बोधपत्र |
| २९. ०६.०२.२०२७ | कॅथलिक बोधपत्र: याकोबाचे बोधपत्र |
| ३०. १३.०२.२०२७ | कॅथलिक बोधपत्रे: पेत्र (१ व २) |
| ३१. २०.०२.२०२७ | कॅथलिक बोधपत्रे: योहान (१,२,३) |
| ३२. २७.०२.२०२७ | कॅथलिक बोधपत्र: यहुदाचे बोधपत्र |
| ३३. ०६.०३.२०२७ | योहानाला झालेले प्रकटीकरण |
| ३४. १३.०३.२०२७ | नवीन करारातील मरीया |
| ३५. २०.०३.२०२७ | **गटवार अभ्यास व नंतर प्रश्नोत्तरे अधिवेशन** |
| **०३.०४.२०२७** | **पुनरुत्थान सोहळा कार्यक्रम** |

**संयोजक: सौ. सुनीता मच्याडो (९६ ३७ ४२ ८२ ०३)**

**संचालक: फा. (डॉ) जोएल डिकुना (९९ ७५ १४ ६२ ३७)**

मंथन

## न्याय आणि शांती आयोग : वसईतील अतिवृष्टी संदर्भात शिफारसी

१. नुकसानग्रस्त नागरिकांचे पंचनामे करून योग्य आर्थिक मदत जाहीर करावी.

२. पाणी साचत असलेल्या भागात तातडीने पाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था करावी.

३. जलनिस्सारण व्यवस्था सुसज्ज करण्यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना कराव्यात.

४. रस्ते, गटारे व नाले ह्यांची तातडीने दुरुस्ती आणि स्वच्छता करावी.

५. भविष्यात अशा परिस्थितीची पुनरावृत्ती होऊ नये ह्यासाठी प्रभावी नियोजन व आपत्ती व्यवस्थापनाची अंमलबजावणी करावी.

६. निरी ( National Environmental Engineering Research Institute) व IIT (पवई) ह्यांच्या संयुक्त विद्यमाने २०१८ साली केलेल्या शिफारशींची अंमल बजावणी करावी.

७. आपत्ती निवारक केंद्रे देवतलाव व वाघोली येथे सुरू करावी.

८. प्रतिबंधक नियोजन करण्यासाठी ठोस पावले उचलावीत. उदा. 'हवामान कृती आराखडा' तयार करून त्यासाठी अर्थसंकल्पातील ५%निधी राखून ठेवावा.

९. बांधकामांवर नियंत्रण व निर्बंध आणावे. विशेषत: पश्चिम पट्ट्यात इमारतींना परवानगी देऊ नये.

१०. बागायती व पश्चिम पट्ट्यात चटई निर्देशांक (FSI) कमी करावा. (०.३३ होता तो २.००वर गेलाय)

११. स्टेशनपासून फक्त ३ कि.मी. 'विकास क्षेत्र' असावे.

१२.बावखलांचे संवर्धन करणे, नैसर्गिक स्रोत वृद्धिंगत करणे. मोठे तलाव (उदा. निर्मळ, सोपारा, उमराळे, चाळपेठ, आचोळे, गोखिवरे, पापडी) खणून गाळ उपसणे, पाण्याची धारणक्षमता वाढविणे, धारण तलाव निर्माण करणे.

१३ जुलै २०२६

## लिहिते व्हा : दक्षता सूत्र

**आपले कोणत्याही प्रकारचे लेखन महिन्याच्या १० तारखेपर्यंत सुवार्ता कार्यालयात पोहोचवावे.**

* अन्य नियतकालिकात किंवा व्हॉट्अॅपवर आलेला मजकूर 'सुवार्ता' मासिकात छापला जात नाही.
* आपण पाठविलेल्या साहित्याची एक प्रत कृपया, आपल्या दप्तरी असावी.
* आपला लेख शक्यतो ५५० ते ६०० शब्दांपर्यंत असावा. कविता ६० ते ८० शब्दांपर्यंत असावी.
* आपले लेखन पुढील स्वरूपाचे असू शकते : लेख, कविता, संपादकास पत्र, विषयानुरूप प्रतिसाद, ललित, कथा, वैचारिक, प्रासंगिक, विनोद, इत्यादी.
* आपले लेखन संपादक मंडळापुढे ठेवले जाईल.
* 'सुवार्ता' मासिकाच्या ध्येय-धोरणाप्रमाणे लेखन असेल तर त्या त्या महिन्याच्या विषयांप्रमाणे यथावकाश प्रसिद्ध केले जाईल.
* मजकूर स्वीकारणे अगर नाकारणे आदींचा अधिकार संपादक मंडळाचा असेल.

**- संपादक**



# संपादकांस पत्रे

## अभिवादन

'सुवार्ता' जुलै २०२६च्या अंकात उद्योजक बॅप्टिस्ट ब्रिटो ह्यांच्यावरचा श्रद्धांजलीपर लेख वाचला. गोबर गॅस प्रकल्पामध्ये जम बसवताना श्रीनिवासन आणि शर्मा ह्या अधिकाऱ्यांना श्रेय दिले गेले आहे ते ठीकच आहे. परंतु प्रत्यक्षात वसईत काम करताना प्रशासकीय आणि अनुदानविषयी बाबींमध्ये त्यांना खादी कमिशनमध्ये प्रकल्पाधिकारी असलेले वडवली पाली येथील माझे काका (ख्रि.) मार्सेलिन फ्रान्सिस मच्याडो ह्यांचे सहकार्य लाभले होते, हे नमूद करावेसे वाटते. त्या निमित्ताने ब्रिटो हे अनेकदा काकांच्या घरी यायचे. काकांच्या कुटुंबीयांशीही त्यांचे जवळचे संबंध होते. ब्रिटो ह्यांचा उत्साह व धडाडीही वाखाणण्यासारखी होती. उद्योगजगतेच्या क्षेत्रामध्ये त्यांनी मारलेल्या भरारीबद्दल त्यांच्या स्मृतीस अभिवादन!

- **दीपक मच्याडो,** वडवली, पाली
मोबाईल : 99 67 23 86 11

## संस्कारांची समृद्ध शिदोरी

'साद-प्रतिसाद' ह्या सदराखाली 'सुवार्ता' जुलै २०२६च्या मासिकात प्रकाशित झालेल्या 'माझ्या पालकांचा माझ्यावरील संस्मरणीय संस्कार' हा विषय वाचून काहीतरी दर्जेदार आणि मनाला स्पर्शून जाणारे वाचल्याचे समाधान लाभले. सर्वच लेखकांनी आपल्या अनुभवांतून व्यक्त केलेली मनोगते आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आणि मूल्यसंस्कार जपणारी आहेत.

अत्यंत समर्पक, संस्कारक्षम आणि विचारप्रवर्तक विषयाची निवड करून वाचकांना आत्मपरीक्षणाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल 'सुवार्ता'चे संपादक फा. (डॉ.) जोएल डिकुना व संपूर्ण टीमचे मन:पूर्वक अभिनंदन!




सर्व पालकांना माझी नम्र विनंती आहे की त्यांनी ह्या सदरातील एकेक मनोगत आपल्या पाल्यांना आवर्जून वाचण्यास सांगावे किंवा स्वत: वाचून दाखवावे. त्यामुळे त्यांना आपल्या पूर्वसुरींच्या कष्टमय, त्यागमय आणि मूल्याधिष्ठित जीवनाची जाणीव होईल आणि त्यांच्या मनात त्या पिढीविषयी आदर निर्माण होईल.

**-बॅप्टिस्ट एम. वाझ,**
दारसेंग, गोम्सआळी

## वसई विरारचा कायापालट आणि महापौर/उपमहापौर ह्यांचा खोटेपणा

'सुवार्ता' जुलै २०२६मध्ये 'वसई विरारचा कायापालट' ह्या मथळ्याखाली जॉन कोलासो व जॉन परेरा ह्यांनी घेतलेली महापौर व उपमहापौर ह्यांची मुलाखत फार उद्बोधक आणि बुद्धीला चालना देणारी आहे. महापौरांनी अनेक पटीने वाढणाऱ्या लोकसंख्येला लागणाऱ्या मूलभूत सोयी, शैक्षणिक सुविधा, रस्ते, वाहतूक पुरविण्याची आव्हाने नमूद केली आहेत, ती आव्हाने गेली चार दशके 'आ'वासून भूमिपुत्रांसाठी (वाढणाऱ्या लोक- संख्येसाठी नाही) उभी आहेत.

श्वानदंश व सर्पदंश ह्यापेक्षा भरमसाठ वाढणारी श्वानांची गँग रस्तोरस्ती 'चावा' घेण्यास उभी अस्ते. श्वानदंश झाल्यास फार मोठ्या दिव्यातून जावे लागते आणि शारीरिक त्रास होतो पान नं. १२वर महापौरांच्या उद्दिष्टात 'रॅबिस'चे प्रकरण न समजलेले कोडेच आहे. कारण गेल्या दीड वर्षापूर्वी कॅम्पमध्ये नियोजन केलेल्या श्वानांची यादी लांबलचक होती अन् येथे गावागावात श्वानांची संख्या दुपटीने वाढत राहिली आहे. तरी वसई-विरार शहर महानगरपालिकेने केलेल्या वरील मुद्द्याचा अभ्यास करावा.

- **जेम्स अंतोनी लोपीस,** पाली
मोबाईल : 84 07 93 51 78

## ई-मेल आयडी

प्रत्येक महिन्याचा 'सुवार्ता' वाचनीय असतो. बरेच लेख मला आवडतात पण लेखकांशी मी थेट संपर्क साधू शकत नाही. लेखकाचा ई-मेल आयडी दिला तर मी माझी प्रतिक्रिया त्यांना ई-मेलवर कळवू शकेन.

**- अजित डिकोस्टा**

●

## साद-प्रतिसाद

**'सुवार्ता' सप्टेंबर २०२६च्या अंकासाठी**

**विषय : ज्वलंत नागरी समस्यांसाठी भारतीय संविधानाप्रमाणे काय करावे?**

शब्दमर्यादा : १०० शब्द

आपला अभिप्राय/अनुभव १० ऑगस्ट २०२६पर्यंत

**'सुवार्ता' भ्रमणध्वनी : ९७०२०९०२३१** (Whatsapp) **किंवा**

**E-mail : suvartavasai@gmail.com वर पाठविणे.**

प्रासंगिक

# भारत माझा (ही) देश आहे!

-फा. रॉबर्ट जोसेफ गोन्साल्वीस
फातिमा माता चर्च, चुळणे



रस्ते पाण्याखाली, वाहतूक व्यवस्था कोलमडलेली, वीज गेलेली, साहजिकच घरातील इनव्हर्टर अल्पावधीतच विझलेले. मोबाईल नेटवर्क बंद, इंटरनेट पूर्णपणे ठप्प! वृत्तपत्र, टि.व्ही., बातम्या किंवा अनेकदा स्वत:चे हसे करून घेणारे सरकार वेळोवेळी पाठवत असलेले नैसर्गिक घडामोडी व हवामानविषयक इशारे इथपर्यंत पोहचण्याचा कुठलाच मार्ग नाही. असा बाह्य जगाशी सर्व संपर्क तुटलेला. दूध, पिण्याचे पाणी व खाद्यपदार्थांचा तुटपुंजा साठा संपण्याच्या बेतात. अनेक भागात शौचालय व न्हाणीघरातून घरात शिरलेले दुर्गंधीयुक्त घाण पाणी. काही रहिवाशांच्या तळमजल्याच्या खिडकीपर्यंत वाढलेली पाण्याची पातळी. पिण्याच्या पाण्याच्या जमिनीखाली बांधलेल्या साठवण-टाक्या पूर्णपणे पाण्यात बुडून त्यात सांडपाणी मिसळलेले. बालकवी ठोंबरे म्हणतात त्याप्रमाणे, ''समृद्धी चहुकडे पाणी, पण पिण्यास थेंब नाही'', अशी कित्येकांची अवस्था!

ते पहिल्यांदाच घडले नव्हते आणि शेवटचेही ठरणार नाही, ह्याचीच अधिक भीती वाटते. टोलेजंग इमारतीत राहणाऱ्या वसईच्या नव-नागरिकांनाही ह्याचा प्रत्यय आला. सलामीलाच ह्या पावसाने व्यवस्थेची लक्तरे वेशीवरच नव्हे; तर प्रत्येक वसईकरांच्या अंगणात व पाण्याखाली वाहून गेलेल्या रस्त्या-रस्त्यावर लटकावली. 'गेल्या १०० वर्षांतील सर्वाधिक पाऊस' किंवा 'भरती-ओहोटीमुळे ही परिस्थिती उदभवली'... वगैरे मखलाशी करून समर्थन करण्याचा प्रयत्न व्यवस्थेकडून होईलच. अर्थात, पाऊस नवा नसून हा त्रास नवा व नित्याचा झाला आहे.

पूर्वी प्रत्येक गावकीत सखल भागात डबकी, तळे, खराबे, बावखले होती. साहजिकच परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा त्यात होत असे. शहर-अभियंत्यांना जणू प्रदीर्घ अभ्यासानंतर नव्याने शोध लागल्याप्रमाणे सापडलेली हीच ती धारण-तलावाची व्यवस्था. जी आपल्या पूर्वजांना आधीच ज्ञात होती. अधिकची जागा बळकावण्याच्या हव्यासापायी एकतर ती बुजवली गेली किंवा सुशोभीकरणाच्या नावाखाली त्यांच्यापर्यंत पाण्याचा निचरा होणारे मार्गतरी बंद झाले. शिवाय, तलावाकाठी फिरणाऱ्यांना घाण पाण्याचा त्रास नको म्हणून काही ठिकाणी सद्‌हेतूने ते अडवण्यात आले. मुसळधार पाऊस हे वसईच्या आजच्या वाताहतीचे एकमेव कारण नाही. भरमसाठ इमारती उभ्या राहताना टाकलेला प्रचंड भराव व सांडपाण्याची विल्हेवाट लावण्याच्या व्यवस्थेचा अभाव आणि पावसाळी पाण्याचा निचरा होण्याचे आधीच आक्रसलेले नैसर्गिक निचरा होण्याचे गटारे, नाले, खाड्या आदी सर्व मार्ग बंद केल्याचे वा अडवल्याचे हे संयुक्तिक दुष्परिणाम आहेत.

शहराचा अस्ताव्यस्त पसरलेला नगर-विकास व वसईची उंच सखल भूरचना पाहता पूर्वीप्रमाणे पाण्याचा निचरा नाले-खाडीमार्गे समुद्रापर्यंत होणे, हे आजच्या परिस्थितीत जवळपास अशक्य आहे, हे जितक्या लवकर आपण मान्य करू तितके बरे! कारण सखल भागांतून योग्य तो उतार राखत गटारे बांधण्याचा प्रयत्न झाला तरी नजीकच्या खाडी-समुद्रापर्यंत पोहोचेपर्यंत ती काही कि.मी. खाली न्यावी लागतील. त्याहून शहरातील पाण्याचा निचरा होण्याऐवजी उधाणाला समुद्राचेच पाणी वारंवार नगरात घुसण्याचा धोका अधिक. तेव्हा सारासार विचार करता जागोजागी धारण-तलावाला तरणोपाय नाही, हे सत्य स्वीकारण्याची वेळ आलेली आहे. वस्त्या-वस्त्यांमध्ये होते ते उकरून व नसतील तिथे निर्माण करून पावसाळी पाण्याला तिथपर्यंत नेणे हाच आजच्या परिस्थितीत काहीसा दिलासा देणारा उपाय ठरेल.

नगरविकासाच्या आराखड्यात सरकारला जर मॉल, उड्डाणपूल किंवा अत्यल्प वापरले जाणारे उन्नत आकाशी पदपथ उभारणे शक्य वाटत असेल, तर तितक्यात गांभीर्याने पूरनियंत्रणासाठी ठिकठिकाणी धारण-तलाव उभारणेही अनिवार्य करता आले पाहिजे. किंबहुना, नव्याने नगर वसविणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांसाठी ती पूर्वअट ठेवून वाहन खरेदी करताना रस्ता कर वसूल करतात त्या धर्तीवर परवडणाऱ्या सदनिकेमध्ये धारण-तलावाचा खर्चही विभागून अंतर्भूत करता येईल का? ह्याचाही नगररचनातज्ज्ञांशी चर्चा करून निर्णय घ्यावा लागेल. कारण परवडणाऱ्या घरांसाठी वसईकडे धाव घेताना तुमची आमची सर्वांची वसई त्यामुळे तुंबणार नाही ह्याचीही खात्री केली नाही; तर पुढचा मुसळधार पाऊस हा केवळ पाण्याचा नव्हे; तर नागरी निष्काळजीपणाचा पुरावा ठरेल. अशा नैसर्गिक आपत्तीकाळात नागरिकांना सुरक्षित ठेवण्यास शासनास वारंवार अपयश येत असेल तर तो दोष निसर्गाचा नसून आपल्या नियोजनशून्यतेचा व नागरी बेजबाबदारीचा असेल.

देशप्रेमाचा खरा कस केवळ स्वातंत्र्यदिनी तिरंग्याला सलाम करण्यात नाही; तर देशातील प्रत्येक नागरिकाला सुरक्षित, सन्मानाने आणि निर्धास्तपणे जगता येईल अशी व्यवस्था उभी करण्यात आहे. कोणताही विकास नागरिकांचे प्राण, आरोग्य आणि सुरक्षितता ह्यांपेक्षा मोठा असू शकत नाही. वसईच्या विकासाचा पुढचा टप्पा अधिक इमारती उभारण्याचा नसून, आधी उभ्या राहिलेल्या शहराला अधिक जगण्यालायक बनविण्याचा असला पाहिजे. यंदाच्या स्वातंत्र्यदिनी तिरंग्याला सलाम करताना त्याच्या छत्रछायेखाली प्रत्येकाला सुरक्षित असल्याची खात्री वाटली, तरच 'भारत माझा(ही) देश आहे!' ही प्रतिज्ञा बालभारतीच्या पुस्तकातून उतरून खऱ्या अर्थाने प्रत्येक भारतीयाच्या जीवनात आणि ओठांवर अवतरेल.

- robertjgonsalves@yahoo.com
Mob. : 75 88 72 56 88

●

विचार

# भारतीयत्वाचा आत्मा : मानवता

**(जागतिक मानवतावादी दिन - १९ ऑगस्ट विशेष)**

**-स्मिता लोपीस**
चुळणे



१९ ऑगस्ट हा दिवस जागतिक मानवतावादी दिन! युद्ध, नैसर्गिक आपत्ती, दारिद्र्य, उपासमार, रोगराई आणि अन्याय ह्यांसारख्या संकटांमध्ये स्वत:च्या जिवाची पर्वा न करता मानवतेची सेवा करणाऱ्या असंख्य ज्ञात-अज्ञात व्यक्तींप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस! हा दिवस केवळ त्यांचा तोंडदेखले गौरव करण्यापुरता नसून स्वत:च्या अंत:करणात डोकावण्याचेही आमंत्रण देतो. विज्ञान, शिक्षण, संशोधन, उद्योग, अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ह्या क्षेत्रांत अफाट प्रगती केली असली तरी आपली संवेदनशीलता, करुणा व माणुसकीही जपली आहे का? ह्यावरही हा दिवस चिंतन करावयास लावतो.

सातत्याने होत असलेल्या महिलांवरील अत्याचार, बालकांप्रति हिंसा, वृद्धांची उपेक्षा, भ्रष्टाचार, वाढती असहिष्णुता, जातीय आणि धार्मिक द्वेष, सामाजिक माध्यमांवरील विखारी भाषा, पर्यावरणाचा होणारा ऱ्हास हे सर्व पाहता-ऐकताना मन व्यथित होते. वाटते की भौतिक विकासाच्या शर्यतीत मानवताच हरवत चालली आहे.

१५ ऑगस्ट रोजी आपण स्वातंत्र्यदिन साजरा करतो. तिरंग्याच्या तेजाला व स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाला अभिमानाने सलाम करतो. परंतु त्या अभिमानाला खरा अर्थ तेव्हाच प्राप्त होईल जेव्हा तो अभिमान मानवतेच्या मूल्यांनी स्फुरलेला असेल. आपले भारतीयत्व हे केवळ एका राष्ट्राचे नागरिकत्व नाही, तर एका उज्ज्वल परंपरेचे, उदात्त संस्कृतीचे, व्यापक जीवनदृष्टीचे आणि सहअस्तित्वाच्या मूल्यांचे प्रतीक आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही संविधानाने दिलेली मूल्ये मानवतेचीही मूलभूत तत्त्वे आहेत. म्हणून भारतीयत्वाचा खरा आत्मा मानवतेतच आहे. जोपर्यंत जाती, धर्म, भाषा, प्रदेश, लिंग, आर्थिक स्तर किंवा राजकीय विचार ह्यांच्या आधारे भारतीयांत भेदाच्या भिंती उभ्या केल्या जातील तोवर महत्प्रयासाने प्राप्त केलेले हे अमूल्य स्वातंत्र्य अपूर्णच राहील.

**माणसाने माणसाशी माणसासारखे वागणे म्हणजे मानवता!**

दैनंदिन जीवनात येशू ख्रिस्ताने शिकवलेला मानवतेचा महान मार्ग अवलंबिला पाहिजे. ''तुम्ही जसे इतरांनी तुमच्याशी वागावे अशी इच्छा करता, तसेच तुम्हीही इतरांशी वागा'' (लूक ६:३१). हा केवळ ख्रिस्ती धर्माचा सुवर्णनियम नसून मानवतेचा पाया आहे. हा ध्यास केवळ माणसांपुरता मर्यादित नसून पशु-पक्षी, सजीव-निर्जीव आणि संपूर्ण सृष्टीपर्यंत विस्तारला पाहिजे. त्यासाठी सकलांचा आदर, सन्मान, सहनशीलता व संवेदनशीलता जपण्याची, त्यांच्या गरजांमध्ये धावून जाण्याची व सर्वांचे सर्वथा संरक्षण करण्याची जबाबदारी स्वीकारावी लागेल व अशा कृतींमधूनच महान मानवता फुलेल.

प्रभू येशू ख्रिस्त उत्तम शमरोनीच्या दृष्टान्तात सांगतात त्याप्रमाणे माझा शेजारी तोच नाही जो माझ्या जातीचा, धर्माचा किंवा विचारांचा आहे; तर तो प्रत्येक जण आहे, ज्याला माझ्या करुणेची, दयेची, क्षमेची आणि मदतीची गरज आहे. शेवटी हीच मानवता भेदाच्या भिंती ओलांडून सेवेचे सेतू बांधते. त्यासाठी आज गरज आहे रस्त्यावर घडणाऱ्या क्रांतीची नव्हे; तर मनातल्या क्रांतीची. केवळ स्वत:साठी किंवा देशासाठी नसून संपूर्ण मानवजातीसाठी!

जर माझ्या शब्दांत माणुसकी असेल, कृतीत करुणा असेल आणि माझ्यामुळे कोणाचे जीवन थोडे अधिक सुरक्षित, अधिक आशादायी आणि अधिक सुंदर व जगण्यालायक होत असेल तर मानवतेच्या उभारणीसाठी ते माझे योगदान असेल.

मानवता ही कोणत्याही धर्माची, जातीची किंवा राष्ट्राची मक्तेदारी नाही; ती संपूर्ण सृष्टीला जोडणारा परमेश्वराचा सर्वांत सुंदर धागा आहे.

मोबाईल : 99 70 81 53 89

धर्मसत्व

# स्वर्गनयन : आपल्या पुनरुत्थानाचे प्रतीक

-प्रा. स्टीफन आय. परेरा
खरभाट, सांडोर

मरियेच्या स्वर्गनयनाचा उल्लेख बायबलमध्ये कुठेच आलेला नाही, तरीही अगदी पहिल्या शतकापासून ख्रिस्ती भाविकांमध्ये तशी श्रद्धा रुढ झाली होती. ह्याचे कारण पहिल्या दुसऱ्या शतकात बायबल व्यतिरिक्त लिहिल्या गेलेल्या Dormition of Theotokos', Liber Requiei Mariae, Transitus Mariae' अशा काही ग्रंथांमधून वर्णन केलेल्या कथांमुळे ही श्रद्धा दृढ झाली.

अशाच एका कथेत म्हटले आहे की मरियेचा मृत्युसमय जवळ आला तेव्हा एका दिव्य संदेशाने दूरवर असलेल्या प्रेषितांना मरियेपाशी आणले. त्यांच्या डोळ्यांदेखत ती मरण पावली आणि त्यांनी तिचा मृतदेह एका कबरीत ठेवला. परंतु त्यावेळी संत थॉमस त्यांच्या सोबत नव्हता. त्याने आपल्या स्वभावानुसार मरियेच्या मरणाबाबत शंका उपस्थित केली. तेव्हा प्रेषितांनी तिची कबर उघडली तेव्हा काय आश्चर्य? ती कबर रिकामी होती. मरियेचा मृतदेह तेथे नव्हता.

दुसऱ्या एका कथेनुसार असे सांगण्यात येते की मरियेने प्रेषितांना आपली आठवण म्हणून आकाशातून आपला मेखला (कमरपट्टा) खाली टाकला.

अशा ह्या कथांमधून मरिया शरीरासहित स्वर्गात घेतली गेली अशी श्रद्धा भाविकांमध्ये बळकट होत गेली. परंतु ख्रिस्तसभा असल्या मिथकांना जास्त महत्त्व देत नाही. पहिल्या शतकापासूनची श्रद्धा जमेस धरून त्या श्रद्धेच्या संदर्भात बायबलमधील उतारे शोधण्याचा प्रयत्न काही पंडितांनी सुरू केला.

उत्पत्तीच्या ग्रंथात पहिला संदर्भ सापडला. परमेश्वर सैतानाला म्हणाला, ''तू व स्त्री ह्यांमध्ये मी वैर स्थापीन. ती तुझे डोके फोडील'' (उत्पत्ती ३:१५) (ह्या वाक्याला 'आद्य सुवार्ता' असे काही पंडित म्हणतात.) हे भाकीत मरियेच्या जीवनात पूर्ण झाले. मरियेच्या पुत्राने मरणावर विजय मिळविल्याने सैतानाचा पूर्ण पराभव झाला. म्हणून तिचे शरीर मरणाच्या अधिपत्याखाली न राहता ते तिच्या आत्म्याबरोबर स्वर्गीय बनले.



दुसरा संदर्भ म्हणजे कराराचा कोश. जुन्या करारात देवाचे निवासस्थान असणाऱ्या कराराच्या पेटीत देवाच्या आज्ञा (शब्द) मान्ना व अहरोनची काठी ह्यासहित ठेवण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे मरियेने आपल्या उदरात खऱ्या स्वर्गीय भाकरीला (प्रभू येशूला) देवाच्या जिवंत शब्दाला धारण केले होते. ह्या लाक्षणिक अर्थाने तिला 'कराराचा कोश' म्हटले गेले. त्यानंतर ''हे परमेश्वरा, उठ. तू आपल्या सामर्थ्यशाली 'कोशा'सहित आपल्या निवासस्थानी ये'' (स्तोत्र १३२:८) ह्या वचनानुसार प्रभू येशूने मरियेला सदेह स्वर्गात नेले असणार असे दिसून येते.

शेवटी प्रकटीकरणाच्या ग्रंथात संत योहान मरियेच्या संदर्भात म्हणतात, ''नंतर स्वर्गात एक चिन्ह दृष्टीस पडले. सूर्यतेज पांघरलेली एक स्त्री दिसली. तिच्या पायाखाली चंद्र आणि मस्तकावर बारा ताऱ्यांचा मुकूट होता'' हे वर्णन मरियेशिवाय दुसऱ्या कोणाचेच असू शकत नाही. अशा अनेक संदर्भांचा पूर्ण विचार करून तसेच पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने पोप बारावे पायस ह्यांनी दिनांक १ नोव्हें. १९५० रोजी 'मुनिफिसेन्तिस्सिमुस देऊस' ह्या परिपत्रकातून जाहीर केले, **''आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या अधिकाराने, पेत्र व पॉल ह्या भाग्यवान संतांच्या अधिकाराने व आमच्या स्वत:च्या अधिकाराने आम्ही सत्य गठीत करतो व जाहीर करतो की, निष्कलंक देवमाता, सदा कुमारी मरिया हिने पृथ्वीवरील आपली जीवनयात्रा पूर्ण केल्यावर तिला शरीर व आत्म्यासह स्वर्गात नेले गेले. ही शिकवण देवाने प्रकट केलेले सत्य आहे.''** अशा शब्दांत ख्रिस्तमंडळाचे धर्मसत्य म्हणजे डॉग्मा जाहीर करण्याची प्रथा आहे. डॉग्मा हा पोपमहाशयांनी जाहीर केलेला अपरिवर्तनीय अध्यादेश असतो आणि तो धर्मसिद्धांत मान्य करणे सर्व भाविकांना बंधनकारक असते.

मरियेच्या स्वर्गनयनाच्या सोहळ्यातून आपल्याला मानवजातीच्या उद्धाराचा आणि देवाच्या कृपेचा फार मोठा संदेश पुढीलप्रमाणे देण्यात आला आहे -

**श्रद्धेचे फळ आणि आज्ञापालन :** मरियेने आयुष्यभर देवाच्या आज्ञांचे पालन करून ती पूर्ण विश्वासाने जीवन जगली. त्याचा तिला पुरस्कार मिळाला. आपणही प्रभूवर पूर्ण श्रद्धा ठेवून पावित्र्याचे जीवन जगलो तर आपल्यालाही पुनरुत्थानानंतर अनंतकाळचे जीवन मिळू शकेल.

**मानवी देहाचे पावित्र्य :** परमेश्वराने मरियेच्या आत्म्याबरोबर तिच्या मानवी शरीराचे दैवी शरीरात रूपांतर करून स्वर्गात घेतले. ह्याचा अर्थ मानवी शरीर हे केवळ नश्वर नाही; तर ते पवित्र आहे. त्याचे स्वर्गीय शरीरात रुपांतर होऊन त्याला स्वर्गलोकात स्थान मिळू शकते. आपले शरीर हे देवाचे मंदिर आहे, म्हणून आपण त्याचे पावित्र्य राखले पाहिजे. तरच आपल्या पुनरुत्थानानंतर आत्म्याबरोबर आपल्या शरीरालाही स्वर्गात घेतले जाईल.

देवपुत्राला स्वर्गातून भूतलावर मानवी रूपात आणणाऱ्या पवित्र मरियेने आपल्यासाठी स्वर्गाचा दरवाजा उघडला आहे म्हणून म्हटले आहे, 'पवित्र मरियेचे सदेह स्वर्गनयन हे आपल्या पुनरुत्थानाचे प्रतीक आहे.'

मोबाईल : 98 50 87 81 89

# संत फ्रान्सिस : मुक्त मानव

-फादर नितीन डिसोजा
उमराळे चर्च

पूर्वीपेक्षा अधिक सुविधा, अधिक संधी आणि अधिक स्वातंत्र्य मिळाले असतानाही मानवी मन अस्वस्थ आहे. मनाला शांततेची वाट सापडत नाही. बोलण्याचे स्वातंत्र्य आहे, पण मन मोकळे करण्यासाठी माणूस शोधावा लागतो. निवडीचे असंख्य पर्याय आहेत, पण समाधान मात्र हातातून निसटत चालले आहे. मग प्रश्न पडतो - आपल्याला खरेच कोणत्या स्वातंत्र्याची गरज आहे?

आठशे वर्षांपूर्वी असिसीच्या रस्त्यावरून चालणाऱ्या एका तरुणाच्याही आयुष्यात हाच प्रश्न उभा राहिला होता. तो तरुण म्हणजे संत फ्रान्सिस. व्यापाऱ्याचा मुलगा. ऐश्वर्यात वाढलेला. कीर्तीची स्वप्ने पाहणारा. युद्धात पराक्रम गाजवण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारा. जगाच्या नजरेत यशस्वी होण्याची इच्छा असलेला.

जीवनाने संत फ्रान्सिसची स्वप्ने मोडली. युद्ध, कैद, आजारपण आणि अंतर्मनातील संघर्ष ह्यांनी त्याला अशा वळणावर आणून उभे केले, जिथे संपत्ती, प्रतिष्ठा आणि मान-सन्मान ह्यांची मर्यादा त्याला उमगली. त्या दिवसांत देव त्याच्याशी हळूहळू बोलत होता. उत्तरे एकदम मिळाली नाहीत.

म्हणूनच संत फ्रान्सिस ह्यांचा प्रवास हा केवळ आयुष्यातील बदलांचा नव्हता; तो अंत:करणाच्या मुक्तीचा प्रवास होता. त्याला उमगले की माणसाला सर्वांत घट्ट बांधून ठेवणाऱ्या साखळ्या लोखंडाच्या नसतात. त्या भीतीच्या असतात. अहंकाराच्या असतात. स्वत:ला सिद्ध करण्याच्या धडपडीच्या असतात. लोकांच्या कौतुकावर जगण्याच्या सवयीच्या असतात आणि ह्या साखळ्या तुटल्याशिवाय कोणतेच बाहेरचे स्वातंत्र्य माणसाला शांत करू शकत नाही.

संत फ्रान्सिस ह्यांच्या जीवनातील प्रसंग. असिसीच्या चौकात लोकांची गर्दी जमली होती. एका बाजूला त्यांचे वडील उभे होते. दुसऱ्या बाजूला बिशप. सर्वांच्या नजरा त्या तरुणाकडे लागल्या होत्या. त्याक्षणी संत फ्रान्सिसने आपल्या अंगावरील श्रीमंतीची वस्त्रे उतरवली आणि ती वडिलांना परत दिली. अनेकांच्या दृष्टीने तो सर्वस्व गमावत होता; पण फ्रान्सिससाठी तो गमावण्याचा नव्हे, मुक्त होण्याचा क्षण होता. त्या दिवशी त्याने केवळ वस्त्रांचा त्याग केला नव्हता. त्याने भीतीचा त्याग केला. लोकांच्या मतांच्या कैदेतून तो मुक्त झाला. स्वत:ला सिद्ध करण्याच्या ओझ्यातून तो मुक्त झाला. देवा व्यतिरिक्त त्याला दुसऱ्या कोणत्याही आधाराची गरज उरली नाही.



त्या दिवसा पासून त्याच्या जीवनात एक वेगळाच आनंद, एक वेगळीच शांती आणि एक विलक्षण स्वातंत्र्य दिसू लागले.

ह्याचं कारण काय? उत्तर एका शब्दात सापडतं - आशा. आशा म्हणजे सर्व काही आपल्या मनासारखे घडेल, ही खात्री नव्हे. आशा म्हणजे परिस्थिती काहीही असो, देव माझी साथ सोडणार नाही, हा विश्वास. म्हणूनच आशा माणसाला वास्तवापासून दूर नेत नाही. उलट वास्तवाला नव्या नजरेने स्वीकारण्याची शक्ती देते. अंधारातही प्रकाश शोधण्याची दृष्टी देते. हरवूनही पुन्हा सुरुवात करण्याचे धैर्य देते.

> **संत फ्रान्सिस असिसी ह्यांचा प्रवास हा अंत:करणाच्या मुक्तीचा होता.**

आर्चबिशप डेझमंड टूटू म्हणतात, ''अंधार नाही असे मानणे ही आशा नाही; अंधारातही प्रकाशाची दिशा ओळखणे, हीच खरी आशा.'' संत फ्रान्सिस ह्यांनी ही आशा शब्दांत नव्हे, तर आपल्या जीवनातून जगून दाखवली आणि तिथूनच त्यांच्या स्वातंत्र्याचा प्रवास सुरू झाला.

संत जॉन पॉल दुसरे म्हणतात, ''खरे स्वातंत्र्य म्हणजे हवे ते करण्याची मोकळीक नव्हे; तर योग्य ते निवडण्याचे धैर्य.'' संत फ्रान्सिस ह्यांच्या जीवनात ह्या वाक्याचे जिवंत रूप दिसते. त्यांनी सोपा मार्ग निवडला नाही; त्यांनी योग्य मार्ग निवडला. म्हणूनच त्यांचा त्याग हा पलायन नव्हता, तर देवावरील विश्वासातून जन्मलेले स्वातंत्र्य होते.

येशू म्हणतो, ''जर पुत्र तुम्हाला मुक्त करील, तर तुम्ही खरोखर मुक्त व्हाल'' (योहान ८:३६). संत फ्रान्सिस ह्यांनी हे वचन केवळ ऐकले नाही, त्यांनी ते आपल्या जीवनाचा अनुभव बनवले. त्यांनी शोधलेले स्वातंत्र्य बाह्य परिस्थितींवर अवलंबून नव्हते. ते देवावर पूर्ण विश्वास ठेवणाऱ्या हृदयातून जन्माला आले होते. आज ८०० वर्षांनंतरही, संत फ्रान्सिस आपल्याला तोच प्रश्न विचारत आहेत - तुझ्या मनाला बांधून ठेवणाऱ्या साखळ्या कोणत्या? भीती? अहंकार? तुलना? लोकांची मते? भूतकाळ? की स्वत:ला कधीच पुरेसे न समजण्याची वेदना? कदाचित ह्या फ्रान्सिस्कन ज्युबिली वर्षात आपण संत फ्रान्सिस ह्यांचा गौरव करण्यापेक्षा त्यांच्या पावलांवर चालण्याचे धाडस केले, तरच हा उत्सव अर्थपूर्ण ठरेल. कारण त्यांनी आपल्याला केवळ साधेपणा, दारिद्र्य किंवा सेवा शिकवली नाही. त्यांनी आशेच्या बळावर मुक्त व्हायला शिकवले. त्यांनी संपत्तीचा त्याग केला म्हणून ते मुक्त झाले नाहीत; ते मुक्त झाले, कारण त्यांनी देवावरचा विश्वास भीतीपेक्षा मोठा होऊ दिला. खरे स्वातंत्र्य बाहेरच्या साखळ्या तुटल्यावर मिळत नाही. खरे स्वातंत्र्य मिळते, तेव्हा देवावरचा विश्वास आपल्या भीतीपेक्षा मोठा होतो आणि ज्या हृदयात अशी आशा जिवंत असते, त्या हृदयाला जगातील कोणतीही साखळी फार काळ बांधून ठेवू शकत नाही.

मोबाईल : 94 83 24 19 82 ●

# अंधत्व आणि अंत:प्रकाश

-फादर ओनिल फरोज
वाडा



“जेव्हा मी विचार करतो
माझ्या प्रकाशाच्या क्षयाचा,
अर्धे आयुष्यही पूर्ण होण्याआधी
या अथांग अंधारमय विश्वात...”

जॉन मिल्टन ह्यांची ही अमर कविता 'On His Blindness' मानवी आत्म्याच्या विदीर्णतेतून उमटलेला एक आध्यात्मिक करुणध्वनी वाटते. ती केवळ अंधत्वाची कविता नाही; तर नियतीसमोर उभ्या राहिलेल्या मानवी असाहाय्यतेची एक गंभीर तत्त्व-चिंतनात्मक साक्ष आहे. स्तोत्रकर्त्याच्या आर्त प्रार्थनेसारखी ती देवाशी संवाद साधते, पण तो संवाद नम्र शरणागतीचा नसून, अंत:करणातील गहन संभ्रमाचा आहे.

या भावना आपल्याही आहेत जणू आपण देवाच्या न्यायालाच एक थरथरणारा प्रश्न विचारतो, जेव्हा मनुष्याच्या अंतर्यामामध्ये अजून असंख्य स्वप्ने धगधगत असतात, तेव्हाच नियती त्याच्या हातातील दीप का हिरावून घेते? आपल्या जीवनात अचानक उतरून येणाऱ्या त्या अदृश्य मर्यादांबद्दल त्या बोलतात. ज्या कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय अस्तित्वा भोवती वेदनेची कुंपणे उभारतात. तारुण्यात जिथे प्रत्येक क्षितिज अनंत शक्यतांनी उजळलेले दिसते, तिथे अपूर्णतेचे सावट इतके निकट उभे असेल, याची कल्पनाही मनाला स्पर्शून गेलेली नसते.

परंतु काळ जसजसा अंतर्मनावर आपली राख साचवत जातो, तसतसे कळू लागते की मनुष्याचा सर्वांत भीषण अंधार डोळ्यांतील प्रकाश हरवण्यात नसतो; तर स्वत:च्या असमर्थतेसमोर आत्म्याला उभे राहावे लागते. पण एक चांगली गोष्ट ह्यातून प्रकटते ती म्हणजे ज्याच्या नेत्रांवर अंधार उतरतो, त्याच्याच मनामध्ये दैवी प्रकाशाची सर्वाधिक प्रखर प्रभा जन्माला येते. ह्यावरून कळते, आपल्या प्रत्येकाची एक मूक आत्मकथा असते पण ती जीवनाची वेदना बनत नाही. कारण आयुष्यात अचानक कोसळलेल्या अंधारानंतरही विश्वासाचा दीप आपल्या हातातून निसटलेला नसतो किंवा स्वत:च्या हरवलेल्या प्रकाशाचा शोध घेत अंधारातून चालताना आपण केवळ एक जखमी मनुष्य म्हणून वावरत नसतो; तर आपल्या अंतरी अजूनही न विझलेल्या दैवी ठिणगीचे रक्षण करत असतो.

बाहेरून सर्व दिशांना रात्र वेढून उभी असली, तरी आत्म्याच्या अतिगर्भात एक अदृश्य प्रभात हळूहळू उगवत असते. कारण मनुष्याचा खरा प्रकाश डोळ्यांच्या दृष्टीत नसतो, तो असतो तुटूनही अर्थ शोधण्याच्या धैर्यात, हरवूनही विश्वास न सोडण्याच्या निष्ठेत, म्हणूनच अंधारातून चालणारा मनुष्य फक्त दु:खाचा प्रवासी राहत नाही; तो नकळत स्वत:च्या आत असलेल्या प्रकाशाकडे प्रवास करत असतो.

**विस्मरण ही केवळ भावना नसते; तो आत्म्याचा पहिलावहिला प्रार्थनास्वर असतो.**

खरे अंधत्व डोळ्यांवर उतरलेल्या अंधारात नसते; ते जन्माला येते तेव्हा मन विस्मय अनुभवण्याची आपली क्षमता हरवून बसते. कारण दृष्टी हरवणे इतके भयावह नसते, जितके भयावह असते आत्म्याचे हळूहळू कठोर होत जाणे.

जेव्हा एखादा मनुष्य ताऱ्यांनी भरलेल्या आकाशाकडे पाहतो, पण त्याला अनंताची थरथर जाणवत नाही; जेव्हा समुद्राचा अथांग निळेपणा त्याच्या अंत:करणात एकही प्रश्न जागवत नाही; जेव्हा प्रार्थनेतील मौन त्याला रिकामे वाटते आणि कवितेतील वेदना त्याच्या आत्म्यापर्यंत पोहोचत नाही, तेव्हा समजावे, अंधार डोळ्यांत नाही, तो मनाच्या गाभाऱ्यात उतरला आहे.

विस्मय ही केवळ भावना नसते; तो आत्म्याचा पहिला प्रार्थनास्वर असतो आणि म्हणूनच ज्याच्या मनात विस्मय उरत नाही, त्याच्यासाठी जग हळूहळू फक्त वस्तूंचा, आवाजांचा आणि उपयोगितेचा निर्जीव पसारा बनत जातो.

जॉन मिल्टन ह्यांचे डोळे अंधाराने झाकले गेले होते; पण त्यांचा आत्मा अजूनही स्वर्गीय प्रकाशाने प्रदीप्त होत होता. बाह्य दृष्टी मावळली होती; पण अंतर्मनातील विश्व अधिक विशाल झाले होते. त्यांनी सूर्य पाहिला नाही, तरी त्यांना प्रकाश समजला; त्यांनी ईडन पाहिले नाही, तरी त्यांनी स्वर्गाचे सौंदर्य रेखाटले; त्यांनी देवदूतांना पाहिले नाही, तरी त्यांच्या पंखांचा नाद त्यांना ऐकू येत राहिला. काही वेळा डोळे उघडे असले, तरी आत्मा झोपलेला असतो आणि काही वेळा डोळे पूर्ण मिटलेले असतानाच मनुष्य प्रथमच खऱ्या अर्थाने पाहू लागतो.

कदाचित म्हणूनच देव कधीकधी मनुष्याचे बाह्य डोळे मिटवतो, शिक्षा म्हणून नव्हे; तर एका अधिक खोल प्रकाशाकडे नेण्यासाठी.

बाह्य दृष्टी अनेकदा आपल्याला दृश्यांच्या मोहात अडकवते; आपण आकार पाहतो, पण अर्थ हरवतो. आपण चेहरे ओळखतो, पण आत्मे समजत नाही. आपण जग मोजतो, पण त्यातील रहस्य अनुभवत नाही आणि मग देव हळूहळू बाहेरचे सर्व प्रकाश मंद करतो. त्यामुळे मनुष्य प्रथमच स्वत:च्या अंत:करणातील नि:शब्द आकाशाकडे पाहू शकेल. आध्यात्मिक जीवनातील सर्वांत मोठा चमत्कार हाच असावा की मनुष्य सर्व काही गमावल्यासारखा दिसत असतानाच, त्याला प्रथमच अनंताचे दर्शन घडू लागते. म्हणूनच मिल्टनचे अंधत्व हा पराभव नव्हता; ते एका उच्च दृष्टीचे द्वार होते.

कवी मिल्टन आपल्या कवितेत चिंतेचे रूपांतर देवावरील विश्वासात करतात. ती कविता सुरुवातीला ओळख आणि मान्यता मिळवण्याच्या आर्त हाकेसारखी सुरू होते, ती एका शांत, संयत आध्यात्मिक स्वीकारात विलीन होते. याचा अर्थ मिल्टनकडे आध्यात्मिक दृष्टी होती जी त्याच्या स्वार्थी, मोहाच्या अंधत्वावर मात करू शकत होती. शेवटी कमी असो वा अधिक, लवकर असो वा उशिरा, सर्व काही अत्यंत अचूक मोजमापातच घडते; अदृश्य करुणेने प्रत्येक क्षणाचे वजन आधीच ठरवलेले आहे.

मग मन हळूहळू शिकते की विलंब म्हणजे नकार नसतो आणि शांत प्रतीक्षा हीदेखील कृपेची एक भाषा असते; कारण ईश्वर घाईत फुले उमलवत नाही, तो प्रथम आत्म्याला फूल होण्याइतके विशाल बनवतो. कवी मिल्टन आपल्या अंधत्वामुळे आणखी एका सत्याची जाणीव करून देतो. भव्य स्वप्न डोळ्यांत घेऊनही मनुष्याला चालावे लागते एका अगदी सामान्य वाटेने. कारण अनंताकडे नेणारे मार्ग नेहमीच चमत्कारांनी उजळलेले नसतात; कधी कधी देव धुळीने भरलेल्या पावलांतूनच आपल्या नियतीचे संगीत घडवत असतो.

फक्त अंधार असो वा प्रकाश, निष्ठा जागृत ठेवायची, ती अखेरीस देवाच्या जवळ घेऊन जाते. कारण श्रद्धा म्हणजे विजयाच्या क्षणी उच्चारलेले गीत नव्हे; तर उत्तर न मिळालेल्या शांत रात्रीतही जिवंत राहणारी आत्म्याची अदृश्य ज्योत असते आणि हीच खरी आपली दृष्टी असते.

मोबाईल : 76 20 70 21 96 •


## ॲरॉन टूर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स

**आयोजक : श्री. मायकल बरबोज व सौ. आर्पिना बरबोज**
**मो. : 9850533214, 9284503961**

१) **मद्रास वेलंकनी नोव्हेना:** दि. २७ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०२६. एकूण खर्च रु. २९,५००/-. प्रत्येकी.३ ए. सी रेल्वे प्रवास-ए.सी. रूम-जेवण.रु. २४,५००/- प्रत्येकी.ए.सी. रूम व जेवण रु.१३,५००/- प्रत्येकी. ५ दिवस दि. २९ ऑगस्ट ते २ सप्टेंबर ए.सी रूम व जेवण रु. १५,५००/- प्रत्येकी, ६ दिवस, दि. ३ ते ८ सप्टेंबर ए.सी. रूम व जेवण. २ बेडरूम ४ जणांसाठी, ३ बेड ५ जणांसाठी व ४ बेड ६ जणांसाठी, डिलक्स रूम व दोघांसाठी एक्स्ट्रा चार्ज असेल. हॉटेल पिकनीक, मॉर्निंग स्टार चर्च जवळ.

२) **बडोदा (Statue of Unity) व सुरत सहल :** दि. १२ सप्टेंबर ते १४ सप्टेंबर २६. (गणपती सुट्टी) मुंबई-बडोदा वंदेभारत व सुरत-विरार. ए.सी.ट्रेन प्रवास. डिलक्स ३ स्टार हॉटेल. व्हेज-नॉनव्हेज बुफे. खर्च प्रत्येकी रु. १३,०००/-.

३) **सेंट ज्युड - झांशी :** दि. २४ ते २९ ऑक्टोबर २०२६.

४) **केरळ सहल :** दि. ५ ते १५ नोव्हेंबर २०२६. अर्नाकुलम १ रात्र, मुन्नार २ रात्र, टेकडी १ रात्र, अलप्पी १ रात्र, त्रिवेंद्रम २ रात्री, कन्याकुमारी १ रात्र. प्रवास ३ ए.सी., बस २ X २ AC पुश बॅक. एकूण खर्च रु. ४०,५००/- मात्र.

५) **कोकण-गोवा सहल:** दि. १६ नोव्हें. ते २२ नोव्हें. २०२६.

६) **दुबई-अबुधाबी :** दि. ५ जाने. २०२७ - ५ दिवस.

७) **राजस्थान :** दि. २८ जानेवारी २०२७

## जॉली टूर्स

१) **वेलंकनी मातेचा नोव्हेना :** (हॉटेल मॉर्निंग स्टार चर्चपासून १ मिनिटावर) : दि. २७ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०२६.

**संपूर्ण नोव्हेना :**
१) ए.सी. प्रवास व रूम रु. २७,५००/-
२) नॉन ए.सी. प्रवास व रूम रु. १८,५००/

**पाच दिवसांचा नोव्हेना :**
१) ए.सी. प्रवास व रूम रु. १८,५००/-.
२) नॉन ए.सी. प्रवास व रूम रु. १३,५००/-
३ किंवा चार व्यक्तीस एक रूम. स्वतंत्रपणे येणाऱ्यास राहण्याची व जेवणाची सुविधा उपलब्ध.

**पावसाळ्यातील सहली**

१) **महाबळेश्वर :** दि. ७ ते ९ ऑगस्ट २०२६. रु. १०५००/-.
२) **भंडारधरा :** दि. २२ ते २३ ऑगस्ट २०२६. रु. ६०००/-.

**दिवाळी सुट्टीतील सहली**

१) **केरळ दर्शन-त्रिवेंद्रम-कन्याकुमारी-अलेप्पी-कोचीन, टेक्कडी व मुन्नार :** दि. ५ ते १४नोव्हें.'२६. रु.३९०००/-.
२) **हैद्राबाद-रामोजी सिटी-स्नोवर्ल्ड-गोवळकोंडा सहल** दिनांक ७ ते १२ नोव्हेंबर २०२६. रु. १५५००/-.

**संपर्क :-** १) **श्री. डॉमणिक : 8087036615**
२) **श्री. लुईस : 9823844883**
३) **श्री. पिटर : 8806212751**

# मुलाखत : आमदार राजन नाईक (नालासोपारा मतदारसंघ)

-प्रा. विन्सेंट परेरा, नंदाखाल
-प्रा. शैला गोन्सालविस, उमराळे



**नालासोपारा-विरार विधानसभा - १३२ मतदार संघातून विधानसभा सदस्य म्हणून मतदारांनी आपली निवड कोणत्या अपेक्षेने केली असेल?**

* मतदार संघाची पुनर्रचना झाल्यावर वसई मतदार संघातून, लोकसंख्येच्या आधारे नालासोपारा-विरार हा नवीन मतदार संघ २००९मध्ये अस्तित्वात आला, ज्याची लोकसंख्या ६ लाख ६२ हजार आहे. नालासोपारा (पूर्व) विभागातून दोन वेळा म्हणजे १० वर्षे मी नगरसेवक म्हणून वसई-विरार महानगरपालिकेत निवडून गेलो होतो, त्यामुळे ह्या भागातील समस्या, अडचणी ह्याचा माझा अभ्यास होता. ह्या ठिकाणी नागरी सुविधांची बोंब होती, पिण्याचे पाणी नव्हते, दळणवळणासाठी नीट रस्ते नव्हते, गटार व्यवस्था नव्हती, प्रचंड प्रमाणात अनधिकृत बांधकामे होत होती. लोकसंख्या वाढीचा वेग देशात सर्वांत जास्त इथे होता. शाळा, हॉस्पिटल, खेळाची मैदाने, पार्क नव्हते, लोकसंख्येच्या मानाने पोलीस स्टेशन अपुरे होते.

मागील ३०-३५ वर्षे बहुजन विकास आघाडीकडे सत्ता होती परंतु त्यांनी ह्या समस्यांकडे पाहिजे तितके लक्ष दिले नाही. म्हणून ह्या मतदार संघातील मतदारांनी वरील समस्या मार्गी लावण्यासाठी मला विधानसभेत पाठवले आहे.

**आपल्या दृष्टीने ह्या मतदार संघातील चांगल्या बाजू कोणत्या?**

* पूर्व-पश्चिम पसरलेल्या ह्या मतदार संघाचा भू-भाग चांगला असून सोपारामध्ये बौद्ध स्तूप आहे. विरारला जीवदानी माता मंदिर, पूर्वेला तुंगारेश्वर अभयारण्य आहे तर पश्चिमेकडे विस्तीर्ण समुद्र किनारा आहे, जेथे चांगल्या नागरी सुविधांसह, पूर्व-पर्यटन विकास, कृषी पर्यटन, मॅग्रो पार्क, तलावाचे सुशोभीकरण आदी कामे करण्यास संधी आहे आणि त्यानुसार मी कामाला सुरुवात केली, MMRDA आणि जिल्हा नियोजन कमिटीतर्फे निधी उपलब्ध केला जाईल. लवकरच ह्या भागात ६५कोटी रुपये खर्च करून ITI इमारत बांधली जाणार आहे.

**आपल्या मतदारसंघातील ज्वलंत समस्या कोणत्या आहेत? त्या मार्गी लावण्यासाठी आपले काय प्रयत्न सुरू आहेत?**

* पिण्याच्या पाण्याची समस्या आहे. पंतप्रधान योजनेतून 'हर घर नळ योजना' मे २०२७पर्यंत पूर्ण केली जाईल. ग्रामीण भागात सुद्धा मे २७ पर्यंत पिण्याचे शुद्ध पाणी दिले जाईल. पूर्व-पश्चिम पूल उभारणे, काँक्रिटचे रस्ते बांधणे, सर्वांना पाईप गॅस सुविधा देण्यात येईल. मेडिकल कॉलेजचा पाठपुरावा करणे, आचोळे भागात ४०० बेडचे हॉस्पिटल मंजूर झाले आहे. वसईत लवकरच वसई पंचायत समितीच्या जागेत 'प्रशासकीय भवन' इमारत बांधून सर्व शासकीय कार्यालय एकाच ठिकाणी आणण्याचा प्रयत्न आहे.

**दोन वर्षांच्या कार्यकाळात आपण कोणत्या प्रश्नांचा पाठपुरावा केला?**

* आचोळा येथे 'नाट्यगृह' बांधण्यासाठी, स्पोर्ट कॉम्प्लेक्स उभारणार, सी एन जी फिलींग स्टेशन सर्व पेट्रोल पंपावर उपलब्ध करून देणार, रेल्वे ओव्हर ब्रिज बांधणार, जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून सर्वांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणार.

**आपल्या मतदार संघातील कोणत्या प्रश्नांची वाचा विधानसभेच्या अधिवेशनात फोडली?**

* कायदा सुव्यवस्था संदर्भात, जि. प. ११८ शाळा महानगरपालिकेकडे हस्तांतर करण्यासाठी, हॉस्पिटल महानगर पालिकेकडे वर्ग करण्याबाबत, वर्ग -२च्या जमिनी वर्ग -१ करणे, ओ. सी. धोरण ठरवणे, अनधिकृत बांधकामाला आळा घालणे, पूर्वीचे जुने बांधकाम आहे त्यावर अटी घालून नियमित करणे.

**आमदारांना आपल्या मतदारसंघाच्या विकासासाठी प्रतिवर्षी किती निधी दिला जातो? त्या निधीचा विनियोग आपण कोणत्या कामासाठी केला?**

* आमदारांना आपल्या मतदार संघाच्या विकासासाठी रुपये ५ कोटी वार्षिक निधी मिळतो. मतदार संघात आमदार

निधीतून जनतेसाठी २० बस स्टॉप बांधले आहेत. चौक सुशोभिकरण केले आहे. गटार / रस्त्यासाठी निधी दिला आहे. काही ठिकाणी रुग्णवाहिनी दिल्या आहेत. काही ठिकाणी चक्कर लाद्या बसवलेल्या आहेत.

**नुकताच महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या धर्म-स्वातंत्र्य विधेयकाबद्दल आपली काय भूमिका आहे?**

* विधेयक अतिशय चांगले असून कोणत्याही समुदायावर अन्याय, अत्याचार होणार नाही ह्याची काळजी घेतली गेली आहे. अल्पसंख्याक समाजाने तर अजिबात घाबरण्याचे कारण नाही. प्रत्येकाना आपला धर्म, श्रद्धा जपण्याचे स्वातंत्र्य हे विधेयक देते. वसईत फार पूर्वीपासून जातीय सलोखा आहे, तो टिकवून ठेवण्यासाठी मी वचनबद्ध आहे.

**वसईतील प्राचीन ख्रिस्ती मंदिरांच्या जीर्णोद्धाराविषयी व वसई किल्ल्यातील ऐतिहासिक वास्तुंसाठी शासनदरबारी आपण काय पाठपुरावा केला आहे?**

* वसईतील प्राचीन चर्च, मंदिरे, किल्ले ह्यांचे जतन करण्यासाठी पुरातन विभागाशी समन्वय सुरू आहे. सर्व ऐतिहासिक वास्तू व त्यांचे पावित्र्य जोपासले जाईल. सर्वधर्मीय सलोखा टिकवला जाईल. तुंगारेश्वर अभयारण्य जोपासले जाईल. पर्यावरणाची धोरणे, नियम पाळले जातील. सर्व जाती-धर्माचे लोक ह्या ठिकाणी एकमेकांना सांभाळून घेतील. त्यासाठी शासन दरबारी निधीची मागणी केली जाईल.

**वसईला सुंदर समुद्रकिनारा लाभलेला आहे. अलीकडच्या काळात ह्या ठिकाणी अनेक अनधिकृत बांधकामे झाली आहेत. अनैतिक धंदे सुरू आहेत, स्थानिक नागरिक हैराण आहेत, ह्याविषयी आपण काय भूमिका घेणार?**

* रिसॉर्ट संस्कृती फोफावली आहे. बाहेरून लोक ह्यासाठी पर्यटक म्हणून येत आहेत, स्थानिकांना ह्याचा खूप त्रास होतो हे मान्य आहे. प्रशासनाच्या मदतीने ह्यावर नक्कीच तोडगा काढू. नागरिकांना मी आवाहन करतो की अनधिकृत बांधकामे आणि अनैतिक धंदे ह्याविषयीची लेखी तक्रार संबंधित विभागात करावी व त्याची एक प्रत माझ्या कार्यालयात द्यावी. मी त्याचा पाठपुरावा करीन.

**अलीकडच्या वर्षात संपूर्ण वसई थोड्याशा पावसाने बुडते, रस्ते पाण्याखाली जातात, विजेचा गंभीर प्रश्न निर्माण होतो, पालिका हतबल आहे. आपण शासनाकडे ह्या विषयावर चर्चा केली आहे का?**

* ३०-३५ वर्षे ज्यांच्याकडे वसईची सत्ता होती त्यांनी ह्या विषयावर गंभीरतेने लक्ष दिले नाही. निरीच्या अहवालाची अंमलबजावणी केली नाही. अनधिकृत बांधकामे, जमीन भराव ह्याला अटकाव केला नाही, ह्याचा परिपाक म्हणजे पूर-परिस्थिती. ह्या वर्षीची दखल मा.पंतप्रधान व मा.मुख्यमंत्री ह्या दोघांनी घेतली आहे. लवकरच वसईतील विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी २११कोटी खर्च करून भूमिगत वीज वाहिन्या टाकण्याचे काम सुरू होईल. पालिकेच्या माध्यमातून रस्ते उंच करणे, नैसर्गिक नाले मोकळे करणे, रुंदीकरण करणे, निरीचा अहवाल अमलात आणणे ह्यासाठी पालिकेसोबत काम करू, लोकांचे जगणे सुसह्य करू.

**भारताच्या ७९व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त वसईकर जनतेला आपला काय संदेश आहे?**

* देशाचे भविष्य उज्ज्वल आहे. नजीकच्या काळात हा देश महासत्ता होईल. मा. पंतप्रधान व मा. मुख्यमंत्री ह्यांच्या स्वप्नातील देश व महाराष्ट्र राज्य विकसित करण्यासाठी आपण एकजुटीने काम करण्याचा निश्चय स्वातंत्र्यदिनी करू या! सर्वांना माझ्या ७९व्या स्वातंत्र्य दिनाच्या प्रेमळ शुभेच्छा!

**ऋणभरित निरोप**



**ख्रिस्तवासी फादर विल्यम फरेरा**
माळुंगी, मुळगाव
२१ जाने. १९४६ - २३ जुलै २०२६
गुरुदिक्षा : १९ एप्रिल १९७५
अंत्यविधी : शुक्र. २४ जुलै २०२६
भेटू या प्रार्थनेत व यथावकाश स्वर्गात...
**- सुवार्ता परिवार**

# मुलाखत : आमदार स्नेहा दुबे -पंडित (वसई मतदारसंघ)

**लॉना वाझ,** पापडी
**लुकस परेरा,** भुईगाव



**वसई मतदारसंघाच्या आमदार म्हणून मतदारांनी आपली निवड का केली, असे आपल्याला वाटते?**

* माझ्या मते, वसईकरांनी माझ्यावर विश्वास ठेवण्यामागे अनेक कारणे आहेत. सर्वप्रथम, माझी नाळ लहानपणापासून वसईशी जोडलेली आहे. दुसरे कारण म्हणजे माझे आई-वडील विवेक पंडित आणि विद्युलता पंडित ह्यांचे गेल्या ४४ वर्षांपासून सातत्याने सुरू असलेले समाजकार्य. आदिवासी, गोरगरीब, वंचित आणि अन्यायग्रस्तांसाठी त्यांनी केवळ वसईतच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रात केलेले कार्य जनतेने पाहिले आहे. माझे वडीलांनी वसईचे आमदार म्हणूनही लोकांच्या हक्कांसाठी टोकाचा संघर्ष केला. त्याचप्रमाणे, लग्नानंतर ज्या दुबे कुटुंबाची मी सून झाले, ते कुटुंबही वसईमध्ये अन्याय, गुंडगिरी आणि दहशत वादाविरोधात ठामपणे उभे राहणारे कुटुंब म्हणून ओळखले जाते. महत्त्वाचे म्हणजे भारतीय जनता पक्षाचे नेतृत्व, देशाचे पंतप्रधान सन्माननीय नरेंद्र मोदीजी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सन्माननीय देवेंद्र फडणवीसजी ह्यांच्या नेतृत्वावर वसईकरांचा विश्वास होता.

ह्याशिवाय, एक महिला आणि एक आई म्हणून महिलांच्या सन्मानासाठी व समानतेसाठी मी सातत्याने भूमिका घेतली. मुलांच्या नावामध्ये आईचे नाव अनिवार्य करण्याच्या ऐतिहासिक निर्णयासाठी केलेल्या माझ्या प्रयत्नांचीही जनतेने दखल घेतली. चळवळीतील कार्यकर्ती म्हणून माझी काम करण्याची पद्धत लोकांनी अनुभवली. म्हणूनच माझ्या प्रामाणिक प्रयत्नांवर, काम करण्याच्या क्षमतेवर आणि विकासाच्या दृष्टीकोनावर विश्वास ठेवून वसईकरांनी मला आमदार म्हणून निवडून दिले. त्यामुळे आजही मी स्वतःला केवळ लोकप्रतिनिधी म्हणून नव्हे, तर वसईकरांची सेवक आणि चळवळीतील एक कार्यकर्ती मानते.

**आपल्या दृष्टिने वसई मतदारसंघाच्या चांगल्या बाजू कोणत्या आहेत?**

* वसई हा महाराष्ट्रातील सर्वाधिक क्षमता असलेला मतदारसंघ आहे. निसर्ग, इतिहास, संस्कृती, उद्योग, शेती, मत्स्य व्यवसाय आणि शिक्षित तरुणाई ह्यांचा सुंदर संगम वसईमध्ये पाहायला मिळतो. योग्य नियोजन आणि दूरदृष्टी असेल, तर वसई हे महाराष्ट्रातील व देशातील सर्वांत विकसित आणि आदर्श शहर बनू शकते, असा माझा ठाम विश्वास आहे. एकात्मता, परस्पर विश्वास आणि सांस्कृतिक वैविध्य हीच वसईची खरी ओळख आहे.

**वसईसमोरील ज्वलंत समस्या कोणत्या आहेत? त्या सोडवण्यासाठी आपली भूमिका काय आहे?**

* आज वसईसमोरील सर्वांत मोठी समस्या म्हणजे रखडलेला पायाभूत सुविधांचा विकास. गेल्या अनेक वर्षांत वसईची लोकसंख्या झपाट्याने वाढली, उद्योग वाढले, नागरीकरण वेगाने झाले; परंतु त्याच प्रमाणात रस्ते, पूल, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, पावसाच्या पाण्याचा निचरा, आरोग्य, शिक्षण आणि इतर मूलभूत सुविधा विकसित झाल्या नाहीत. त्यामुळे आज वसईतील अनेक समस्या ह्या अपुऱ्या पायाभूत सुविधांमधूनच निर्माण झालेल्या आहेत. त्यामध्ये सर्वांत गंभीर प्रश्न म्हणजे दरवर्षी उद्‌भवणारी पूरस्थिती. ही केवळ नैसर्गिक आपत्ती नसून अनेक ठिकाणी ती मानवनिर्मित परिस्थिती आहे.

पाणीपुरवठा, वसईच्या पूर्व पट्ट्यात वाढत चाललेली अनधिकृत बांधकामे, वसईचा हरित पट्टा, नैसर्गिक परिसंस्था आणि पर्यावरणीय समतोल जपणे हीदेखील काळाची गरज आहे. आरोग्य सुविधांचा अभाव, शिक्षणाच्या क्षेत्रातही गंभीर आव्हाने आहेत. वसई-विरार महानगरपालिका स्थापन होऊनही अपेक्षित प्रमाणात स्वतःच्या शाळा सुरू केलेल्या नाहीत.

वसई हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा औद्योगिक पट्टा आहे. येथे हजारो लघु, मध्यम आणि मोठे उद्योग कार्यरत आहेत. वीजपुरवठ्यामुळे उद्योगांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागते.

घनकचरा व्यवस्थापन, नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित भटक्या कुत्र्यांचा आणि भटक्या जनावरांचा प्रश्न देखील गंभीर बनला आहे. आमदार म्हणून मी विधानसभा, मंत्रालय आणि संबंधित विभागांमध्ये सातत्याने वसईचे प्रश्न प्रभावीपणे मांडत आहे, शासनाकडे त्यांचा पाठपुरावा करत आहे आणि विविध विभागांमध्ये समन्वय घडवून आणण्यासाठी प्रयत्न करत आहे. एकात्मिक विकास आराखड्याच्या माध्यमातून तर वसईला पूरमुक्त, पाणीसमृद्ध, सक्षम पायाभूत सुविधांनी सुसज्ज, औद्योगिकदृष्ट्या सक्षम, पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि सर्वांगीण विकसित शहर बनवता येईल. हीच माझी आमदार म्हणून बांधिलकी आहे.

**ह्या दोन वर्षांच्या आमदारकीत आपण कोणत्या प्रश्नांना सर्वाधिक प्राधान्य दिले आहे?**

* माझ्या आमदारकीच्या दोन वर्षांच्या काळात भर वसईच्या पुढील अनेक दशकांचा विचार करून दीर्घकालीन आणि शाश्वत विकासाची

पायाभरणी करण्यावर राहिला आहे. आधी नमूद केल्याप्रमाणे सर्वप्रथम, वसईला दरवर्षी भेडसावणाऱ्या पूरस्थितीवर कायमस्वरूपी उपाय म्हणून एकात्मिक भूमिगत गटार व्यवस्था, आधुनिक स्टॉर्म वॉटर मॅनेजमेंट सिस्टम, नैसर्गिक जलप्रवाह आणि बावखलांचे संरक्षण ह्यांना मी सर्वोच्च प्राधान्य दिले.

दुसरे म्हणजे, पायाभूत सुविधांचा सर्वांगीण विकास. नियोजनबद्ध नागरी विकास, तसेच कोस्टल रोड आदी महत्त्वाच्या प्रकल्पांचा मी सातत्याने पाठपुरावा करत आहे.

वसईच्या सागरी किनाऱ्यांचे संरक्षण, जेट्टींची दुरुस्ती, मत्स्यव्यवसाय आणि पर्यटनाला चालना देणाऱ्या सुविधा उभारणे हेही माझ्या प्राधान्यक्रमात आहे.

आरोग्य आणि शिक्षण ह्या क्षेत्रात मल्टिस्पेशालिटी शासकीय रुग्णालये, जिल्हा परिषदेच्या ११६ शाळांचे वसई-विरार महानगरपालिकेकडे हस्तांतरण करून त्यांचा सर्वांगीण विकास करणे, तसेच मुंबई विद्यापीठाच्या वसई उपकेंद्रात प्रशासकीय सेवा सुरू करणे, हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

औद्योगिक विकास, अखंडित वीजपुरवठा, रोजगारनिर्मिती, पर्यावरण संरक्षण, हरित पट्टा, घनकचरा व्यवस्थापन आणि अनधिकृत बांधकामांवर प्रभावी नियंत्रण ह्यांनाही मी तितकेच महत्त्व दिले आहे.

क्रीडा क्षेत्राच्या विकासालाही मी प्राधान्य दिले आहे. महिला सक्षमीकरण हे माझ्या कामाचे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे.

ह्याशिवाय, वसईतील आदिवासी पाड्यांमधील मूलभूत सुविधा अधिक सक्षम करणे, रस्ते, पाणी, वीज, शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा त्या भागांपर्यंत पोहोचवणे, हेही प्राधान्यक्रमातील काम आहे.

माझ्या कामाचा सर्वांत महत्त्वाचा आधार म्हणजे जनसंवाद. मतदारसंघात विविध ठिकाणी जनसंवाद कार्यक्रमांचे आयोजन केले. ह्या माध्यमातून नागरिक, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी ह्यांच्यात समन्वय निर्माण झाला. लोकांचा विश्वास, प्रशासनाशी समन्वय आणि दीर्घकालीन विकास ह्या तीन तत्त्वांवर माझे काम उभे आहे.

**विधानसभेत आपण वसईचे कोणते प्रश्न प्रभावीपणे मांडले?**

* विधानसभेत वसईच्या जनतेचे प्रश्न मांडण्याची संधी मिळाली तेव्हा माझा प्रयत्न त्या प्रश्नांवर शासनाकडून ठोस निर्णय आणि निधी मिळवून देण्याचा राहिला आहे.

मी प्रामुख्याने वसईतील पूरस्थितीवर कायमस्वरूपी उपाययोजना, एकात्मिक भूमिगत गटार व्यवस्था, स्टॉर्म वॉटर मॅनेजमेंट सिस्टम, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, आरोग्य सुविधा, शिक्षण, औद्योगिक विकास, वाहतूक व पायाभूत सुविधा, किनारपट्टी संरक्षण, धूप प्रतिबंधक बंधारे, मत्स्यव्यवसाय, अनधिकृत बांधकामे, घनकचरा व्यवस्थापन, हरित पट्टा संरक्षण तसेच बावखलांचे संवर्धन आणि संरक्षण हे विषय विधानसभेत मांडले आहेत.

ह्याशिवाय, आदिवासी समाजाच्या मूलभूत सुविधा, युवकांसाठी रोजगार आणि क्रीडा सुविधांचा विकास ह्यांसारख्या विषयांचाही मी मागोवा घेत आहे.

लोकप्रतिनिधी म्हणून केवळ प्रश्न मांडणे पुरेसे नसते; त्या प्रश्नांचा सातत्याने पाठपुरावा करून त्यावर ठोस निर्णय आणि परिणाम घडवून आणणे हे अधिक महत्त्वाचे असते.

**आमदार निधीबाबत आपला दृष्टीकोन काय आहे?**

* आमदार निधी हा माझा पैसा नाही, तर जनतेचा पैसा आहे. त्यामुळे त्याचा प्रत्येक रुपया जनतेच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठीच खर्च झाला पाहिजे.

आमदार निधीचा वापर करताना मी जनसंवादातून नागरिकांनी मांडलेल्या समस्या, माझ्याकडे आलेली निवेदने तसेच गावभेटी आणि प्रत्यक्ष पाहणीदरम्यान समोर आलेल्या स्थानिक गरजांना प्राधान्य देते.

मतदारसंघाच्या विकासासाठी शासनाने दिलेल्या आमदार निधीचा एकही रुपया वाया जाऊ नये किंवा निधी परत जाऊ नये; तो पूर्णपणे लोकांच्या हितासाठी वापरला गेला पाहिजे, हा माझा आग्रह असतो.

मात्र, विकास म्हणजे केवळ आमदार निधी खर्च करणे नाही. आमदाराची खरी जबाबदारी म्हणजे शासनाच्या विविध विभागांकडून आपल्या मतदारसंघासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून आणणे. गेल्या दीड-दोन वर्षांत नगरविकास विभाग, ग्रामविकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD), महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड (MMB) तसेच इतर विभागांकडे सातत्याने पाठपुरावा करून वसईच्या विकासासाठी सुमारे ७३ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यात यश आले आहे.

ह्या निधीतून अनेक विकासकामे सुरू झाली, पूर्ण झाली आणि उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. विकास करताना शहर आणि ग्रामीण भाग ह्यांच्यात समतोल राखणे हेही माझ्यासाठी तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे शहरी भागाबरोबरच ग्रामपंचायत क्षेत्रांतील नागरिकांनाही विकासकामांचा समान लाभ मिळावा, ह्यासाठी मी प्रयत्नशील आहे.

**वसईतील महिलांच्या प्रश्नांबाबत आपली धारणा काय आहे?**

* महिलांचे सक्षमीकरण म्हणजे त्यांना आर्थिक, सामाजिक आणि नेतृत्वाच्या पातळीवर सक्षम करणे. समाजाच्या विकासात महिलांचा सहभाग जितका वाढेल, तितका समाज अधिक सक्षम आणि प्रगत होईल.

महिलांना केवळ लाभार्थी म्हणून नव्हे, तर विकास प्रक्रियेतील सक्रिय भागीदार म्हणून सक्षम करणे आवश्यक आहे. वसईतील महिला शिक्षण, नोकरी, व्यवसाय आणि इतर कारणांसाठी दररोज प्रवास करतात. त्यामुळे त्यांना सुरक्षित, परवडणारी आणि विश्वासार्ह सार्वजनिक परिवहन सेवा उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक आहे.

सार्वजनिक ठिकाणी आणि संवेदनशील भागांमध्ये पोलिसांचे पेट्रोलिंग वाढावे, पोलिस यंत्रणा अधिक सक्षम व्हावी आणि महिलांना सुरक्षित वातावरण मिळावे, ह्यासाठी पोलिस प्रशासनाशी सातत्याने समन्वय साधून आवश्यक पाठपुरावा करत असते.

त्यामुळे वसईतील प्रत्येक महिलेला अधिक सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि स्वावलंबी बनवण्यासाठी माझे प्रयत्न पुढेही सातत्याने सुरू राहतील.

**धर्मस्वातंत्र्य विधेयकाबाबत आपली भूमिका काय आहे?**

* माझी भूमिका अत्यंत स्पष्ट आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला आपल्या श्रद्धेनुसार धर्म मानण्याचे आणि आचरण करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. मात्र हे स्वातंत्र्य पूर्णपणे स्वेच्छेवर आधारित असले पाहिजे. कोणत्याही प्रकारचे बळजबरीने, फसवणूक करून, आमिष दाखवून किंवा दबाव टाकून धर्मांतर करणे हे संविधानाच्या भावनेलाही आणि सामाजिक सलोख्यालाही बाधा पोहोचवणारे आहे.

धर्मस्वातंत्र्य विधेयकाचा उद्देश कोणत्याही धर्माच्या विरोधात नसून, प्रत्येक नागरिकाच्या स्वतंत्र निर्णयाच्या अधिकाराचे संरक्षण करणे हा आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या विवेकाने धर्म स्वीकारण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार आहे; परंतु तो निर्णय कोणत्याही दबाव, प्रलोभन किंवा फसवणुकीशिवाय घेतला गेला पाहिजे.

विविधतेत एकता ही भारताची ओळख आहे. आपल्या देशात सर्व धर्मांचा समान आदर केला जातो आणि ही परंपरा कायम राखणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे समाजात विश्वास, सलोखा आणि परस्पर सन्मानाचे वातावरण टिकवून ठेवणे तितकेच आवश्यक आहे.

**वसईतील ऐतिहासिक व धार्मिक वारशासाठी आपण काय करत आहात?**

* वसई ही केवळ वेगाने विकसित होणारी नगरी नाही, तर इतिहास, संस्कृती आणि विविध धार्मिक परंपरांचा समृद्ध वारसा लाभलेली भूमी आहे. त्यामुळे विकासाबरोबरच हा वारसा जतन करणे हीदेखील आपली सामूहिक जबाबदारी आहे.

वसईचा ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा जपण्यासाठी वसई किल्ला, अर्नाळा किल्ला, प्राचीन मंदिरे, निर्मळ तलाव, आद्य शंकराचार्य परंपरेशी संबंधित स्थळे, बौद्ध स्तूप, पोर्तुगीजकालीन चर्च तसेच इतर ऐतिहासिक वास्तूंचे संरक्षण, संवर्धन आणि जतन व्हावे, ह्यासाठी मी प्रयत्न करत आहे.

ज्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक स्थळांना आवश्यक निकष पूर्ण करता येतील, अशा स्थळांना वारसा स्थळ (Heritage) म्हणून मान्यता मिळावी, त्यांच्या संवर्धनासाठी आवश्यक निधी उपलब्ध व्हावा आणि शासनाच्या विविध विभागांमार्फत त्यांचे संरक्षण अधिक प्रभावीपणे व्हावे, यासाठी मी पाठपुरावा करत आहे. तसेच या ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांचा विकास वारसा पर्यटन (Heritage Tourism) आणि धार्मिक पर्यटन ह्या दृष्टीने व्हावा, स्थानिक नागरिकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि देश-विदेशातील पर्यटकांना वसईचा समृद्ध इतिहास, विविध धार्मिक परंपरा आणि सांस्कृतिक वैभव अनुभवता यावे, ह्यासाठीही माझे विशेष प्रयत्न सुरू आहेत.

**वसईमध्ये सर्वधर्मीय सलोखा कसा वाढवता येईल?**

* वसईची ओळख ही सर्वधर्मीय सलोखा, परस्पर सन्मान आणि सामाजिक ऐक्य ह्यासाठी आहे. पिढ्यान्‌पिढ्या हिंदू, कॅथलिक, मुस्लिम, बोहरी, शीख, जैन, बौद्ध तसेच इतर समाजांचे नागरिक येथे गुण्यागोविंदाने एकत्र राहत आले आहेत. हीच वसईची खरी ताकद आहे आणि ती पुढील पिढ्यांपर्यंत टिकवून ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

सर्वधर्मीय सलोखा टिकवण्याचा सर्वांत प्रभावी मार्ग म्हणजे प्रत्येक नागरिकामध्ये ‘राष्ट्रप्रथम’ ही भावना दृढ करणे. जेव्हा आपल्या देशाविषयी अभिमान, प्रेम आणि कर्तव्याची जाणीव प्रत्येकाच्या मनात असते, तेव्हा धर्म, जात आणि इतर भेद आपोआप दुय्यम ठरतात. तसेच विविध समाजांचे सांस्कृतिक आणि धार्मिक उत्सव ह्यांमध्ये सहभागी होऊन समाजांमध्ये परस्पर विश्वास आणि संवाद अधिक दृढ करण्याचा मी प्रयत्न करत असते.

माझा ठाम विश्वास आहे की सर्वधर्मस्नेहभाव, परस्पर आदर, राष्ट्रप्रेम आणि संवाद हीच वसईच्या सामाजिक ऐक्याची खरी ताकद आहे. ही परंपरा अधिक समृद्ध करण्यासाठी माझे प्रयत्न ह्यापुढेही सुरू राहतील.

**स्वातंत्र्यदिनानिमित्त वसईकरांना आपला संदेश?**

* सर्वप्रथम, भारताच्या ७९व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त वसईतील सर्व नागरिकांना माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

स्वातंत्र्य ही केवळ आपल्याला मिळालेली भेट नाही, तर असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यवीरांच्या त्याग, बलिदान आणि संघर्षातून मिळालेली अमूल्य ठेव आहे. ह्या देशासाठी अनेकांनी संपूर्ण तारुण्य राष्ट्रासाठी अर्पण केले. त्यांच्या त्यागामुळेच आज आपण मुक्त भारतात स्वाभिमानाने जगत आहोत. अलीकडेच वसईने पूरपरिस्थितीसारख्या मोठ्या संकटाचा सामना केला. आपण प्रत्येकाने आपल्या स्तरावर छोटासा का होईना बदल घडवला, तर स्वच्छ, सुंदर, सुरक्षित, विकसित आणि पूरमुक्त वसई घडवणे निश्चितच शक्य आहे.

आपल्या वसईची आमदार म्हणून मी वसईतील प्रत्येक नागरिकाच्या सुख-दुःखात कायम तुमच्यासोबत उभी राहीन आणि पूर्ण समर्पणाने कार्य करत राहीन, हेच वचन ह्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने मी आपणा सर्वांना देते. वंदे मातरम्! ●

# ए आयच्या जगात, आम्ही अश्मयुगात

-स्टॅन्ली गोन्सालविस
पापडी



यंदा मार्च-एप्रिलपासूनच ‘एल निनो’चा राक्षस बाटलीतून डोके वर काढू लागला होता. घरात उष्णतेच्या झळा, घराबाहेर उन्हाचे आगजाळ चटके. एकदाचे जून अखेरीस - आज, उद्या येणार असे वेधशाळेचे सर्व आडाखे चुकवित वर्षाऋतुचे आगमन झाले. कोणी यंदा दुष्काळाचे, तर कोणी सरासरीपेक्षा कमी पावसाचे भविष्य वर्तविले होते. ते तूर्तास खोटे ठरवित पाऊस बरसत राहिला. तो जुलैच्या चार तारखेपासून सात-आठ तारखेपर्यंत अन् अख्खे शहर त्या पूर-महापुरात गटांगळ्या खात राहिले.

वसई-विरारच्या पश्चिमेला एकही नदी नसताना प्रत्येक रस्ता दुथडी भरून वाहत होता. त्याच्या विळख्यात घरे, दुकाने, बागायती पुरती भोवंडून निघाली. ह्या पावसात जनजीवन विस्कळीतच नव्हे; तर पूर्णत: विस्कटून गेले होते. रोजंदारीवर राबणारे मुकाट हात चोळीत बसले. नोकरदार बस-रिक्षा अभावी घरात अडकले. दैनंदिन गरजांसाठी घराबाहेर पडण्याची कोणाची टाप नव्हती. अस्वस्थ रुग्णांस रुग्णालयात जाणे महाकठीण होऊन बसले. रस्त्यावरून वाहणारे मैलायुक्त पाणी, प्लॅस्टिक व इतर गावकचरा अनेकांच्या घरातही शिरला. रस्त्याकाठची दुकाने पाण्याने भरली. चुळणे, भाबोळा, सनसिटी, गास व मिठागर परिसरात तर घर-घर पाण्यात!

विजेचा लपंडाव, खेळखंडोबा तसा नेहमीचाच. अखंडितपणे खंडित होते ती आपली वीज पुरवठा व्यवस्था. कोणा मर्जीतील उद्योगपतीचा उद्योग विस्तार (आणि नेत्यांची खिसेभरणी) होण्यासाठी ग्राहकांच्या माथी स्मार्ट मिटर मारण्याचा अट्टाहास धरणारी वीज वितरण कंपनी एकही दिवस चोवीस तास अखंडपणे वीज पुरवू शकत नसेल, तर तो स्मार्टनेस फुकाचा नाही का? ही कंपनी ग्राहकांना वीज पुरवठा खंडित होण्याची (देखभाल, दुरुस्ती वा तांत्रिक, नैसर्गिक आपत्तीमुळे) सूचना आणि पुरवठा सुरळीत होण्याची संभाव्य वेळ इत्यादी माहिती लघु संदेश, व्हॉट्सॲप द्वारे देऊ शकत नाही का? दर महिन्याला वाढीव वीज देयके पाठवत राहणे, हीच का त्यांची जबाबदारी?

सर्व शासकीय यंत्रणा दरवर्षी अगदी नेमाने फेब्रुवारीपासून मान्सूनपूर्व कामाचा वाजतगाजत धुमधडाका (ऊर्फ कंत्राटांची खैरात) सुरू करतात. गटार सफाई, नाले सफाई, धोकादायक वृक्षांची तोड, फांद्या छाटणी, तसेच वीज यंत्रणेची दुरुस्ती इत्यादी कामांची फोटोसहित प्रसिद्धी केली जाते. सर्व संबंधित ह्या फोटो सेशनला सजून-धजून हजर असतात. ‘आधी केले मग सांगितले’ हा संत उपदेश आता विस्मरणात जाऊन प्रत्यक्ष कामापेक्षा तसे केल्याचा देखावा उभा करणे हा नागरिकांना भुलविण्याचा मंत्र बनला आहे. मूढ सामान्य जन अशा विकास गाथा ऐकून-पाहून भारावतात आणि दहा ठिकाणी ते फॉरवर्ड करीत बसतात.

आपत्ती व्यवस्थापनाचे ढोलही असेच पावसाळ्या आधीपासून माध्यमांतून वाजवले जात होते. ह्या यंत्रणेतून किती आपत्तीग्रस्तांना दिलासा मिळाला, ह्याचाही लेखाजोखा जाहीर करण्यात यावा. जिथे तिथे पाण्यात अडकलेल्या लोकांना ट्रॅक्टरमधून सुरक्षित स्थळी नेल्याची सचित्र बातमी झाली. नाडलेल्यांचा गैरफायदा घेऊन अवाजवी भाडे आकारले गेले. जनावरांची वाहतुकही ट्रॅक्टरमधून करण्याची परवानगी नसताना ट्रॅक्टरला प्रवाशी वाहतुकीचा परवाना कधी देण्यात आला? प्रवाशी सुरक्षितता पाण्यात सोडली जात असताना आपत्ती व्यवस्थापन कक्ष काय करीत होता? ज्यांच्या घरात, दुकानात दरवर्षी पावसाळी पाणी शिरते त्यांना आपत्तीमुक्त करण्याचा विचार व तशी कृती कधी होणार? की फक्त आश्वासनांचा वर्षाव होत राहणार?

मान्सूनपूर्व तयारीची ही साग्रसंगीत धूळफेक पावसाच्या तडाख्याने त्या पाणलोटाबरोबर वाहून जाते. खर्च केलेल्या करोडोंतून काही कंत्राटदारांचे नशीब उजळते; तर टक्केवारीच्या हिशोबात संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधींची उत्तम बेगमी होऊन जाते, असे त्या कंत्राटदार संघटनेने नुकताच जाहीरपणे सांगितले आहे. नागरिकांचे जीवन मात्र वाऱ्या-पाण्यावर!

पर्यावरणतज्ज्ञ आणि स्थानिक भूमिपुत्र गेली कित्येक वर्षे नियोजनशून्य व अनियंत्रित विकास प्रकल्पांविरुद्ध आंदोलने करीत आहेत. हरित वसई संरक्षण समितीने येणाऱ्या कळीकाळाचा इशारा सातत्याने दिला होता. बुडणारे शहर आणि धुवून जात असलेली शेती-बागायती हे त्याचे दृश्य फलित नजरेसमोर असताना आमचे लोकप्रतिनिधी, शहर नियोजनकार आणि ‘नीट’पणे स्पर्धा

परीक्षा उत्तीर्ण होऊन उच्च स्थानी बसलेले सनदी अधिकारी डोळ्यांवर कातडे ओढून का बसले आहेत? कोणत्याही राजकीय पक्षाला लोकमताची फिकीर नसावी? फक्त निवडणुकीपुरती मतदारांची भरघोस आश्वासने देऊन ओवाळणी करायची आणि नंतरची पाच वर्षे विकास पर्वात सहभागी होऊन मलिदा लाटायचा.

वर्षानुवर्षे हा खेळ असाच चालू आहे. आम्ही सारे धर्मपारायण. दैवाधीन. पावसासाठी देवाकडे प्रार्थना करतो. अतिवृष्टीचे संकट टळावे म्हणूनही त्यालाच साकडे घालतो. निसर्गापुढे कोणाचे काय चालणार? म्हणत सर्व अस्मानी-सुलतानीचा 'आलिया भोगासी' स्वीकार करून पोटापाण्याच्या उद्योगाला लागतो. ही आमची अगतिकता की परिस्थिती शरणता?

आज जगभर एआयचा बोलबाला आहे. ह्या नवतंत्रज्ञानाद्वारे मानवी जीवन अधिक सुलभ आणि सुखकर करण्याचे प्रयत्न पाश्चात्त्य राष्ट्रांतून सुरू आहेत. आपलाही देश फाईव्ह ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करू लागल्याचे प्रचार यंत्रणा सांगत असताना अत्यावश्यक सुधारणा, विकासापासून आम्ही शतयोजने दूर! गगनभेदी गृहसंकुले हाच तेवढा निवडकांचा विकास! इथल्या सामान्य नागरिकांचे जीवन सुरक्षित व्हावे, त्यांना माणसासारखे सन्मानाने जगता यावे असे कोणालाच का वाटत नाही? ह्या आधुनिक जगात आम्ही बापुडे अजुनि अश्मयुगात!

मोबाईल : 83 90 70 60 13 ●

दर्शन

# परिस्थिती : जीवनातील गुरू

**-जॉन लुईस परेरा**
घोसाळी, नंदाखाल

जुलै महिन्यात ५ ते ८ ह्या ४ दिवसांत वसईकरांना एका अशा अनुभवांतून जावे लागले ती केवळ वीज व इंटरनेट ह्यांच्या अभावाची अनुभूती नव्हती, तर आधुनिक जीवन हे तंत्रज्ञानावर किती विसंबून आहे, ह्याचे ते ओझरते दर्शन होते. सलग चार दिवस मुसळधार पावसामुळे वीजपुरवठा खंडित झाला, मोबाईल फोन अनेक वर्षांपासून आपला मित्र बनला होता तो अचानक आपल्यापासून दूर गेला, वीज आणि इंटरनेटनेही साथ सोडली. काही तास नव्हे; तर सलग तीन ते चार दिवस अंधारात आणि संपर्कविहीन अवस्थेत राहावे लागले. क्षणार्धात गतिमान आयुष्य थांबले.

आजचे काम हे इंटरनेटवर अवलंबून असल्याने नेटवर्क येण्यास थोडा उशीर झाला तरी माणसाची लगेच तारांबळ उडते. स्वयंपाकघरापासून बँक आणि इतर कार्यालयीन कामकाजापर्यंत सर्व काही विजेवर आणि डिजिटल व्यवस्थेवर विसंबून असल्याने ह्या तीन दिवसांत



अनेकांना जाणीव झाली की आपण वीज आणि तंत्रज्ञानावर किती अवलंबून आहोत.

ऑनलाईन व्यवहार ठप्प झाले. शाळा-कॉलेज बंद पडली. घराघरांत मेणबत्त्या, दिवे आणि बॅटऱ्या ह्यांनी जुन्या काळाची आठवण करून दिली. जो अंधार आपण अनुभवला तो केवळ विजेचा नव्हता; तर आधुनिक सुविधा ज्या काही कारणास्तव अचानक थांबल्या तर आपल्या होणाऱ्या केविलवाण्या परिस्थितीचा होता.

अनेक वर्षे नोकरी-धंद्यात दंग असल्याने जे कुणी कुटुंबाला जास्तीत जास्त वेळ देऊ शकले नाहीत, त्यांच्यासाठी हा अवधी सुवर्णकाळ ठरला. अनेक कुटुंबे वर्षानुवर्षांनी एकत्र बसून निवांत गप्पा मारताना दिसली. मुलांनी मोबाईलऐवजी आजी-आजोबांच्या सहवासाला पसंती दिली. तंत्रज्ञानाने निर्माण केलेले अदृश्य अंतर काही काळासाठी तरी दूर गेले आणि माणूस पुन्हा माणसाजवळ आला. आज आपण कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल अर्थव्यवस्था आणि स्मार्ट शहरांच्या दिशेने वाटचाल करत आहोत. पण आपली खरी ताकद केवळ तंत्रज्ञानात नसावी; ती संकटसमयी उद्भवलेल्या अशा बिकट परिस्थितीला तोंड देणाऱ्या मानवी मूल्यांची असावी. संयम, सहकार्य आणि प्रतिकूल परिस्थितीतही धैर्याने उभे राहण्याची वृत्ती हीच खरी आपली जमेची बाजू आहे.

''परिस्थिती हीच जीवनातील सर्वोत्तम गुरू असते; ती जे शिकवते, ते कोणतेही पुस्तक शिकवू शकत नाही.''

मोबाईल : 90 96 98 29 85 ●

प्रासंगिक

# अतिवृष्टीने उभी केलेली आव्हाने

-स्टीफन एम. परेरा
मर्सिस



सद्याचा प्रत्येक पावसाळा वसईकरांना धडकी भरवणारा ठरत आहे. अगदी किरकोळ पावसानेही तुंबणारे लहानमोठे रस्ते, त्यातले खड्डे, झाकणे गायब झाल्यामुळे गटारांच्या मॅनहोल्समधून वाहून जाण्याचा धोका, पाण्यात वीजप्रवाह उतरल्यामुळे कोणत्याही क्षणी पडणारी मृत्यूची झडप अशा परिस्थितीत सर्वसामान्य माणसाला जीव मुठीत धरूनच घराबाहेर पडावे लागते.

५ जुलैपासून अडीच दिवसांत वसई-विरारमध्ये ७५० मि.मि. पाऊस कोसळला. त्यात वसईच्या 'विकासाचे गाजर' बुडून सडले. नैसर्गिक निचऱ्याचे मार्ग विचारात न घेता अनिर्बंध इमारती संकुले उभारल्याने चुळणे गाव, पार्वती क्रॉस, वसंत नगरी, एव्हरशाईन, गास, नालासोपारा, बोळींज आदी गावे सालाबादप्रमाणे पाण्याखाली गेली.

पिण्याचे पाणी व आरोग्यविषयक अनेक प्रश्न निर्माण झाले. कित्येक कुटुंबांना नातेवाईकांकडे व हॉटेल्समध्ये आश्रय घ्यावा लागला.

पश्चिम पट्ट्यात पूर्वापार गावा-गावातली बावखले, त्यातले अधिकचे पाणी वाहून नेणाऱ्या 'बिदी', मग छोटे-मोठे तलाव, नंतर भाताच्या शेत जमिनी व शेवटी समुद्राजवळची विस्तीर्ण खाजण जमीन अशा पद्धतीने, विशिष्ट भौगोलिक रचनेमुळे दक्षिणोत्तर मार्गांनी पावसाळी पाण्याचा निचरा होत असतो. मात्र प्रशासनाकडून ह्या पारंपरिक निचरामार्गांची वेळच्या वेळी देखभाल ठेवली जात नाही.

**उपाययोजना**

१) गावागावांतील निचरा रचनेत बावखले, लहान-मोठे तलाव व विस्तीर्ण शेतजमिनी, समुद्रालगतचे खाजण भाग ही धारणक्षेत्रांची (होल्डींग पॉंड) साखळी महत्त्वाची भूमिका बजावित असते. कारण त्यात पावसाचे अधिकचे पाणी साठून, नंतर सावकाशीने ते समुद्रात वाहून जाते. त्यामुळे वरच्या भागातील गावे बाधित होत नाहीत. ह्या साखळीतील बावखले, लहान तलाव व शेते ही खाजगी मालकीची आहेत. नजिकच्या काळात ह्या मालमत्तांमध्ये बांधकामे झाल्यास निचऱ्याचे मार्गच बंद होऊन गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. शासनाच्या मदतीने लोकसहभागाद्वारे खाजगी जमिनींतून गेलेले हे मार्ग सुस्थापित करता येतील का?

२) हरित पट्ट्यातील नागरिकरणाचा झपाटा लक्षात घेऊन अर्नाळ्यापासून पाली - मुळगाव - नायगावपर्यंतच्या समुद्रालगतच्या खाजण जमिनीत संरक्षित धारणतलाव निर्माण करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करता येईल.

**वसईतील पावसाळ्यातील पूरग्रस्त परिस्थितीवर काही उपाययोजना**

३) सद्या अस्तित्वात असलेले निचरामार्ग नियमितपणे स्वच्छ व खोल करता येतील. निचरामार्गाच्या खाजण जमिनीकडील मुखाशी अनेक ठिकाणी खारफुटी (मॅन्ग्रुव्ह)ची बेटे तयार झाली आहेत. शासनाच्या मदतीने ती मुखे स्वच्छ केल्यास जलदगतीने पाण्याचा निचरा होऊ शकतो.

४) शेतीवाडीतील झावळ्या, पालापाचोळा व प्लॅस्टिक-थर्माकोल इत्यादी कचऱ्याचे ढीग बंगल्याबाहेर रस्त्यावर रचण्याची एक 'नवी पद्धत' गावागावांत सुरू झाली आहे. हा कचरा वाहत जाऊन पुढे निचरामार्गात अडकतो. हे ताबडतोब थांबणे आवश्यक आहे.

५) काही ठिकाणी खाजगी मालमत्तेतून जाणाऱ्या पारंपरिक निचरा मार्गात भराव घातले आहेत वा बांधकामे झाली आहेत अशा ठिकाणी जुन्याजाणत्या माणसांच्या मार्गदर्शनाने, भौगोलिक उतारानुसार पर्यायी निचरामार्गाचा विचार करता येईल.

६) ह्यासाठी स्थानिक नगरसेवक, ज्येष्ठ नेते, कार्यकर्ते व तज्ज्ञांचा सहभाग असलेली एक 'मध्यवर्ती कृती समिती' व त्या संलग्न प्रत्येक पॅरिशच्या गावगटानिहाय कृती समित्या गठीत करून जागरूक नागरिकांचा एक दबावगट निर्माण करावा.

सार्वजनिक असते ते व्यक्तिश: कुणाचेच नसते. त्यामुळे 'मांजराच्या गळ्यात घंटा' बांधायचे राहून जाते आणि प्रश्नांचे घोंघडे भिजत पडते. त्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज असते. शासनाचे अधिकारी पगारी नोकर! आपल्या प्रश्नांशी त्यांना देणेघेणे आणि उत्तरदायित्वही नसते. म्हणून आपले प्रश्न आपल्यालाच योग्य अधिकाऱ्यांकडे चिकाटीने पाठपुरावा करून सोडवून घ्यावे लागतात. भविष्यात उद्‌भवणाऱ्या भीषण पूरस्थितीचा आताच विचार करून आपल्या अंगणाशी येऊन धडकलेल्या प्रश्नांना भिडण्याशिवाय गत्यंतर नाही.

मोबाईल : 96 89 08 57 68

समस्या

# मासेमारी बंदीत वाढ, एक स्वागतार्ह निर्णय

-डॅनिअल डी. सांबऱ्या
उत्तन



पूर्वी महाराष्ट्र राज्यातील मासेमारी बंदी कालावधी १ जून ते ३१ जुलै असा एकूण ६१ दिवसांचा होता. नवीन निर्णयानुसार ह्या कालावधीत १५ दिवसांची वाढ करण्यात आल्याने आता मासेमारी बंदी १ जून ते १५ ऑगस्ट असा एकूण ७६ दिवसांचा झाला आहे. मासळीचे प्रजनन सुखरूप होण्यासाठी मच्छीमार संघटना व अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीने शासनाकडे १५ ऑगस्टपर्यंत मासेमारी बंदी वाढविण्याची मागणी अनेक वर्षांपासून लावून धरली होती. त्या अनुषंगाने मासेमारी बंदी कालावधीत १५ ऑगस्टपर्यंत वाढ केली आहे.

मासेमारी बंदीत वाढ झाल्यामुळे माशांच्या प्रजनन प्रक्रियेला वेळ मिळणार आहे. तसेच माशांचे जतन होण्यास मदत होणार आहे. ह्यामुळे अधिक प्रमाणात मासळी उपलब्ध होऊन त्याचा फायदा मच्छीमारांना होणार आहे.

पावसाळी मासेमारी बंदी कालावधी कमी असल्याने माशांच्या वाढीसाठी पुरेसा कालावधी मिळत नाही. ह्या काळात मासेमारी सुरू राहिल्यास मासळीची लहान पिल्ले नाहक मारली जातात. अशाने माशांचे उत्पादन थांबते. त्यामुळे मासळी दुष्काळ उद्भवू शकतो. म्हणून मासळीच्या वाढीसाठी १५ ऑगस्टपर्यंतचा बंदी कालावधी उचित आहे, असे समुद्र शास्त्रज्ञाचे म्हणणे आहे. माशांच्या पिल्लांची पुरेशी वाढ होण्यासाठी हा काळ काहीसा समाधानकारक मानला जातो.

ऑगस्ट महिना हा पावसाळ्याचा महिना असल्याने ह्या महिन्यामध्ये सुरुवातीला पावसाबरोबरच समुद्रातील वादळापुढे मासेमारी बोटींना सामोरे जावे लागते. अनेकदा समुद्रातील वादळात सापडून मासेमारी बोटीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. तसेच ह्या कालावधीत बोटीमधील मच्छीमारांची जीवित हानीदेखील झाल्याच्या घटना घडल्या आहे. ह्या सर्व गोष्टींचा विचार करून राज्य शासनाने मासेमारी बंदीत १५ ऑगस्टपर्यंत केलेली वाढ योग्य असल्याचे मच्छीमारांचे म्हणणे आहे.

**नवीन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यातील पावसाळ्यातील मासेमारी बंदी कालावधी १ जूनपासून एकूण ७६ दिवसांचा झालेला आहे.**

गुजरात राज्याने मत्स्य उत्पादन वाढीसाठी १५ ऑगस्टपर्यंतची ७६ दिवसांची मासेमारी बंदी यशस्वीरित्या लागू केली आहे. ह्याच धर्तीवर महाराष्ट्रातही बंदीचा कालावधी १५ ऑगस्टपर्यंत वाढविणे योग्य आहे असे वाटते.

मासेमारी बंदीच्या काळात परराज्यातील मासेमारी बोटी महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर मासेमारी करताना आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा शासनाने दिला आहे. ह्याचा अर्थ महाराष्ट्राशेजारील गोवा, केरळ, कर्नाटक आदी सागरी राज्यांचा मासेमारी बंदी कालावधी आपल्यापेक्षा लवकर संपत असल्याने त्यांचे ट्रॉलर्स महाराष्ट्राच्या सागरी हद्दीत घुसून मासळीची लूट करतील. म्हणजेच आपण जोपासलेली मासळी हे परप्रांतीय ट्रॉलर्स ओरबाडून नेतील असा होतो. ह्यामुळे आपल्या मच्छीमारांना मिळायची मासळी ते आधीच पकडून नेत असल्याने त्याचा फटका महाराष्ट्रातील मच्छीमारांना बसणार आहे.

परप्रांतीयांच्या घुसखोरीमुळे मासेमारी बंदीतील वाढ त्यांच्या पथ्यावर पडत असेल तर महाराष्ट्रातील वाढीव मासेमारी बंदीचा मूळ उद्देश सफल होणार नाही. प्रत्यक्षात मत्स्य विभागाच्या गस्ती नौकांना पावसाळ्यात सागरी गस्तीस शासनाची परवानगी नसल्याने त्या किनाऱ्यावरच थांबून आहेत. अशा बेकायदेशीररीत्या मासेमारी करणाऱ्या बोटीवर कारवाई कशी होणार, असा सवाल मच्छीमारांनी उपस्थित केला आहे.

मोबाईल : 99 87 27 18 98

**चिंतन**

# गाढव!

**-फादर (डॉ.) शैलेंद्र रॉड्रिग्ज**
नंदाखाल / बनारस



भल्या शोमरोनीच्या दृष्टांतात एक उपेक्षित व दुर्लक्षित व्यक्ती आहे, त्याचबरोबर एक उपेक्षित व दुर्लक्षित प्राणी आहे, तो म्हणजे गाढव. धर्मगुरू जेव्हा प्रवचन देतात तेव्हा दुर्लक्षित व्यक्तीवर ध्यान केंद्रित करत शेजार-प्रेमावर प्रवचन देतात; परंतु ते उपेक्षित, दुर्लक्षित प्राण्यांकडे दुर्लक्ष करतात.

रूप सगळ्यांनाच आकर्षित करते, मग ते मनुष्याचे असो की प्राण्याचे असो! प्रेमाचे व रूपाचे संबंध आहेत. बहुदा रूप पाहून प्रेम केले जाते. गाढव बिचारा दिसायला कुरूप, मग गाढवावर कोण प्रेम करणार? ना त्याच्याकडे घोड्याची चपळता, ना हत्तीची ताकद. मग काय कामाचे? घोड्यावर बसायला अभिमान वाटतो व गाढवावर बसायला हीनपणा वाटतो. कारण घोडा दिसायला देखणा असतो.

काय विडंबना आहे पहा! ''तो गाढवासारखे काम करतो!'' म्हणजेच खूप कष्ट करतो. खूप कष्ट करणाऱ्या व्यक्तीची तुलना गाढवाबरोबर केली जाते व मूर्खासारखे वागणाऱ्यांची तुलना सुद्धा गाढवाबरोबर केली जाते. बिच्चारे गाढव! गाढवाचे दु:ख गाढवालाच माहीत. प्राचीन काळात गरीब लोक प्रवासासाठी गाढवाचा वापर करत. ख्रिस्ती इतिहासात गाढवाचे एक विशेष स्थान आहे. गाढव हे आज्ञाधारकपणा, नम्रता, शांती, सेवा, संयम ह्या गुणांचे प्रतीक मानले जाते. इतके असून सुद्धा गाढवाला मान का नाही? कधी कधी रूप, रंग, अंग व वागण्याचा ढंग फरक करतात. समाजात मी कोण आहे, ह्यापेक्षा माझ्याकडे काय आहे, हे मान-सन्मानाचे कारण बनते.

जुन्या करारात अब्राहाम इसहाकला बलिदानासाठी डोंगरावर नेण्यासाठी गाढवच निवडतो. इसहाकचे बलिदान येशूच्या बलिदानाचे पूर्व संकेत मानले जाते, कारण येशू गाढवावर बसूनच कालवारीवर बलिदान करण्यासाठी येरुशलेममध्ये प्रवेश करतो.

संदेष्टा बलाम जेव्हा देवाच्या इच्छेविरुद्ध वागतो तेव्हा त्याचा वध करण्यास देव स्वर्गदूत पाठवतो. तीन वेळा दूत तलवार घेऊन रस्ता अडवतो. गाढवाला दूत दिसतो पण बलामला मात्र दिसत नाही. गाढव रस्ता बदलतो त्यामुळे बलाम गाढवाला मारतो. बऱ्याच वेळेला जीव वाचवणाऱ्याचाच जीव घेतला जातो. शेवटी देव गाढवाच्या मुखांतून त्याचा संदेश ऐकवतो. देव निसर्गातील कोणत्याही प्राण्याद्वारे किंवा पक्ष्याद्वारे आपला संदेश देऊ शकतो. जसे येशूने म्हटले आहे, ''मी तुम्हाला सांगतो, जर लोक गप्प राहिले, तर दगडसुद्धा मोठ्याने ओरडतील.''

> **गाढव हे आज्ञाधारकपणा, नम्रता, शांती, सेवा, संयम ह्या गुणांचे प्रतीक मानले जाते.**

गाढवाने गर्भवती मरियेला आपल्या पाठीवर वाहिले व हेरोदपासून देवपुत्राला वाचविले. येशूच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत गाढव येशूची साथ देतो. भल्या शोमरोनीच्या दृष्टांतात गाढवाचा उल्लेख नाही; पण परंपरेनुसार प्राणी गाढवच आहे असे मानले जाते. भला शोमरोनी भला होण्याचे कारण म्हणजे त्याने दुर्लक्षित, उपेक्षित व्यक्तीची सेवा केली. अशा दुर्लक्षित, उपेक्षित व्यक्तीच्या सेवेच्या कामात गाढव आले जे स्वत:च उपेक्षित आहे. येशूने नेहमी उपेक्षित, दुर्लक्षित लोकांची सेवा केली. प्राण्यांच्या बाबतीत सुद्धा तेच धोरण बाळगत येशूने गाढव निवडले, घोडा नाही. येशूने गाढव निवडून संदेश दिला की देवाचे लक्ष्य दुर्लक्षितांवर असते.

घोड्यावर बसलेला प्रत्येक जण राजाच असतो असे नाही व गाढवावर बसलेला प्रत्येक जण मूर्खच असतो असेही नाही. परंतु जो गाढवावर बसतो त्याची नेहमीच टिंगल केली जाते व घोड्यावर बसलेल्यांकडे आदराने पाहिले जाते.

कदाचित गाढव सुद्धा विचार करत असेल, ''नको रे बाबा, हा गाढवाचा जन्म!'' घोर कष्ट करून सुद्धा शेवटी आपण गाढवच! दैवी स्त्री-पुरुषांना पाठीवर वाहिले तरी गाढवच! लोकांची सेवा केली तरी गाढवच! गाढवाप्रति असलेल्या नकारात्मक भावना मनातून काढून टाकू या. गाढवावर म्हणजेच उपेक्षितांवर प्रेम करू या. अरे गाढवा नाही; तर वाह-वाह गाढवा बोलू या. आज्ञाधारकपणा, नम्रता, सेवा, संयम, समर्पण हे सकारात्मक गुण गाढवाकडून शिकण्यासारखे आहेत. प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीकडून उपेक्षितांची सेवा अपेक्षित आहे.

मोबाईल : 97 64 60 60 68

# धन्य कुमारी मरियेचे राणीपद

- डॉ. सुभाष डिसोजा
उपप्राचार्य, सेंट जोसेफ कॉलेज

''ज्या अर्थी ख्रिस्त राजा आहे, त्या अर्थी त्याची माता मरिया ही राणी आहे.'' दरवर्षी १५ ऑगस्टला आपण मरियेच्या स्वर्गनयनाचा सण साजरा करतो आणि बरोबर आठ दिवसांनी, म्हणजे २२ ऑगस्टला 'धन्य कुमारी मरियेचे राणीपद' हा स्मृतीदिन साजरा करतो. हे दोन्ही उत्सव एकमेकांशी घट्ट जोडलेले आहेत - ज्या मरियेला देवाने शरीर व आत्म्यासह स्वर्गात नेले, तिलाच तिच्या पुत्राच्या शेजारी राणी म्हणून मुकुट घातला गेला, हे ह्या सणाचे केंद्रस्थान आहे.

**१) पोपचे अधिकृत परिपत्रक व चर्चची शिकवण** : माता मरियेच्या ह्या राणीपदाची चर्चची शिकवण अधिकृतपणे पोप १२वे पायस ह्यांनी ११ ऑक्टोबर १९५४ रोजी मरियन वर्षाच्या सांगता प्रसंगी, त्यांच्या (*Ad Caeli Reginam* - स्वर्गाची राणी) ह्या ऐतिहासिक परिपत्रकात स्पष्ट केली. ''ज्याप्रमाणे येशू ख्रिस्त हा आमचा तारणहार, प्रभू आणि विश्वाचा राजा आहे, त्याचप्रमाणे माता मरिया येशूच्या मुक्तिकार्यात सहभागी असल्यामुळे आणि त्याची माता असल्यामुळे पूर्ण सृष्टीची राणी आहे. ती केवळ अधिकाराने नाही; तर तिच्या अपार कृपेने आणि प्रेमाने आपल्यावर राज्य करते.'' त्याचप्रमाणे, दुसऱ्या व्हॅटिकन महासभेच्या (*Lumen Gentium*, 966) दस्तऐवजात म्हटले आहे : ''सगळ्या डागांपासून मुक्त असलेल्या निष्कलंक कुमारिकेला, तिचे इहलोकातील जीवन संपल्यावर, आत्म्यासह आणि शरीरासह स्वर्गीय वैभवात घेण्यात आले आणि प्रभूने तिला सर्वांची राणी म्हणून घोषित केले, जेणेकरून ती राजांचा राजा आणि पापांवर विजय मिळवणाऱ्या तिच्या पुत्राशी अधिक पूर्णपणे एकरूप व्हावी.''

सुरुवातीला हा सण ३१ मे रोजी साजरा होत असे. पुढे १९६९ साली पोप सहावे संत पॉल ह्यांनी लिटर्जिकल कॅलेंडरच्या सुधारणेत हा सण स्वर्गारोहणाच्या अष्टदिनी, म्हणजे २२ ऑगस्टला नेला, जेणेकरून स्वर्गारोहण आणि राणीपद ह्यांच्यातील अतूट संबंध



अधिक स्पष्ट व्हावा. पोप स्पष्ट करतात की मरियेचे राणीपद तिच्या देवमातृत्वातून, तसेच नव्या हव्वेप्रमाणे ख्रिस्ताच्या मुक्तिकार्यात तिने दिलेल्या सहकार्यातून येते. ते इशारा देखील देतात की धर्मोपदेशकांनी अतिरेक आणि अनास्था ह्या दोन्ही टोकांपासून दूर राहून, योग्य समतोल राखून हे सत्य शिकवावे - कारण राजा केवळ येशू ख्रिस्त आहे आणि मरिया त्याच्या मुक्तिकार्यात सहभागी झाल्यामुळे त्याच्या राजपदात वाटेकरी ठरते. ह्या परिपत्रकाच्या शेवटी पोप आपल्या आवडत्या प्रार्थनेत लिहितात की, ही राणी राष्ट्रां-राष्ट्रांमधील शांतीचे बीज व्हावी, ढगांमधील इंद्रधनुष्याप्रमाणे शांतीच्या कराराची खूण व्हावी.

> **माता मरियेचे राणीपद हे नम्रता, सेवा आणि अथांग प्रेमाचे प्रतीक आहे.**

**२) पवित्र शास्त्राचा आधार** : चर्चची ही शिकवण केवळ भक्तिभावनेतून नव्हे, तर पवित्र शास्त्राच्या ठोस आधारावर उभी आहे : लूक १:३२-३३ - दूत गॅब्रिएलने मरियेला संदेश दिला, ''तो महान होईल आणि त्याला परात्पराचा पुत्र म्हणतील आणि प्रभू देव त्याला त्याचा पूर्वज दावीद ह्याचे राजासन देईल. तो याकोबच्या घराण्यावर युगानुयुग राज्य करील आणि त्याच्या राज्याचा अंत होणार नाही.'' जो पुत्र राजा आहे, त्याची माता स्वाभाविकपणे राणी-माता ठरते - हे जुन्या करारातील राजघराण्यांच्या (उदा. १ राजे : १९मध्ये शलमोन राजाची आई बथशेबा राजसिंहासनाच्या उजवीकडे बसलेली दाखवली आहे) परंपरेशी सुसंगत आहे. प्रकटीकरण १२:१ - स्वर्गात एक महान चिन्ह दिसले : सूर्याचे वस्त्र परिधान केलेली, चंद्र पायाखाली असलेली आणि मस्तकावर बारा नक्षत्रांचा मुकुट असलेली स्त्री. चर्चच्या परंपरेने ह्या स्त्रीमध्ये मरियेचे - राणी व माता ह्या दोन्ही नात्यांनी - प्रतिबिंब पाहिले आहे. स्तोत्र ४५:९ - राजाच्या उजव्या हाताला सुवर्णालंकारांनी सजलेली राणी उभी आहे, असे स्तोत्रकार वर्णन करतो; ख्रिस्ती परंपरेने ही ओवी मरियेच्या स्वर्गीय राणीपदाशी जोडली आहे.

**३) संतांचे विचार** : संत बर्नड म्हणतात की, मरियेवरील प्रेम व तिची भक्ती हे अनंतकाळच्या तारणाचे निश्चित लक्षण आहे. संत बोनाव्हेंचर सांगतात की, नरकाच्या शक्तींना मरियेच्या नावाची जितकी भीती वाटते, तितकी कोणत्याही बलाढ्य सैन्याची वाटत नाही. संत आल्फोन्सस लिगोरी म्हणतात, ''कारण कुमारी मरिया राजांचा राजा असणाऱ्या येशूची माता होण्याच्या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचली, म्हणून चर्चने तिला 'राणी' ह्या पदवीने सन्मानित करणे पूर्णपणे न्याय्य आणि योग्य आहे.''

माता मरियेचे राणीपद हे जगातील राजा-राण्यांसारखे शक्ती किंवा अधिकाराचे नाही, तर ते नम्रता, सेवा आणि अथांग प्रेमाचे प्रतीक आहे. ती स्वर्गाच्या सिंहासनावरून आपल्या सर्व मुलांसाठी मध्यस्थी करते. ह्या मंगल दिनी आपणही तिचा राणी म्हणून आदर करू या.

(**संदर्भ :** पोप पायस बारावे, '*Ad Caeli Reginam*', ११ ऑक्टो. १९५४; पवित्र शास्त्र - लूक १, प्रकटीकरण १२, स्तोत्र ४५, १राजे २; विविध संतांचे लेखन व चर्च परंपरा)

मोबाईल : 98 81 62 26 61

# धर्मगुरू जीवनाचा वास्तवदर्शी वेध

- टोनी डाबरे
निर्मळ

"धर्मगुरुपद हे प्रभू येशू ख्रिस्ताच्या अतिपवित्र हृदयातील प्रेमाचे प्रतिबिंब आहे", असे उद्‌गार धर्मगुरूंचे आश्रयदाते संत जॉन मारी वियानी ह्यांनी काढले आहेत.

प्रभू येशूच्या हृदयातील प्रेमाचे प्रतिबिंब म्हणजे, जसे प्रभू येशूने आपल्या ख्रिस्तसभेवर प्रेम केले, तसेच त्यांनी आपल्या स्वर्गीय पित्यावरही प्रेम केले. अशाच प्रकारचे आवाहन प्रत्येक धर्मगुरूंसमोर असते.

एकीकडे धर्मगुरूंनी परमेश्वरावर मनापासून प्रेम करावे, त्यासाठी पवित्र मिस्सा अर्पण कराव्यात, परमपवित्र संस्कारासमोर प्रार्थनेत वेळ घालवावा, परमेश्वराची आराधना करावी, त्याच्या सहवासात राहावे, पवित्र बायबलचा अभ्यास करावा, जपमाळ प्रार्थना करावी आणि विविध प्रकारच्या प्रार्थनांमध्ये सहभागी व्हावे. परमेश्वरावरील प्रेम व्यक्त करण्यासाठी ही विविध आध्यात्मिक साधने धर्मगुरूंनी सतत जोपासायची असतात.

त्याचबरोबर इतरांवर प्रेम व्यक्त करण्यासाठी आणि ख्रिस्तसभेवर प्रेम दाखवण्यासाठी धर्मगुरूंना खूप मोठी जबाबदारी पार पाडावी लागते. बाप्तिस्म्याच्या संस्कारापासून ते अंत्यविधीपर्यंत माणसाच्या जीवनप्रवासात त्याला साथ द्यावी लागते. प्रत्येक टप्प्यावर धर्मशिक्षण द्यावे लागते, श्रद्धाळूंच्या मनाची तयारी करावी लागते, विविध संस्कार साजरे करावे लागतात आणि त्या संस्कारांद्वारे परमेश्वराचे प्रेम लोकांपर्यंत पोहोचवावे लागते.

Strength **(बलस्थान) :** धर्मगुरूंना समाजात मोठा मान-सन्मान आणि आदर मिळत असतो. लोकांच्या मनात त्यांच्याविषयी श्रद्धा असते. त्यांना समाजासाठी विविध प्रकारची सेवा करण्याची संधीही लाभते. धर्मगुरूंची प्रमुख बलस्थाने म्हणजे त्यांचे प्रार्थनामय जीवन, परमेश्वराशी असलेले त्यांचे घनिष्ठ नाते, त्यांची पवित्रता, त्यांचे ज्ञान, सेमिनरीमध्ये झालेली त्यांची जडणघडण



तसेच समाजात मिळणारा सन्मान आणि आदर.

Weakness **(दुर्बलता) :** धर्मगुरू हेही शेवटी हाडामांसाचे माणूसच असतात. त्यांनाही मोह, प्रलोभने, भावना, आवडी-निवडी असतात. त्यांनाही वैयक्तिक जीवनासाठी, वाचन-लेखनासाठी, अभ्यासासाठी, विश्रांतीसाठी आणि मनोरंजनासाठी वेळ द्यावा असे वाटते; परंतु अनेकदा त्यांना तशी संधी मिळत नाही.

अनेक वेळा स्वत:च्या कुटुंबात आनंदाचे प्रसंग असले तरी सेवाकार्यामुळे त्यांना त्या प्रसंगी उपस्थित राहता येत नाही. हीदेखील त्यांच्या जीवनातील एक मोठी मर्यादा आहे. ह्याशिवाय लोकांच्या अपेक्षांचे ओझेही धर्मगुरूंना सतत आपल्या खांद्यावर वाहावे लागते.

एकदा एका लहान मुलाने पोप फ्रान्सिस ह्यांना विचारले, "होली फादर, तुम्ही कधी रडता का?" त्यावर पोप फ्रान्सिस म्हणाले, "हो बाळा, मीही रडतो. पण माझ्या शयनगृहात, येशूसमोर जाऊन रडतो."

**धर्मगुरूंच्या जीवनाचे 'SWOT' च्या दृष्टीने विश्लेषण**

"का?" असे विचारल्यावर त्यांनी उत्तर दिले, "माझ्या लोकांसाठी. त्यांच्या वेदना पाहिल्यानंतर माझी अवस्था 'बुडती जन न पाहवे डोळा' अशी होते. ह्या लोकांसाठी अजून काय करता येईल, त्यांना अज्ञानातून आणि पापाच्या अंधारातून कसे बाहेर काढता येईल, ह्याचाच मी विचार करत असतो. त्या क्षणी माझ्या डोळ्यांतून आपोआप अश्रू वाहू लागतात."

Opportunity **(संधी) :** धर्मगुरूंना सेवाकार्यासाठी असंख्य संधी उपलब्ध असतात. चर्चच्या चौकटीत राहूनही करण्यासारखे खूप काही असते. पवित्रीकरणाच्या कार्यामध्ये पवित्र मिस्सा अर्पण करणे, संस्कार साजरे करणे ह्यांचा समावेश होतो.

जडणघडणीच्या कार्यात विविध शिबिरे आयोजित करणे, धर्मशिक्षण देणे, प्रबोधनपर कार्यक्रम राबविणे आणि श्रद्धावंतांना आध्यात्मिक मार्गदर्शन करणे ह्यांचा समावेश होतो. प्रशासनाच्या क्षेत्रात चर्चची मालमत्ता, आर्थिक व्यवहार आणि विविध व्यवस्थापनाची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडावी लागते. ह्या सर्व संधींबरोबर अनेक आव्हानेही असतात. चर्चच्या चौकटीबाहेरही नागरी, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांत कार्य करण्याच्या मोठ्या संधी धर्मगुरूंना उपलब्ध असतात. त्या संधींचे सोने किती प्रभावीपणे करायचे, हे त्यांच्या उपजत गुणांवर, दृष्टिकोनावर आणि नेतृत्वक्षमतेवर अवलंबून असते.

Threats **(धोके) :** सेवाकार्य करताना धर्मगुरूंना अनेक प्रकारच्या धोक्यांनाही सामोरे जावे लागते. काही ठिकाणी कार्य करताना त्यांना शारीरिक आणि मानसिक छळ सहन करावा लागतो. त्यांचा अपमान केला जातो, त्यांना धमक्या दिल्या जातात आणि त्यांच्या डोक्यावर असुरक्षिततेची तलवार लटकत राहू शकते. ह्याशिवाय पैसा, ऐषाराम, वैयक्तिक संबंध किंवा इतर सांसारिक आकर्षणे अशा विविध प्रकारच्या मोह आणि प्रलोभनांनाही त्यांना सामोरे जावे लागते. आजच्या डिजिटल युगात मोबाईल फोन हा जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. त्याचा योग्य आणि संयमी वापर करणे हे स्वत:मध्ये एक मोठे आव्हान आहे. त्याचा अयोग्य वापर धर्मगुरूंच्या सेवेला, प्रतिष्ठेला आणि आध्यात्मिक जीवनालाही धोका निर्माण करू शकतो. म्हणून आधुनिक साधनांचा विवेकपूर्ण वापर करणे ही आजच्या प्रत्येक धर्मगुरूची महत्त्वाची जबाबदारी आहे.

मोबाईल : 84 52 81 41 11 •

# तलासरी मिशन : मानवतेचे तीर्थक्षेत्र

**९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने...**

**-प्रकाश दांडेकर, सुनंदा गिंभल**
गांगणगाव, वरखंडा, तलासरी

''जिथे माणुसकीचा श्वास असतो, तिथे देवाचा वास असतो'', हे वाक्य तलासरी मिशनच्या प्रत्येक कार्याची साक्ष देते. सेवा, समर्पण, शिक्षण, आरोग्य आणि संस्कृती ह्यांचा सुंदर संगम म्हणजे तलासरी मिशन. अनेक दशकांपासून आदिवासी समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी अखंडपणे कार्य करणारे हे मिशन आज आशेचा दीपस्तंभ, विश्वासाचा आधार आणि विकासाचे मार्गदर्शक बनले आहे.

कधीकाळी अज्ञान, दारिद्र्य, आजारपण व उपेक्षेच्या अंधारात जीवन जगणाऱ्या हजारो कुटुंबांच्या स्थितीचा विचार केला गेला नाही; माणूस हाच धर्म आणि सेवा हाच सर्वोच्च मार्ग मानून प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत प्रेमाचा हात पोहोचविण्यात आला.

**आरोग्य सेवेतून जीवनाला नवी दिशा**

''रुग्णाची सेवा म्हणजे देवाची सेवा'', ह्या भावनेने प्रेरित होऊन तलासरी मिशनने आरोग्य क्षेत्रात अतुलनीय कार्य उभे केले आहे. दुर्गम पाड्यांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविणे, गरजू रुग्णांना उपचारांची संधी उपलब्ध करून देणे, माता-बाल आरोग्याची काळजी, जनजागृती, आरोग्य शिबिरे, प्रतिबंधात्मक आरोग्य शिक्षण आणि मानवतेने ओथंबलेली सेवा ह्या सर्व माध्यमांतून असंख्य कुटुंबांना नवजीवन लाभले आहे.

कनोसा सिस्टरांनी चालविलेल्या वडोली दवाखान्यात औषधांपेक्षा प्रेमाचा स्पर्श अधिक प्रभावी असतो, ह्याची जाणीव प्रत्येक रुग्णाला होते.

**शिक्षण :उज्ज्वल भविष्याचा दीपस्तंभ**

''विद्या हीच खरी संपत्ती; ती वाटल्याने अधिक वाढते'', ह्या विचाराप्रमाणे तलासरी मिशनने शिक्षणाला केवळ नोकरीचे साधन न मानता व्यक्तिमत्त्व घडविण्याचे प्रभावी माध्यम बनविले. आदिवासी मुला-मुलींना गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्त, नैतिक मूल्ये, विज्ञाननिष्ठ विचार, सामाजिक जबाबदारी व आत्मविश्वास ह्यांची देणगी देत अनेक पिढ्यांचे भविष्य उजळविले.

आज अनेक विद्यार्थी डॉक्टर, अभियंते, शिक्षक, अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांतील यशस्वी व्यक्तिमत्त्वे म्हणून समाजात कार्यरत



आहेत. त्यांच्या यशामागे तलासरी मिशनच्या शिक्षकांचे प्रेम, त्याग आणि समर्पणाचा अमूल्य वाटा आहे. ''शाळा म्हणजे केवळ चार भिंती नव्हेत; ती स्वप्नांना पंख देणारी कार्यशाळा असते,'' हे तलासरी मिशनच्या सर्व शाळांनी मोठ्या मेहनतीने साकारले आहे.

**संस्कृतीचे जतन :ओळखीचा अभिमान**

विकासाच्या प्रवासात आपल्या मुळांचा विसर पडू नये, हीच तलासरी मिशनची भूमिका राहिली आहे. आदिवासी समाजाची भाषा, लोककला, नृत्य, परंपरा, सण-उत्सव, लोक-संस्कृती आणि जीवनमूल्ये ह्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी मिशनने सातत्याने प्रयत्न केले. संस्कृती टिकली तर समाज टिकतो; संस्कार टिकले तर राष्ट्र समृद्ध होते. आधुनिक शिक्षणासोबत सांस्कृतिक अस्मितेचे जतन करण्याचे हे अद्वितीय कार्य खरोखरच अनुकरणीय आहे.

**१००वर्षांहून अधिक काळ तलासरी मिशन हे सेवेतून फुललेले मानवतेचे पवित्र तीर्थक्षेत्र म्हणून नावारूपाला येत आहे**

**सेवेचा अखंड प्रवास**

तलासरी मिशनच्या कार्यामागे अनेक समर्पित धर्मगुरू, धर्मभगिनी, शिक्षक, डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी, समाजसेवक आणि हितचिंतक ह्यांचे नि:स्वार्थ योगदान आहे. त्यांनी स्वत:च्या सुखाचा विचार न करता हजारो लोकांच्या आयुष्यात आनंदाची फुले उमलविली. ''दिवा स्वत: जळतो, म्हणून इतरांना प्रकाश देतो,'' ह्याच दिव्यासारखे हे मिशन सतत जळत राहिले आणि असंख्य जीवनांना उजेड देत राहिले.

आज तलासरी मिशन ही केवळ एक संस्था नाही; ती विश्वासाची शाळा, करुणेचे रुग्णालय, संस्कृतीचे विद्यापीठ आणि मानवतेचे मंदिर आहे. येथे दिले जाणारे शिक्षण बुद्धी घडवते, आरोग्यसेवा जीवन वाचवते आणि संस्कार माणुसकीला उंची देतात.

तलासरी मिशनने इतिहास घडविला आहे - माणसांच्या हृदयात, समाजाच्या प्रगतीत आणि मानवतेच्या अमर परंपरेत.

तलासरी मिशन म्हणजे अश्रूंना आधार, अंधाराला प्रकाश, निराशेला आशा आणि मानवतेला नवी दिशा देणारा अखंड प्रज्वलित दीप! अशा ह्या सेवामंदिराला, त्याच्या महान परपंपरेला आणि नि:स्वार्थ सेवकांना आमचा शतशः प्रणाम!

# प्रार्थना : नीतिमान जीवनासाठी

-फा. ॲण्ड्र्यू डाबरे, ये.सं.
गिरीज / डांग, गुजरात

प्रार्थना म्हणजे परमात्म्याला हृदयातून घातलेली आर्त साद. परमात्म्यासह साधलेली आत्मीयता, आंतरिक संबंध. सर्जनहाराबरोबर तादात्म्य साधण्याचे साधन.

गुजराती लेखिका कुन्दनिका कापडिआ 'परम समीपे' ह्या पुस्तकात म्हणतात, ''प्रार्थना म्हणजे अंतर्मनाचा अंतर्यामी साधलेला नीरव संवाद.''

आपल्या हृदयातील भावना अभिव्यक्त करण्यासाठी आपण शब्दांचा आश्रय घेतो, त्याचप्रमाणे संदेष्टे, साधु-संत, सामान्यजन सर्वांनाच परमेश्वराला सरळ संबोधित करणारी अंत:करणातून उत्स्फूर्त वाणी उद्भवते. प्रार्थना म्हणजे आपला हृदयातील आणि अंतर्मनातील भाव, संवेदना परमेश्वरापाशी अभिव्यक्त करणे. परमेश्वर पित्याच्या सान्निध्यात राहून त्याच्याशी तादात्म्य साधण्याचे प्रार्थना हे एकमात्र साधन आहे.

प्रार्थनेविषयी थॉमस मर्टन सांगतात : *''The secret of Prayer is a hunger for God and the vision of God, a hunger that lies for deeper than the level of language and affection.''*

"We could not seek God unless we had already found us. We cannot learn to desire God because He must find us first." - PASCAL

प्रार्थना आपणास पवित्र जीवन जगण्यास प्रेरणादायी तसेच जीवनात आत्मसंयम ठेवण्यास, शिस्त पाळण्यास खूप मदत करते. प्रार्थनेद्वारे जीवनात आध्यात्मिक शांती, दिव्य शक्तीचा साक्षात्कार आणि अनुभव मिळतो. परमेश्वर पित्याचे प्रेम, दया, शांती आणि प्रकाश ह्याची अनुभूती आपणास प्रार्थनेतून येते.

**प्रार्थना म्हणजे सकारात्मकता.** प्रार्थनेचा आपल्या शरीरावर, मनावर,



विचारांवर, हृदयावर, आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो, हे मोठमोठ्या वैज्ञानिकांनी सिद्ध केले आहे. प्रभू येशू ख्रिस्त हे त्याचे एक चांगले उदाहरण आहे. प्रभू येशू ख्रिस्ताने लोकांना मोठमोठ्या शारीरिक आणि मानसिक व्याधींतून मुक्त केले. प्रभू येशूने शिकवलेली, ''हे आमचे बापा...'' ही प्रभावी प्रार्थना आहे. प्रभू येशू ख्रिस्त

**प्रार्थनेचा आपल्या शरीरावर, मनावर, विचारांवर, हृदयावर आणि आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो.**

प्रभावी फिजिओ थेरेपिस्ट आहेत, हे त्यांच्या चमत्कारातून सिद्ध होते.

विश्वविख्यात वैज्ञानिक थॉमस एडिसन, आयझॅक न्यूटन, अल्बर्ट आईनस्टाईन, केप्लर, मेंक्स प्लांक, मार्कोनी हे ईश्वरवादी आणि प्रार्थनेवर ठाम भरवसा ठेवणारे होते.

**हृदयाची प्रार्थना :** जेव्हा आपण एका गर्द अंधाऱ्या खाईमध्ये सापडलो आहोत असे अनुभवतो, तेव्हा त्यामधून बाहेर निघण्याचा काही मार्ग आहे का? त्यामधून आपली सुटका आहे का? जेव्हा आपण आपल्या जीवनातील सर्वांत अंधारी रात्र म्हणून अनुभवतो त्या वेळी अविलाचे संत जॉन ऑफ द क्रॉस सांगतात : ''प्रार्थना हा आपणास पवित्र आणि परिशुद्ध होण्याचा एक जबरदस्त आध्यात्मिक अनुभव आहे.''

प्रार्थनेचा पायाभूत अर्थ आत्मसात करण्यासाठी आणि त्याचे खरे महत्त्व इतरांना समजावण्यासाठी 'कॅटेकिझम ऑफ द कॅथलिक चर्च' ह्या ग्रंथाचा अभ्यास करणे, वाचन करणे आवश्यक आहे. ह्या ग्रंथात प्रार्थना म्हणजे नक्की काय? ती कशी करावी हे उत्तमरीत्या सांगितले आहे.

येशू संघाचे संस्थापक संत इग्नेशियस ऑफ लोयोला 'अध्यात्म साधनेद्वारा' प्रभू येशू ख्रिस्ताच्या जीवनाच्या रहस्यांमध्ये गुंफून जाण्यासाठी मार्गदर्शन करतात.

महात्मा गांधीजी सांगतात : ''प्रार्थना ही मागणी नाही, ती आत्म्याची ओढ आहे. ती म्हाताऱ्या आईचे मनोरंजनाचे साधन नाही, ती आपल्या आत्म्याची परमेश्वराबरोबर साधलेली एकरूपता आहे.''

स्वामी रामतीर्थ प्रार्थनेसंदर्भात म्हणतात : ''प्रार्थना म्हणजे पुन्हा पुन्हा शब्द पुटपुटणे नाही. प्रार्थना म्हणजे परमेश्वराशी ऐक्य आणि परमेश्वराचा मनन-चिंतनात अनुभव घेणे होय.''

मोबाईल : 73 87 19 04 86

**ग्लोरिया मंडप डेकोरेटर**
**३०% ते ४०% पर्यंत सूट.**
रु. २,५०,००० चा मंडप फक्त रु. १,५०,००० मध्ये.
१ऑक्टो. ते ३०नोव्हें. २०२६ तसेच १ फेब्रु. ते ३० मे २०२७ पर्यंत वरील सूट दिली जाईल. जानेवारी महिन्यात बुकींगनुसार सूट. एकदा फोन करायला काय हरकत आहे? १फोन तुमचे १लाख रुपये वाचवणार!
**Gloria Mandap : 9822608898**
**Prima** कंपनीच्या खुर्च्या विक्रीसाठी उपलब्ध.


FLORENCE
TOURS & TRAVELS
FLORENCE TOURS & TRAVEL
• INTERNATIONAL •
BHUTAN
5th November 2026
6N/7D
SRI LANKA
5th November 2026
5N/6D
JAPAN
CHERRY BLOOSAM
29th March 2027
SOUTH KOREA
CHERRY BLOOSAM
15th April 2027
CHINA HONG KONG AND MACAO
6th November 2026
29th Mar 2027
7N/8D
VIETNAM
5th November 2026
26th January 2027
7N/8D
DUBAI
5th November 2026
11th January 2027
4N/5D
EUROPE
MAY 2027
SINGAPORE MALAYSIA AND THAILAND
MAY 2027
ONLY THAILAND
MAY 2027
• DOMESTIC •
CORDELIA CRUISE 2N WITH KERALA 3N
12th Oct 2026 | 23rd Oct 2027
ASSAM MEGHALAYA
10N/11D
03rd Nov 2026 | 20th Apr 2027
DARJILING AND GANGTOK
05N/06D
04th Nov 2026 | 18th Apr 2027
RAJSTHAN
NOVEMBER 2026
KASHMIR
JANUARY 2027
INCLUSIONS
Pickup Drop
Flight
Visa
Hotels
Sightseeing
All Meals.
Brian Dabre
7710027271
Wilfred Pereira
9922638520

# स्वत:ला ओळखा

-ॲड. अतुल आल्मेडा
निर्मळ

माणसा, सुख हवंय? स्वत:ला ओळख! द्वेष-मत्सर ह्याचा त्याग करायला शिक! स्वत:वर करतो तसेच प्रेम इतरांवर कर!

"We were all humans UNTIL,
Race disconnected us,
Religion separated us,
Politics divided us AND
wealth classiffied us." असे एक तत्त्वज्ञान सांगते.

सॉक्रेटिस व गौतम बुद्ध हे समकालीन. एक आशियाई तर दुसरा पाश्चिमात्य. त्यानंतर अंदाजे पाचशे वर्षांनी ख्रिस्ताचे आगमन झाले. 'Know thyself (स्वत:ला ओळखा) असे सॉक्रेटिस शिष्यांना व लोकांना शिकवत होता. गौतम बुद्ध 'वासना' हे सर्व दुखाचं मूळ आहे, असे सांगत होता. ख्रिस्त एकच आज्ञा देत आहे : ''स्वत:वर जसे प्रेम करतो तसे परमेश्वर व शेजाऱ्यांवर प्रेम कर.'' ख्रिस्त पुढे सांगतात, ''स्वर्गराज्य तुमच्यात आहे.'' (Kingdom of heavan is within you) तरी भवसागरात मानव सुखापेक्षा दु:ख अनुभवताना जास्त आढळतो. का?

स्वत:ला ओळख म्हणजेच आपले जीवन ओळख व आपल्या जीवनाचा उद्देश ओळख. आध्यात्मिक प्रवास 'मी कोण आहे?' ह्या प्रश्नाने सुरू होतो. ख्रिस्ताने आध्यात्मिक होण्यास शिकविले. माणसाने आपल्याच आतल्या अनुभवांतून केवळ स्वत:च्याच जीवनाचा अर्थ शोधावा असे नव्हे, तर संपूर्ण विश्वाचा भाग म्हणून अर्थ घ्यावा अशी अपेक्षा आहे.

ज्या आईच्या पोटी बाळ म्हणून मनुष्य जन्मास येतो, ती आई, त्याला प्रेमाची दीक्षा देते; त्या प्रेमासाठी ती आपले तन, मन, धन खर्ची घालत असते. योगायोगाने त्या आईच्या सहवासात असणारे वडील, ह्यांच्याकडून त्याला नैसर्गिक प्रेम मिळत असते. मग त्या कुटुंबात बालकाच्या प्रेमाचा विकास होत असतानाच त्याला व्यावहारिक अर्थ आपसूक जोडला जातो. माझी आई, माझे कुटुंबीय व माझे नातेवाईक ह्या परिवाराच्या परिघातच ते प्रेम घुटमळत राहते. त्यानंतर ते प्रेम, तो विचार किंवा धारणा थोडेफार विस्तारले तरी माझी जात, माझा समाज, माझा धर्म, माझा गट, माझा पक्ष, माझा देश इथपर्यंत मर्यादित राहते. मात्र ज्या निसर्गाच्या निर्मित प्रक्रियेतून मनुष्य जन्मास आला आहे, येत आहे, तो निसर्ग असा भेद करत नाही. मग माणूस भेद का करतो?



माणूस कितीही मोठा असला तरी मर्त्य आहे ही जाणीव झाली तर आपल्या जीवनाचा उद्देश काय किंवा जीवनाला अर्थ कसा प्राप्त होईल ह्याचा विचार आवश्यक ठरतो. हे जाणण्यासाठी माणूस शिकत असतो, ज्ञान मिळवत असतो, अनुभव घेत असतो. मिळवलेल्या ज्ञानातून 'मी काय कृती करतो', त्यावर ज्ञानाची उपयुक्तता अवलंबून असते. नाहीतर ज्ञान वांझ ठरते. कारण प्रवृत्तींवर विचारविनिमय करताना कृतीत ते प्रतिबिंब होणे आवश्यक ठरते. नाहीतर विचार कुचकामी ठरतात.

**धर्माचा उदय व उद्देश माणसाला नीतिमान करणे.**

माणसाच्या जीवनात बुद्धी व भावना ह्या दोन बाबी फारच महत्त्वाच्या आहेत. आतापर्यंत अशी विचारधारणा होती की, माणूस डोक्याने विचार करतो व भावनेने वागत असतो. डोक्यात विचार हे बुद्धीमुळे निर्माण होतात, तर भावना या मनात उद्भवतात. बुद्धी व भावना दोन भिन्न बाबी आहेत, हे कुणीही नाकारू शकत नाही. जीवनात वागताना, निर्णय घेताना ह्या दोन्ही बाबी महत्त्वपूर्ण आहेत. अनेकदा ह्या दोन्हींत संतुलन न केल्याने अनिष्ट प्रसंग उद्भवतात. त्याप्रमाणेच निर्णय नैतिक की धार्मिक ह्याचा विचार होणे आवश्यक आहे. नैतिकता मानवाच्या उत्क्रांतीतून उगम पावली आहे. मनुष्य हा समाजात राहतो. त्याचे सर्व व्यवहार सामाजिक सहकार्यावर अवलंबून असतात. त्यामुळेच आपुलकी, सहृदयता, प्रेम, अहिंसा अशा स्वरूपाच्या भावना नैसर्गिक आहेत. ह्या नैतिकतेची पाया असणारी सदसद्विवेक बुद्धी म्हणजे समाजातील प्रत्येक अन्यायाविरुद्ध अस्वस्थ वाटणं, मग पीडित व्यक्ती कोणीही असो.

धर्माचा उगम नदीकाठी कृषिसंस्कृतीची सुरुवात झाल्यानंतर झाला आहे. धर्माचा उदय व उद्देश मनुष्य जास्तीत जास्त नीतिमान व्हावा व आपले सामाजिक व्यवहार त्याने नैतिकतेने करावेत म्हणून झाला आहे.

जगातील सर्व धर्म शांती, सलोखा, प्रेम, दया, परोपकार व सहिष्णुता ह्या तत्त्वांचा पुरस्कार करतात, तरी युद्धे होतात, मग हा धर्माचा पराभव नाही का? बदलत्या काळानुसार धर्माची मांडणी पुन्हा करण्याची नितांत गरज भासते, असा मौलिक विचार राष्ट्रपिता महात्मा गांधी ह्यांनी मांडला आहे. धर्मामुळे मानवामध्ये विभागणी होऊन परस्परांवर आरोप-प्रत्यारोप होऊन भेदभाव वाढला आहे. धर्म हा विवेक आणि श्रद्धा ह्या दोन मूलभूत तत्त्वांवर आधारित असतो व असणे आवश्यक आहे. ह्या जगात जन्मास येणाऱ्या प्रत्येक मनुष्याला प्रेमाने व सुखाने जगण्याचा हक्क आहे. पण ह्या स्वातंत्र्यावर बंधन, दुसऱ्याच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणणारं वा अन्याय करणारं नसावं. मात्र हे प्रेमाने व सुखाने जगणे, माणसानेच धर्म व राष्ट्रीयत्व ह्या कल्पनेवर निर्माण केलेल्या व्यवस्थेमुळे मानवी जीवन संकुचित झालेले आहे. माणसाचा माणसावरील विश्वास नष्ट होताना दिसत आहे. मानवता मागे पडून गट, जात, धर्म, स्थळ, भाषा इत्यादी बाबींच्या आधारे माणसामाणसांत भेद निर्माण करून कंपूशाही बळावत आहे. हे मानवतेच्या व माणुसकीच्या विरुद्ध आहे. प्रेम हे नैसर्गिक व व्यवहाररहित असायला हवे. पण मानवी संस्कृतीने ते व्यवहारात गुरफटवले आहे. त्यामुळेच माणूस आपल्यांवरच प्रेम करताना आढळतो. 'विश्वचि माझे घर' हे बोलण्यापुरता मर्यादित न राहता, प्रत्यक्ष आचरणात दिसले पाहिजे. तेव्हाच 'वसुधैव कुटुंबकम्' ह्याला अर्थ प्राप्त होईल.

मोबाईल : 99 69 22 94 57

•

# अचूक निदानाची नवी ओळख - NABL मानांकित पॅथॉलॉजी लॅब

-युरी घोन्सालविस
चेअरमन, कार्डिनल ग्रेशियस मेमो. हॉस्पिटल, बंगली

आधुनिक वैद्यकीय सेवेमध्ये योग्य उपचाराची सुरुवात ही अचूक निदानापासून होते. डॉक्टरांकडून दिला जाणारा उपचार मोठ्या प्रमाणात लॅबोरेटरी तपासणी अहवालांवर आधारित असतो. त्यामुळे प्रयोग शाळेची गुणवत्ता व विश्वासार्हता अत्यंत महत्त्वाची ठरते. ह्याच गुणवत्तेची खात्री देणारी राष्ट्रीय स्तरावरील संस्था म्हणाजे NABL (National Accreditation Board for Testing and Calibration Laboratories)

**NABL म्हणजे काय?**

NABL ही भारत सरकारच्या Quality Council of India अंतर्गत कार्यरत संस्था असून ती वैद्यकीय प्रयोगशाळांची गुणवत्ता, अचूकता आणि कार्यपद्धतीची कठोर तपासणी करून मानांकन प्रदान करते. ही मान्यता मिळविण्यासाठी प्रयोगशाळेला अत्यंत कठोर वैज्ञानिक निकष पूर्ण करावे लागतात.

Cardinal Gracias Memorial Hospital - NABL मानांकन पॅथॉलॉजी लॅब :

वसई-विरार परिसरातील आरोग्य-सेवेमध्ये विश्वासार्ह नाव असलेल्या Cardinal Gracias Memorial Hospital च्या पॅथॉलॉजी विभागाने यशस्वीरीत्या NABL Accreditation प्राप्त केले आहे. ही मान्यता म्हणजे -

१) आंतरराष्ट्रीय दर्जाची प्रयोग शाळा सेवा. २) अचूक व विश्वासार्ह तपासणी अहवाल. ३) प्रशिक्षित तज्ज्ञ पॅथॉलॉजिस्ट व टेक्निशियन. ४) वैज्ञानिक व प्रमाणित कार्यपद्धती.

हॉस्पिटलच्या पॅथॉलॉजि विभागामध्ये अत्याधुनिक व पूर्णपणे ऑटोमेटेड हाय-टेक मशिनरी बसविण्यात आलेली आहे, ज्यामुळे मानवी त्रुटी कमी होतात. जलद आणि अचूक रिपोर्ट मिळतात, अत्यंत सूक्ष्म तपासण्या शक्य होतात. गुणवत्ता नियंत्रण सातत्याने राखले जाते.




**अत्याधुनिक तंत्रज्ञानाची सुविधा**

कार्डिनल ग्रेशियस मेमोरिअल हॉस्पिटलच्या NABL मानांकन लॅबमध्ये खालील वैशिष्ट्ये उपलब्ध आहेत :

- Fully Automated Blood Analyzers.
- Advanced Biochemistry & Immunology Testing.
- High Precision Hematology Systems.
- Strict Internal & External Quality Control.
- International Standard Calibration System. ह्यामुळे प्रत्येक रुग्णाला सुरक्षित, अचूक आणि जागतिक दर्जाची तपासणी सेवा उपलब्ध होत आहेत.

ब्लड टेस्ट NABL Accredited Laboratory मधूनच का करावी?

आज जवळपास ७०% वैद्यकीय उपचार निर्णय लॅब रिपोर्टवर आधारित असतात.

NABL मानांकित लॅबचे फायदे :

- योग्य आजार निदान.
- चुकीच्या उपचारांचा धोका कमी.
- डॉक्टरांचा अधिक विश्वास.
- रिपोर्ट राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ग्राह्य.
- रुग्ण सुरक्षेची पूर्ण खात्री.

विशेषत: डायबिटीस, हृदयविकार, किडनी, लिव्हर आणि संसर्गजन्य आजारांमध्ये अचूक रिपोर्ट अत्यंत आवश्यक असतात.

**जनतेसाठी महत्त्वाचा संदेश**

आरोग्य तपासणी करताना केवळ खर्च न पाहता, गुणवत्तेला प्राधान्य देणे आवश्यक आहे. NABL मानांकित प्रयोगशाळेतून तपासणी करा. अचूक रिपोर्ट मिळवा. योग्य उपचार घ्या, निरोगी जीवन जगा. विश्वास, गुणवत्ता आणि सेवाभावाची परंपरा Cardinal Gracias Memorial Hospitalves NABL मानांकन प्राप्त करून आरोग्यसेवेमध्ये गुणवत्ता, पारदर्शकता आणि रुग्ण सुरक्षिततेबाबत आपली वचनबद्धता पुन्हा सिद्ध केली आहे. ही उपलब्धी केवळ हॉस्पिटलसाठी नसून संपूर्ण वसई-विरार परिसरातील नागरिकांसाठी सुरक्षित आणि विश्वासार्ह आरोग्यसेवेची नवी हमी आहे.

मोबाईल : 98 22 71 63 63 ●

**परिचय टूर्स अँड कॅटरर्स**

**आगामी सहली**

**१) वेलंकणी मातेचा नोव्हेना मद्रास :** दिनांक २७ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०२६. प्रवास, निवास ए. सी. खर्च, दहा दिवसाचा रु. २९,०००/-., पाच दिवसाचा रु. २०,०००/-. नॉन ए.सी. दहा दिवसाचा नोव्हेना एकूण खर्च प्रत्येकी रु. २०,०००/-., पाच दिवसांचा रु. १३,५००/-.

**२) झांशी, संत ज्युड नोव्हेना व आग्रा ग्वॉलियर साईट सीन:** दिनांक २४ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर २०२६ खर्च रु.१८,५००/-. आणि ग्वॉलियर आग्रा साईट सीन खर्च रु. २२,५००/

**३) संपूर्ण केरळ दर्शन :** दिनांक ५ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २०२६ कोची,मुन्नार टेकडी, त्रिवेंद्रम, अलेप्पी, कन्याकुमारी व एक रात्र बोट हाऊस. संपूर्ण प्रवास निवास खर्च रु ४०.०००/

**संपर्क**

**कैतान तुस्कानो : 9423947534**
**सोपान खरात : 9503598153**


भाटेबंदर माता
वेलंकनी
तीर्थमंदिर
उत्सव
यात्रेचा भव्य शुभारंभ :- शनिवार २९ ऑगस्ट २०२६ संध्या ४.३० वाजता.
दर्या माता चर्चकडून वेलंकनी माऊलीची भव्य प्रवेश मिरवणूक भाटेबंदर तीर्थमंदिराकडे
उद्घाटन मिस्सा : मुख्य पुरोहित : विशष थॉमस डिसोजा
(वसई धर्ममांत)
नवदिन भक्ती व पवित्र मिस्सा : (रविवार ३० ऑगस्ट ते सोमवार दि. ७ सप्टेंबर)
दररोज सकाळी : ५.००, ६.००, ७.००, ८.१५, ९.३० (मराठी), १०.३० (इंग्रजी)
संध्या. ५.०० (मुख्य मिस्सा) ध्वजारोहण / अंतिम मिस्सा ८.०० वाजता.
सणाचा दिवस : मंगळवार दि. ८ सप्टेंबर २०२६ (मरियेचा जन्मदिवस / बालिका दिन)
मिस्सा : सकाळी. ५.००, ६.००, ७.००, ८.३०, १०.००, ११.०० (इंग्रजी), १२.०० वाजता.
संध्या ५.००, ६.३०, ८.०० वाजता.
सणाची मिस्सा : सकाळी ८.३० वाजता, मुख्य पुरोहित : आर्चबिशप जॉन रॉड्रीक्स
(मुंबई सरधर्ममांत)
नवदिन भक्तीच्या काळात विशेष आकर्षण :
• माऊलीची पालखी :- गुरूवार ३ सप्टेंबर व रविवार ६ सप्टेंबर - संध्या.५.०० च्या मिस्सानंतर तीर्थमंदिराच्या आवारात मरिया मातेच्या इमाजीची पालखी
• आजारी व वृद्धांसाठी मिस्सा : शुक्रवार ४ सप्टेंबर - सकाळी ११.३०
• मरिया दर्शन गृह - सकाळी ५.३० ते रात्री १०.०० पर्यत.
• पापनिवेदन संस्कार - सकाळी ८.०० ते १०.०० संध्या. ४.०० ते ५.०० आणि भाविकांच्या सोयीनुसार
समारोप :
बुधवार दि. ९ सप्टेंबर संध्या. ४.३० वाजता समारोपाचा मिस्सा. तदनंतर ध्वजारोहण, वेलंकनी मातेच्या इमाजीची भव्य मिरवणूक दर्या माता धर्ममंदिरापर्यत.
संपर्क :
भाटेबंदर माता वेलंकनी कार्यालय : सि. वंदना (९०६५४४२०३६)
जेम्स कोलासो (९८९२६५४३१३८) दर्या माता व्हॉट्सॲप (७३०४९६ ०३५२)
ईमेल : velankannishrineuttan@gmail.com
आपले कृपाभिलाषी : फा. लेस्ली माल्या (रेक्टर), सहकारी धर्मगुरू आणि
भाटेबंदर माता वेलंकनी तीर्थमंदिर समिती



# वेलंकनी माता चर्च, मर्देस-वाघोली, निर्मळ

॥ वेलंकनी माऊली सर्वांना पावली ॥

*॥ चला जाऊ मर्देस-वाघोलीला । भेटू मद्रासच्या वेलंकनी माऊलीला ॥*

शनिवार दिनांक २९ ऑगस्ट २०२६ संध्या. ६.०० वा. वाघोली नाक्यावरुन भव्य मिरवणूक (बॅन्ड पथकासह)

**शुभारंभाची मिस्सा :** संध्याकाळी ७.०० वा. **बिशप बार्थोल बरेटो,** नाशिक धर्मप्रांत

**नोव्हेना : दिनांक ३० ऑगस्ट ते ०७ सप्टेंबर २०२६**

**मिस्सा, प्रवचन व संपूर्ण नोव्हेनाची भक्ती :** सकाळी ५.४५, ७.०० वा. आणि संध्या. ५.३० व ७.०० वा.

**झेंडावंदन :** दररोज सकाळी ६.४५ वा. वेलंकनी मातेचा ध्वज फडकविण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| रविवार | दिनांक ३० ऑगस्ट | सकाळी ९.०० वाजता | ज्येष्ठ नागरिक संघटनेसाठी विशेष मिस्सा |
| शुक्रवार | दिनांक ०४ सप्टेंबर | सकाळी ९.०० वाजता | सीड्यालिटी संघटनेसाठी विशेष मिस्सा |
| शनिवार | दिनांक ०५ सप्टेंबर | सकाळी ९.०० वाजता | आशादीप संघटनेसाठी विशेष मिस्सा |
| रविवार | दिनांक ०६ सप्टेंबर | सकाळी ९.०० वाजता | माहेरवाशिनीसाठी विशेष मिस्सा |
| रविवार | दिनांक ०६ सप्टेंबर | सकाळी ११.०० वाजता | नवख्रिस्ती बांधवांसाठी विशेष मिस्सा |

**माऊलीचा वाढदिवस : मंगळवार दिनांक ०८ सप्टेंबर २०२६. मिस्सा सकाळी ७.०० वा. व संध्या. ७.०० वा.**

**मर्देस - वाघोली धर्मग्रामाचा वार्षिक सण रविवार दिनांक १३ सप्टेंबर २०२६.**

**सणाची मिस्सा : सकाळी ६.३० फा. आग्नेल कर्वाल व ८.०० वा. बिशप थॉमस डिसोजा (वसई धर्मप्रांत)**

**वि. सूचना :** भाविकांच्या सोयीसाठी वर्षभर प्रत्येक शनिवारी सकाळी ६.४५ वाजता पवित्र मिस्सा, प्रवचन व वेलंकनी मातेचा नोव्हेना असेल.

**ख्रिस्ताठायी आपले : फा. ज्यो आल्मेडा (प्रमुख धर्मगुरू), फा. कॅजिटन रॉड्रिग्ज (सहाय्यक धर्मगुरू), प्रेमांजली सिस्टर्स व धर्मग्रामस्थ.**

## हार्दिक अभिनंदन



**सौ. ट्रीजा व्हिक्टर परेरा**

मारियानगर, भुईगाव



प्रिय मम्मी,

परमेश्वराच्या कृपेने तू दिनांक ३१/०७/२०२६ रोजी ३४ वर्षे प्रदीर्घ सेवा करून सेंट जोसेफ हायस्कूल, कुलाबा, मुंबई ह्या नामवंत शाळेतून 'मुख्याध्यापिका' ह्या पदावरून निवृत्त झालीस, त्याबद्दल देवाला धन्यवाद व तुझे हार्दिक अभिनंदन!

तुझे पुढील आयुष्य निरोगी, सुखी-समाधानाचे जावो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**आई-वडील : सौ. ईजाबेल व श्री. फिलीप डाबरे**
**सासु-सासरे : ख्रि. रोजी व एस.के.पिरेल**

**शुभेच्छुक :-**

**पती : श्री. व्हिक्टर रॉक परेरा**
**मुली : अमृता व अक्षरा**
**मुलगा : सात्विक परेरा**
**जावई : क्रिस्टल व कॉलीन**
**नातवंडे : एडन व आयझेया**
**परेरा व डाबरे कुटुंबीय**







**७५वा वाढदिवस व व्रतस्थ जीवनाची ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन**

**जन्म : २९/०८/१९५१**

**सेवाकार्य : ०८/१२/१९७५ ते ०८/०७/२०२६**



**सिस्टर जेरोम आसिस घोन्साल्वीस**

करमरीवाडी, पापडी

कार्यरत : सुसंवादाच्या ख्रिस्तसेविका,
जीवन विकास सेवा ट्रस्ट, कोशिंबी (भिवंडी)

पुढील प्रेषितीय कार्यासाठी व उत्तम आरोग्यासाठी
प्रार्थनामय शुभेच्छा!

**कुटुंबीय**



**७५व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक अभिनंदन**

**१०/०८/१९५१ ते १०/०८/२०२६**



**सिस्टर आल्डा (सांतान) परेरा**

गास, कांदोक २

संस्था : प्रेषितांची राणी, (SRA) आगाशी

सध्या वास्तव : नेवरगाव (संभाजी नगर)

प्रिय सिस्टर आल्डा, परमेश्वराच्या कृपेने व पवित्र मरिया मातेच्या आशीर्वादाने तू आपल्या वयाची ७५ वर्षे पूर्ण करीत आहेस. त्याबद्दल परमेश्वराला धन्यवाद. तुझे पुढील आयुष्य निरोगी, सुखी, समाधानी व प्रभूच्या अविरत सेवेत जावो हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना.

**भाऊ: इनास, सायमन; बहीणी : ज्युली मायकल रुमाव, सिस्टर निम्फा, रुमाव आणि परेरा कुटुंबीय**

## ८०व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा
## २७/०८/१९४६ ते २७/०८/२०२६



**श्रीमती जॉना जोजेफ लुजबो**
'सी ग्रेस' कोंडारवाडी, गिरीज

अतिप्रिय मम्मी,

ईश्वर कृपेने व आशीर्वादाने तू दिनांक २७/०८/२०२६ रोजी वयाची ८०वर्षे पूर्ण करीत आहेस, त्याबद्दल देवाला धन्यवाद व तुझे हार्दिक अभिनंदन! उर्वरित आयुष्यात तुला शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक आरोग्य व दीर्घायुष्य लाभो, हीच विधात्याचरणी प्रार्थना!

**शुभेच्छुक :- मुलगी व जावई : सेवरिना व शानल मच्याडो**
**मुलगा व सून : नेविल (सॅविओ) व प्रणालिया लुजबो**
**नातवंडे : शेरिल, शेल्डन, नोहा व मिखायल**



## ७५व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा
## २३/०८/१९५१ ते २३/०८/२०२६



**सौ. मागरिट (मॅगी) जोकीम घोन्सालविस**
'श्रद्धा' हाऊस, जुने बरामपूर

प्रिय मम्मी,

परमेश्वराच्या कृपेने दिनांक २३/०८/२०२६ रोजी तू आपल्या वयाची ७५वर्षे पूर्ण करीत आहेस, त्याबद्दल देवाला धन्यवाद व तुझे हार्दिक अभिनंदन! तुझे पुढील आयुष्य निरोगी सुखी-समाधानी जावो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**शुभेच्छुक :- पती : जोकीम घोन्सालविस;**
**मुले : ऑल्वीन व ॲलन; सुना : लिव्हिया व लोरेन;**
**नातवंडे : लॅन्स, लेनॉक्स, लेरॉय, लिजांडर**

---

१६ एप्रिल १९६७
रोजी विवाहबंधनात एकरूप झाले

**आज त्यांच्या सहजीवनाच्या**
# ६० व्या वर्षांची सुंदर,
**अटळ आणि प्रेरणादायी वाटचाल सुरू आहे...**

ही ६० वर्षांची सहजीवनयात्रा
१६ एप्रिल २०२७
रोजी पूर्ण होईल!

## ६० व्या विवाह वर्षदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!





**जेम्स सांपेद्र मोराएस ❤ ट्रिझा जेम्स मोराएस**

जन्म : १० ऑगस्ट १९३९ । वय : ८७ वर्षे

जन्म : २३ ऑगस्ट १९४३ । वय : ८३ वर्षे

परमेश्वरच्या कृपेने व आशीर्वादाने तुम्ही दिनांक १६/०४/२०२७ रोजी वैवाहिक जीवनाची ६० वर्षे पूर्ण करीत आहात त्याबद्दल परमेश्वराला धन्यवाद व तुमचे हार्दिक अभिनंदन! तुमचे वैवाहिक जीवन सुख-समृद्धीचे, आनंदाचे, व शांतीचे जावो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

**तुमचे आरोग्य, आनंद आणि प्रेम असेच चिरंतन राहो, हीच आमची मनःपूर्वक सदिच्छा!**

प्रेम, शुभेच्छा
**ज्येष्ठ मुलगा आणि त्यांचे कुटुंब**
❤ आपला मुलगा: फिनियन मोराएस ❤ सून: ललिता मोराएस ❤
❤ नातू - डॅनियल मोराएस आणि डार्विन मोराएस ❤

प्रेम, शुभेच्छा
**कनिष्ठ मुलगा आणि त्यांचे कुटुंब**
❤ आपला मुलगा: जोसलीन मोराएस ❤ सून: नॅन्सी मोराएस ❤
❤ नातवंडे - इडन मोराएस आणि एरिका मोराएस ❤

**पप्पाच्या ७५व्या व मम्मीच्या ७३ वाढदिवसानिमित्त देवाचे आभार**

**२५/०८/१९५१ ते २५/०८/२०२६** **०७/०८/१९५३ ते ०७/०८/२०२६**



**श्री. फिलीप व सौ. तेरेजा आल्मेडा**

भुईगाव, नवाळे नाका

प्रिय बाबा व आजी,

परमेश्वराच्या कृपेने बाबा, तुम्ही दिनांक २५ऑगस्ट २०२६ रोजी वयाची ७५ वर्षे व आजी तू दिनांक ७ ऑगस्ट २०२६ रोजी वयाची ७३ वर्षे पूर्ण करीत आहात, त्याबद्दल देवाला धन्यवाद व तुमचे हार्दिक अभिनंदन! तुमचे पुढील आयुष्य निरोगी, सुखी-समाधानी व आनंदाचे जावो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**शुभेच्छुक : ॲनिश, शार्वी, अरायना व ॲडल**

**७५व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा**

**२८/०८/१९५१ ते २८/०८/२०२६**



**श्री. मायकल बेजमी करवालो**

भुईगाव, मारिया नगर

प्रिय पप्पा,

परमेश्वराच्या कृपेने दिनांक २८/०८/२०२६ रोजी तुम्ही आपल्या वयाची ७५वर्षे पूर्ण करीत आहात, त्याबद्दल देवाला धन्यवाद व तुमचे हार्दिक अभिनंदन! तुमचे पुढील आयुष्य निरोगी सुखी-समाधानी जावो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**शुभेच्छुक :- पत्नी : कार्मेल करवालो;**
**मुलगा : प्रफुल; सून : फिलोमिना; मुलगी : मिनल;**
**जावई : आयवन करवालो; नातवंडे : इलारिया, मिलॉय व पर्ल**

**75th Birthday**
**08/08/1951 - 08/08/2026**



**Mrs. Syrina Joseph Crasto**

Agashi

Dear Mummy,

As you celebrate your 75th Birthday, we thank God for the precious gift of your life. May God continue to bless you with good health, Peace, happiness and many more beautiful years filled with love and cherished memories.



**With Lots of Love,**
**Placid, Aparna, Nouf and Aden Crasto**
**Astrid, Ajay, Byron, Kylan and Hannah Remedios**


ST. JOHN TECHNICAL & EDUCATIONAL CAMPUS, PALGHAR
CHRISTIAN MINORITY INSTITUTES
AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI / MSBTE
ALDEL EDUCATION TRUST
EXCELLENCE IN PHARMACY EDUCATION
SINCE 2008
ADMISSIONS OPEN 2026-27
51% SEATS RESERVED FOR CHRISTIAN MINORITY
ST. JOHN INSTITUTE OF PHARMACY AND RESEARCH
AUTONOMOUS
DTE CODE 3240
M. PHARM
• PHARMACEUTICAL QUALITY ASSURANCE (15)
• PHARMACEUTICAL CHEMISTRY (15)
• PHARMACEUTICS (09)
• PHARMACOLOGY (15)
ACCREDITED WITH GRADE A NAAC
B. PHARM (100)
D. PHARM (60)
9975316616
office@sjipr.edu.in
aldel.sjipr
sjipr_official
www.sjipr.edu.in
ALDEL COLLEGE OF PHARMACY AND RESEARCH
B. Pharm(100)
D. Pharm(60)
DTE CODE 3714
9920841900
office@acpr.in
aldel.acpr
acpr_official
www.acpr.edu.in

# St. John College of Engineering & Management

AUTONOMOUS INSTITUTE

A CHRISTIAN MINORITY INSTITUTE & AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI / MSBTE

4 COURSES NBA | NAAC A+ ACCREDITED

ALDEL EDUCATION TRUST




| COURSES OFFERED | INTAKE |
|---|---|
| **BACHELOR OF TECHNOLOGY** | |
| Computer Engineering | 120 |
| Computer Science & Engineering (Data Science) | 60 |
| Information Technology | 60 |
| Artificial Intelligence and Machine Learning | 120 |
| Electronics & Computer Science | 60 |
| Mechanical Engineering | 60 |
| Civil Engineering | 60 |
| **MASTER OF TECHNOLOGY** | |
| Computer | 18 |
| Information Technology | 18 |

| COURSES OFFERED | INTAKE |
|---|---|
| **DIPLOMA IN ENGINEERING** | |
| Civil Engineering | 60 |
| Mechanical Engineering | 60 |
| Computer Engineering | 60 |
| Information Technology | 60 |
| **MBA / BBA** — Human Resource, Marketing, Finance, Information Technology, Operations | 60/60 |
| **MASTER OF COMPUTER APPLICATIONS (MCA)** | 60 |

**Not just a Technology Degree, But a B.Tech++ / M.Tech++**

10th Best Engineering College in "MMRDA Region - Times of India Survey 2026"

**The SJCEM '++' advantage**

- 4 years of Holistic Engineering Education
- + Project Based Learning and Industry Certification - Kaushalya
- + Internships in the Curriculum
- + AICTE IDEALab for Innovation
- + AI Enabled Computer Labs | Multiple Centres of Excellence

## 51% SEATS RESERVED FOR CHRISTIAN MINORITY

**PLACEMENT PARTNERS**

SAIDEEP Vibrators Pvt Ltd, Bajaj Credit, pulz, YASH Machines & Automation, Value Score Business Solutions, Thermovision, Viraj Profiles Limited, TATA, QLS, KLT, Apni Pathshala, Gemsons, STS Honda, FactWise, UltraTech Cement, aczet, Agami Realty, Ankita Enterprise, Raychem RPG, JSW, AURO Laboratories Limited

SCAN QR CODE TO REGISTER

office@sjcem.edu.in

7387203232

*Terms and Conditions Apply

# St. Francis Institute of Management and Research (SFIMAR)

**An Autonomous Institution**

Managed by the Society of the Congregation of Franciscan Brothers

*"A Christian Religious Minority Institute"*

Approved by AICTE, DTE, Govt. of Maharashtra and Affiliated to the University of Mumbai

Accredited with 'A+' Grade by NAAC | MMS Programme Accredited by NBA, New Delhi | An ISO 9001:2015 Certified Institute

*'Enlightening Minds, Defining Leaders'*

Intake 180 seats

## MMS ADMISSION
**for the Year 2026-2027**

## MASTER OF MANAGEMENT STUDIES (MMS)

(Two Year Full Time Program)

**DTE CODE: MB 3119**

*51 % seats are reserved for the Christian Minority Candidates of Maharashtra State*

### SPECIALIZATION

more information...

- Finance
- Marketing
- Human Resource
- Information Technology
- Operations

100% INTERNSHIP & PLACEMENT ASSISTANCE

**ELIGIBILITY**

- Graduate with minimum 50% aggregate or equivalent in CGPI from any recognized University

**ENTRANCE SCORES ACCEPTED:**

- MAH-MBA/MMS-CET 2026/CAT 2025/CMAT 2026/XAT 2026/ ATMA 2026/MAT 2026

Intake 60 seats

## BMS ADMISSION
**for the Year 2026-2027**

## BACHELOR OF MANAGEMENT STUDIES (BMS)

Professional Program

**DTE CODE: 03119**

### SPECIALIZATION

more information...

- Finance
- Marketing
- Human Resource

**ELIGIBILITY**

1) 10+2 Cleared with minimum 50% from Recognised Board
2) Candidate should have appeared for MAH B.HMCT/BCA/BBA/BMS/BBM CET 2026

- *Note: Please refer to DTE Information Brochure 2026-27 for details on Admission process. (www.mahacet.org)*

mms@sfimar.org

bms@sfimar.org

Gate No. 5, Mount Poinsur, S. V. P. Road, Borivali (West), Mumbai - 400 103

**For enquiry contact:**

7738578255, 8097618932, 9619499199, BMS 9619599099 info@sfimar.org https://www.sfimar.org/

**Service Through Enterprise**


HARSH TRAVELS
Best Travel Agency
Specialist in Visa Worldwide
This Holiday Season,
Make Every Celebration Count!
Upcoming Vacations
Diwali • Christmas
and New Year Getaways
with Harsh Travels!
Dream Places. Best Experiences.
One Stop. Endless Memories.
100% VISA GUIDANCE
from professional Visa expertise
CUSTOMIZED TOURS
for international and domestic as per your choice from experienced professional.
FOREX & INSURANCE SERVICES
Best rates. Complete protection. Total peace of mind.
PASSPORT SERVICES
New Passport, Renewal, Tatkaal & all assistance
FLIGHT BOOKINGS, HOTEL BOOKINGS
Best options. Best prices. Hassle-free bookings.
FESTIVE GETAWAYS
Celebrate Diwali with amazing destinations & unforgettable experiences.
CHRISTMAS MAGIC TOURS
Feel the joy, lights & magic of Christmas around the world.
CURATED HONEYMOON TOURS
For the new beginnings & beautiful memories that last forever.
FRIENDS TOGETHER TOURS
Good friends. Great places. Unforgettable times!
LADIES SPECIAL ME Time
Because You Deserve a Break! Relax. Rejuvenate. Rediscover You.
LUXURY & ADVENTURE TOURS
From luxury escapes to thrilling adventures – We have it all!
SENIOR CITIZENS SPECIAL
Comfortable Journeys. Care at Every Step.
Making travel easy and joyful for you.
TRUSTED SERVICE
CUSTOMER SATISACTION OUR PRIORITY
EXPERT GUIDANCE THROUGHOUT
HASSLE-FREE TRAVEL
Explore the World with Harsh Travels
VIETNAM
SOUTH KOREA
SOUTH AFRICA
SRI LANKA
AZERBAIJAN
KAZAKHSTAN
GEORGIA
..and many more exciting destinations across the globe...
CALL US TODAY!
9527888052 | 8652292212
8879988498, 9561908055
Scan to Chat with Us on WhatsApp
harshtravelsforyou@gmail.com
Address: "Harsh" bungalow, bhuigaon Dongan, near Rumao school, Vasai West, 401201




## क्षण संपतात, आठवणी फिकट होतात... पण छायाचित्रांमध्ये प्रेम कायम जिवंत राहतं

The Photo Store मध्ये आम्ही केवळ फोटो काढत नाही, तर प्रत्येक क्षणामागील भावना, आनंद आणि आठवणी जपतो. छोट्या समारंभांपासून भव्य विवाहसोहळ्यांपर्यंत प्रत्येक फ्रेम मनापासून आणि कलात्मकतेने साकारतो. भारत, दुबई, यूके आणि ऑस्ट्रेलिया येथे अभिमानाने सेवा देत, तुमच्या आयुष्यातील अमूल्य क्षणांना चिरंतन स्वरूप देतो.

**आजच तुमचा वेडिंग फोटोग्राफर बुक करा!**

+91 8446982443 / +91 8261851879

**आमची सेवा :-**

- वेडिंग फोटोग्राफी
- प्री-वेडिंग फोटोग्राफी
- कपल फोटोशूट
- सिनेमॅटिक व्हिडिओ फोटोग्राफी
- बाप्टिझम फोटोग्राफी
- पवित्र कम्युनियन फोटोग्राफी
- विविध कार्यक्रमांचे फोटोग्राफी

अधिक माहितीसाठी स्कॅन करा

@THEPHOTOSTORE.IN

@thephotostore.in
hello@thephotostore.in
www.thephotostore.in
A/302, Ashok Nagar, Above Chapekar Hospital Ambadi Road, Vasai Rd W, opposite Carmel Classes, Vasai West, 401202

# Happy 80th Birthday



## HAPPY BIRTHDAY

# Mrs. Leena John Coutinho

**Papdy, Vasai**

**DOB: 30th August 1946**

***Dear Mummy,***

***On 30th August 2026, you complete 80 years. Wishing you a very Happy Birthday on this special day. May God's blessings always remain upon you, and my humble prayer at the feet of the Almighty is that you be blessed with good health and along life!***

**Best Wishes:**
**Bipin & Seema Coutinho, Rovina & Sunil Dabre, Nitin & Tatsiana Coutinho**
**Grand Children: Emily, Joleena, Sophia, Bradley, Stephan, Johnathan**
**Coutinho & Machado Fly.**

# पिटरमेरी इंडिया निधी लि. (वित्तसंस्था)

PETERMARY

**मुख्य कार्यालय व शाखाः वसई**

पहिला माळा, बिल्डींग नं. १, न्यु श्रीजी कृपा कॉम्प्लेक्स, कार्डिनल ग्रेशियस हॉस्पीटल समोर, बंगली, सांडोर, वसई (प), पालघर - ४०१ २०१.

Registration No -: U65999MH2019PLC323412

Establishment -: 2019

**Contact Details : 8669955317 / 18 | email: petermary.nidhi@gmail.com | web: www.petermary.com**

**वसईत प्रथमच !!! कंपनी कायदा २०१३ व कंपनी (स्थापना) नियम २०१४ अन्वये नोंदणी झालेली निधी कंपनी**



**आमची वैशिष्ट्ये**

- आकर्षक व्याजदराच्या बचत ठेव
- ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर अधिक व्याजदर.
- वसईच्या भुमीपुत्राकडून संचलित वित्त संस्था

**Enjoy Higher Returns in FIXED DEPOSIT Scheme**

| Sr. No. | Deposit Period | Interest % General | Interest % Sr. Citizan |
|---|---|---|---|
| 1. | Deposit for 12 Months | 9.00% | 9.30% |
| 2. | Deposit for 60 Months | 11.00% | 11.50% |
| 3. | Dam Duppat in | 72 Months | |

ALOYSIUS PEREIRA
Managing Director

कार्यालयीन वेळः सकाळी १०:३० ते संध्याकाळी ७:०० पर्यंत


## मासिक स्मृती







**ख्रिस्तवासी कॅथरीन जोसेफ गोम्स**

माणिटेपार, चुळणे रोड (वय ८४ वर्षे)

जन्म : १८/१२/१९४१; मृत्यू : १३/०७/२०२६

एक महिन्याची मिस्सा : रविवार दिनांक १६/०८/२०२६ सकाळी ७.१५ वा. फातिमा माता चर्च, चुळणे.

***"जर आपण जगतो तर प्रभूकरिता जगतो आणि जर आपण मरतो तर प्रभूकरिता मरतो. म्हणून आपण जगलो किंवा मेलो तरी आपण प्रभूचेच आहोत."***

(रोम १४:८)

**मुली : डॉल्सी, शर्मिला, सरीता;**
**जावई : हायसन मिनेजीस, विजय सिरेजो, प्रकाश लोपीस;**
**नातवंडे : शेरॉन, शेल्डन, क्लॅरिस व ॲन्सन**

## मासिक स्मृती







**ख्रिस्तवासी जॉन थॉमस डिसोझा**

**भातोडी वाडी, सांडोर**

जन्मः १२ नोव्हेंबर १९५२ मृत्यूः ११ जुलै २०२६

**महिन्याची मिस्साः रविवार, ९ ऑगस्ट २०२६, सकाळी ७.३० वाजता**
**सेंट थॉमस चर्च, सांडोर**

**"प्रभूमध्ये मरणारे आत्तापासून धन्य आहेत. आपल्या कष्टांपासून सुटून त्यांना विसावा मिळेल."** (प्रकटीकरण-१४:१३)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना !*

**पत्नी : शीला जॉन डिसोझा**
**मुलगी : रुथ ऑलविन लोपीस, जावई : ऑलविन ॲलन लोपीस**
**नातवंडे : जियाना, कॅलेब, डिसोझा आणि अलोज कुटुंबीय**

## In Loving Memory Of





**Late Christopher John Faria**

Stella, New Barampur

D.O.B.: 05/06/1958; D.O.D.: 17/08/2025

1st Death Anniversary Mass on :

Sunday 16th Aug. 2026 at 9.45 a.m. at

St. Gonsalo Garcia Church, New Barampur, Vasai (W.)

***"If we live, we live for the Lord, and if we die, we die for the Lord. So, whether we live or die, we belong to the Lord."*** (Romans 14:8)

**Wife : Remediana; Daughter : Sharon;**

**Son-in-law : Mario; Grandchild : Cara**

## 100 YEARS
### BIRTH ANNIVERSARY



**LATE PHILLIP FRANCIS PEREIRA**

KINTALWADI, PAPDY

RETIRED MANAGER, MAZAGON DOCKS LTD

HUSBAND OF LATE SERA PHILLIP FEREIRA

BIRTH : 05 / 08 / 1926

DEATH : 08 / 10 / 2020

*Remembering our dear Daddy on his 100th Birth Anniversary. God grant eternal peace to our beloved Daddy & Mummy.*

*Fondly remembered by.*

| His daughters | : | Sons-In-Laws |
|---|---|---|
| Ruth Mathos | : | Hilary |
| Valentina D'silva | : | Reynold |
| Late Carol Braganza | : | Victor |

## पुण्यस्मरण





**ख्रिस्तवासी एलायस थॉमस परेरा**

**ख्रिस्तवासी नातालिया एलायस परेरा**

सोनारभाट, पापडी, वसई

जन्म : ०४/०२/१९१०

मृत्यू : २१/०८/१९७६

जन्म : १७/०७/१९१६

मृत्यू : ०९/१२/१९९७

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''*** (योहान ११:२५)




*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

# पंचवीस वर्षांची आठवण







## ख्रिस्तवासी ब्रिजेट वॉल्टर लोपीस

गोखिवरे

जन्म : ०८/१०/१९५१; मृत्यू : १६/०८/२००१

***''मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.''***

(कलस्सै. २:४-५)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय राज्यात माझ्या पत्नीला सदैव आनंदी ठेव व तिला चिरंतन शांती दे, हीच तुजचरणी विन्रम प्रार्थना!*



**पती : वॉल्टर लोपीस**

**मुले : सॅण्ड्रा, ऑस्कर व ऑस्टीन**



# कवितेचा अर्थ

-जोसेफ तुस्कानो
गास/बोरीवली

आजूबाजूच्या परिसरात घडणाऱ्या घटनांमुळे कवीच्या मनात खळबळ माजते नि तो उत्स्फूर्तपणे व्यक्त होतो तेव्हा कविता जन्माला येते. आपली अनुभूती तो अनुभवात रुपांतरित करून वाचकांपुढे सादर करतो आणि त्यांच्या प्रतिसादांचा कानोसा घेतो तेव्हा आपणांस सुचलेल्या कविता या चुकून तर सुचल्या नाहीत ना, म्हणून प्रस्तुत कवी संभ्रमित होतो. अशावेळी आपण कवितेचा कुठला प्रकार हाताळतो ह्याची प्रस्तुत कवीला कदर नसते. आपले व्यक्त होणं नि गुदमरणं थोपविणे हेच त्याच्या हाती असते. त्यामुळे यमकासारख्या अलंकाराच्या बंधनांना तो कित्येकदा झुगारताना आढळतो. थोडक्यात खूप काही सांगण्याची त्याची धडपड छोट्या छोट्या कवितांतून आविष्कृत होताना दिसते. 'हायकू' आणि 'तांका' या जापनिज कवितांचा त्याच्यावर प्रभाव आहे. दहा यशस्वी हायकू लिहिणाऱ्या कवीला जपानमध्ये 'फिलोसॉफर' म्हणतात व ती प्रणाली या कवीला भावते नि भारावून टाकते.

प्रत्येक भाषेत कविता असते, तसेच ही कविता प्रत्येक व्यक्तिमत्त्वात दडलेली असते. कविता ही एक आंतरिक घटना असते. भाववृत्ती हाच तिचा आशय असतो. ती कविपरत्वे वेगळी असू शकते, कधी साध्यासुध्या रूपात, तर कधी क्लिष्ट स्वरूपात कविता मानवी जीवनातील अनुभवांना व्यक्त करत असते. मानवी जीवनातील रहस्ये कवितांतून प्रकट होत असतात.

सिंधुदुर्गमधील मालगुंड येथील केशवसुत स्मारकात एक वचन कोरलेले आहे : ''कवी म्हणजे आत्म्याचे चित्र रेखाटणारा चित्रकार!'' किती समर्पक आहे, ते! अंत:करणातून स्फुरलेले आणि अचूक, नेमक्या शब्दांत गुंफलेले काव्य हे कवीच्या श्वासोच्छ्वासासारखे असते. कविश्रेष्ठ कुसुमाग्रज म्हणाले होते, ''कवितेच्या स्वामित्वाची मुद्रा एकदा कपाळावर बसली म्हणजे माणसाच्या जीवनात एक विचित्र कैफ निर्माण होतो, तसा कैफ माझ्याही वाटेला आला. नेहमीप्रमाणे वेगळे आकार नि वेगळे रंग माझ्या दृष्टीला पडू लागले. कवितेने अनेक व्यथा, दुखणी माझ्या दाराशी आणली असतील, हे खरं आहे; परंतु त्याचबरोबर हेही खरं आहे की कवितेने मला जे सुख आणि समाधान दिले ते मला इतरत्र कुठेही मिळाले नाही.'' हाच अनुभव प्रत्येक अस्सल कवी उपभोगत असतो.



जो माणूस असतो तो कवी असतो. त्याचे शब्द ही दुनिया सुंदर व स्वच्छ करण्यासाठी लढत असतात. कवीला जिवंत माणसाचे हृदय लाभलेले असते. कवीचा लौकिक अर्थाने या युद्धात अनेकदा पराभव होतो, पण हे पराभव माणसाला आणि कवीला अजिंक्य बनवितात. कवी खऱ्या अर्थाने कधीच पराभूत होत नसतो. कवितांचे माहात्म्य इतके मोठे असते. कविता ही मितव्ययी, नेमकी आणि टोकदार रचना असते. ती कमी काळात, कमी शब्दांत वेगवान आवाहन करते. त्यामुळे तिच्यावरील जबाबदारी अधिक वाढते. हा जबाबदारीचा गोळीबंदपणा सैल पडला, तर कवितेची पडझड होते. त्यामुळे जबाबदार असणे, ही कवितेची पूर्वअट असते.

> **कविता ही एक आंतरिक घटना असते. भाववृत्ती हाच तिचा आशय असतो.**

कविता तुम्हाला शोधत येत असते. तुम्ही कविता लिहिता हा केवळ भ्रम असतो. कविता हा कवीच्या उत्कट भावनांचा उत्स्फूर्त आविष्कार असतो. कविजन मनस्वी स्वभावाचे असतात कारण तो त्यांचा स्वभावधर्म असतो. काही कवी संयमी वृत्तीचे देखील असतात. उत्कट भावनेला ते विचारांची बैठक देतात. शुचिता, त्याग या मूल्यांवर त्यांची असीम निष्ठा असते. अजोड काव्यात्मक आवाजासाठी, ज्यांच्या साधेपणात सौंदर्य दडलेले असते आणि जे वैयक्तिकतेला वैश्विक परिणाम बहाल करण्याची कुवत त्यांच्याठायी असते. त्यांच्या कवितांचा नैसर्गिक स्वर, प्रांजळपणा, भावनिकता व अल्पाक्षरातील काव्यात्मकता ठळक उठून दिसणारी असते. आयुष्यात सगळ्यांनाच अनुभव येतात, पण त्याची कविता घडविणे ही कला साऱ्यांनाच जमत नाही.

कवी शशिकांत तिरोडकर म्हणतात, ''ठिणगीचा वणव्याशी आणि थेंबाचा समुद्राशी जसा आत्मसंबंध असतो तसा कवितेचा ठिणगीशी आणि थेंबाशी एकाचवेळी असावा.'' कविता झिरपते काळजाच्या आत, जसे पाणी जमिनीतून मार्ग शोधत जाते. कविता भरारी घेते तेव्हा तिला तिच्या पंखाने उडू द्यावे...

मोबाईल : 98 20 07 78 36

•

'सुवार्ता' साठी आपली जाहिरात, वर्गणी किंवा देणगी चेकद्वारा द्यायची असल्यास कृपया आपला चेक
**'The Suwarta Trust'**
ह्या नावाने काढावा.
**- व्यवस्थापक**

# देवाचा सेवक

-सिस्टर रिटा डिमेलो
मुळगाव / उरण

मॉन्सिनिअर जॉर्ज फर्नांडीस ह्यांना २०१९ मध्ये व्हॅटिकनतर्फे ‘देवाचा सेवक’ म्हणून घोषित करण्यात आले. ‘पुअर सिस्टर्स ऑफ अवर लेडी’ ह्या संस्थेचे ते संस्थापक होते. ख्रिस्तासाठी झपाटलेले आणि तळमळीने कार्य करणारे ते एक समर्पित धर्मगुरू होते.

मॉन्सिनिअर जॉर्ज ह्यांचा जन्म २३ एप्रिल १९०३रोजी गोवा येथील कोलवाले ह्या गावी झाला. संत फ्रान्सिस असिसी ह्या चर्चमध्ये त्यांचा बाप्तिस्मा झाला. बालपणीच संत फ्रान्सिसच्या जीवनाचा परिणाम त्यांच्यावर झाला. आपणही संत फ्रान्सिसप्रमाणे होऊन गरिबांची सेवा करावी ह्या उद्देशाने ते धर्मगुरू झाले.

१९३०मध्ये ते मुंबई धर्मप्रांतात धर्मगुरू म्हणून कार्य करू लागले. रोझरी चर्च, सालवासांव चर्च, दबूल, बलसार, गुजरात, कवेल, विलेपार्ले, सेंट मायकल चर्च (माहीम) व संत ॲण्ड्र्यू चर्च (बॅन्ड्रा) ह्या ठिकाणी त्यांनी पाळकीय कार्य केले. सर्व धर्मग्रामांत त्यांनी लोकांची आध्यात्मिक उन्नती व्हावी म्हणून तळमळीने कार्य केले आणि भाविकांमध्ये ख्रिस्ताच्या श्रद्धेची ज्योत पेटवली.

त्यांनी विविध संघटना स्थापन केल्या; उदा. वेदी सेवक, सोड्यालिटी, लिजन ऑफ मेरी, पवित्र हृदयाची लीग. सण्डे स्कूलची स्थापना करणारे मुंबई सरधर्मप्रांतातील ते पहिले धर्मगुरू. या सण्डे स्कूलचा मुलांना भरपूर फायदा झाला आणि शेकडो मुलं-मुली चर्चमध्ये हजेर राहू लागली. त्यांना श्रद्धेचे बाळकडू पाजणारे अनेक तरुण-तरुणी पुढे आले. त्यामधूनच धर्मगुरू-धर्मभगिनींचे बीज पेरले गेले. १९३९ मध्ये त्यांनी सण्डे स्कूलच्याच सात शिक्षिकांना घेऊन ‘पुअर सिस्टर्स ऑफ अवर लेडी’ची स्थापना केली. त्यामधूनच त्यांची भाची पेट्रेसिया फर्नांडीस हिला प्रथम ‘मदर जनरल’ म्हणून निवडून



दिले आणि संस्थेचे ध्येय्य ठरविले. गरीब मुलांसाठी अनाथालये, डोमॅस्टिक सायन्स क्लासेस, टेलरिंग क्लासेस, गरीब महिलांसाठी वैद्यकीय सेवा तसेच मुंबई धर्मप्रांतामध्ये कार्डिनल, बिशप ह्यांच्या कार्यालयात मदत करणे ह्यासाठी ‘पुअर सिस्टर्स ऑफ अवर लेडी’ ही संस्था भारतामध्ये व भारतीय लोकांसाठी उपलब्ध करण्यात आली. संस्थेचे छोटेसे रोपटे वाढत गेले. संस्थेमध्ये गोवा, केरळ, वसई, मुंबई येथील युवतींनी प्रवेश घेतला.

मॉन्सिनिअर जॉर्ज ह्यांची गुजराथ बलसार येथे बदली करण्यात आली. २००८मध्ये संस्थेच्या मदर जनरल सिस्टर तेरेजा पिंटो आणि माजी जनरल सिस्टर सिसिलिया डिसोजा ह्यांनी संस्थेचे संस्थापक कोण, ह्यावर अभ्यास करण्यास सुरूवात केली. संस्थेला पेपल सन्मान मिळावा ह्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू होते. ज्या धर्मग्रामात मॉन्सिनिअर जॉर्ज ह्यांनी कार्य केले होते तेथील वयस्कर धर्मगुरू व प्रापंचिक ह्यांची साक्ष घेण्यात आली. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि 'Testimonies of the Admirers & Life of Msgr. George' अशी दोन

**मॉन्सिनिअर जॉर्ज एक व्यक्ती नसून संस्था होते.**

पुस्तके उदयास आली. साक्षीदारातर्फे मॉन्सिनिअर जॉर्ज ह्यांनीच ‘पुअर सिस्टर्स ऑफ अवर लेडी’ ही संस्था स्थापन केली होती, असे ठाम मत व्यक्त करण्यात आले.

* बिशप बॉस्को पेन्हा साक्ष देतात की, ‘‘मॉन्सिनिअर जॉर्ज हे ख्रिस्ताचे खरे धडाडीने सुवार्ता पसरविण्याचे कार्य करत होते. ते पवित्र आणि प्रार्थनामय जीवन जगले. ह्यांच्याच पवित्र जीवनाचा परिणाम माझ्या जीवनावर झाला व त्याचे अनुकरण करून मला धर्मगुरू होण्याची प्रेरणा लाभली.’’

* फादर ऑस्टीन नोरीस लिहितात, ‘‘मला धर्मगुरू होण्यासाठी बोलावणारे मॉन्सिनिअर जॉर्ज होते. त्यांनी ख्रिस्तासाठी केलेले कार्य पाहून मी धर्मगुरू होण्यासाठी प्रेरित झालो.’’

अनेक धर्मगुरू आणि धर्मभगिनींनी साक्ष दिल्या आहेत की आमच्या जीवनात देवाच्या मळ्यात काम करण्यासाठी बीज पेरणारे हेच ते पवित्र धर्मगुरू. त्यांच्या उत्तम कार्याची दखल घेऊन त्यांना व्हॅटिकन तर्फे ‘देवाचा सेवक’ म्हणून घोषित केले.

संस्था स्थापन केल्यानंतर मॉन्सिनिअर तवारीस व बिशप एडविन कोलासो ह्यांनी वसईच्या धार्मिक कुटुंबातील मुलींना ह्या संस्थेत आणण्यासाठी प्रयत्न केले आणि ५०हून अधिक तरुणींनी प्रवेश घेतला. आज अनेक सिस्टर्स भारत, रोम, व्हियाना, आफ्रिका, इटली आणि अमेरिका येथे प्रभूचे कार्य करत आहेत.

२जून १९७० रोजी मॉन्सिनिअर जॉर्ज हे जगातून निघून गेले. परंतु त्यांनी केलेली सेवा अमर झाली आणि संस्थेचे मोठ्या वृक्षामध्ये रूपांतर झाले. लवकरच त्यांना ‘धन्यवादित’ घोषित करावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

मोबाईल : 93 09 85 36 05

# युवक आणि न्यायव्यवस्था

-ॲड. बॅरीयन डाबरे
भुईगाव

दरवर्षी १२ ऑगस्ट रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुढाकाराने 'आंतरराष्ट्रीय युवा दिन' साजरा केला जातो. ह्या दिवसाचा उद्देश युवकांच्या क्षमता, समस्या, संधी आणि राष्ट्रनिर्माणातील त्यांच्या भूमिकेबाबत जनजागृती करणे हा आहे. भारत हा जगातील सर्वाधिक युवा लोकसंख्या असलेला देश असल्याने देशाच्या विकासात युवकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. शिक्षण, कौशल्य व रोजगाराइतकीच कायद्याची जाणीव व न्याय व्यवस्थेवरील विश्वास हीदेखील राष्ट्राच्या प्रगतीसाठी आवश्यक बाब आहे.

लोकशाही व्यवस्थेत न्यायव्यवस्था ही नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण करणारा प्रमुख आधारस्तंभ आहे. युवकांनी आपल्या घटनात्मक अधिकारांसोबतच कर्तव्यांची जाणीव ठेवून कायद्याचे पालन करणे, अन्यायाविरुद्ध कायदेशीर मार्गाने आवाज उठविणे आणि सामाजिक उत्तरदायित्व स्वीकारणे आवश्यक आहे.

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शिक्षणाचा अधिकार, जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार ह्यांसारखे मूलभूत अधिकार दिले आहेत. त्याचबरोबर संविधानाप्रति निष्ठा, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण, पर्यावरण संवर्धन व कायद्याचा आदर ही प्रत्येक नागरिकांची मूलभूत कर्तव्ये आहेत. युवकांनी अधिकारांसोबत कर्तव्यांचाही तितक्याच जबाबदारीने स्वीकार केला पाहिजे.

आजच्या डिजिटल युगात युवकांचा मोठा सहभाग सामाजिक माध्यमांवर आहे. माहितीचे जलद प्रसारण होत असताना सायबर गुन्हे, ऑनलाईन फसवणूक, आर्थिक गैरव्यवहार, ओळख चोरी, महिलांविरोधातील ऑनलाईन छळ आणि खोट्या माहितीचा प्रसार ह्यांसारखी गंभीर



आव्हानेही वाढत आहेत. त्यामुळे माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित कायदे, सायबर सुरक्षा आणि डिजिटल जबाबदारी ह्यांचे ज्ञान प्रत्येक युवकाला असणे आवश्यक आहे.

न्यायव्यवस्था केवळ गुन्हेगारांना शिक्षा देण्यापुरती मर्यादित नसून नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण, सामाजिक न्यायाची स्थापना आणि दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते. कायदेशीर मदत, लोक अदालती, ग्राहक न्यायालये, महिला आयोग, बालहक्क आयोग व मानवाधिकार आयोग ह्यांसारख्या संस्थांची माहिती युवकांना असणे गरजेचे आहे.

**आंतरराष्ट्रीय युवा दिन युवकांना संविधानिक मूल्ये ह्यांची जाणीव करून देण्यासाठी...**

युवकांमध्ये कायदेविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि कायदे क्षेत्रातील व्यावसायिक ह्यांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. संविधान वाचन, कायदेविषयक शिबिरे, मॉक कोर्ट, सायबर सुरक्षा कार्यशाळा, मतदार जागृती अभियान आणि कायदेशीर सल्ला शिबिरे ह्यांमुळे युवक अधिक जागरूक व जबाबदार नागरिक बनू शकतात.

आजची युवाशक्ती बंदुकीने नव्हे, तर ज्ञान, संविधानिक मूल्ये, कायद्याचा आदर, सामाजिक बांधिलकी आणि लोकशाही प्रक्रियेत सहभाग ह्याद्वारे देशाला अधिक सक्षम, न्याय आणि प्रगत बनवू शकते.

ह्या संदर्भात सामाजिक, कायदे-विषयक आणि युवा नेतृत्वातून कार्य करणारे अनेक तरुण आज समाजात सकारात्मक बदल घडवून आणत आहेत. युवा नेते अभिजीत दिपके ह्यांसारखे तरुण न्याय, सामाजिक उत्तरदायित्व, युवकांचे संघटन आणि जनजागृती ह्यासाठी सातत्याने कार्य करत असून, लोकशाही प्रक्रियेत युवकांचा सकारात्मक सहभाग किती महत्त्वाचा आहे, ह्याचे ते एक उदाहरण ठरतात. अशा नेतृत्वातून युवकांना समाजकारण, संविधानिक मूल्ये आणि जबाबदार नागरिकत्वाची प्रेरणा मिळते.

'आंतरराष्ट्रीय युवा दिन' हा केवळ उत्सवाचा दिवस नसून युवकांना संविधानिक मूल्ये, कायद्याचा आदर आणि सामाजिक उत्तरदायित्व ह्यांची जाणीव करून देण्याची संधी आहे. जागरूक, कायद्याचे पालन करणारे व न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवणारे युवक हेच भारताच्या लोकशाहीची खरी ताकद आहेत.

स्वातंत्र्यसैनिकांनी मिळवून दिलेले स्वातंत्र्य टिकवून ठेवणे आणि भारताला विकसित, न्याय्य व समृद्ध राष्ट्र बनविण्याची जबाबदारी आजच्या युवकांच्या खांद्यावर आहे. सशक्त युवक, सक्षम न्यायव्यवस्था व जागरूक समाज ह्यांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच विकसित भारताचे स्वप्न साकार होईल.

मोबाईल : 92 70 63 15 99

# एक्स्ट्रीम हॉलिडेज (तुस्कानो टूर्स)

**१) आरोग्यदायी माता वेलंकनी (मद्रास माऊली) :**
दि. २७ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर २०२६. संपूर्ण नोव्हेना खर्च रु. २९,०००/-मात्र. (चार व्यक्तीस एक रूम). पाच दिवसांचा नोव्हेना खर्च रु. १९,०००/-मात्र. (४ व्यक्तींस एक रूम). वरील रकमेत ट्रेन प्रवास 3Tier A.C. समाविष्ट. विमानप्रवास पर्याय उपलब्ध. फक्त रूम व जेवण, ए.सी., नॉन ए.सी. रूम इ. पर्याय उपलब्ध.

**अ) हॉटेल रेहा पार्क :** दोन्ही चर्च समान अंतरावर शांत व निसर्ग रम्य परिसर.

**ब) हॉटेल पिकनिक :** नवीन चर्चच्या बाजूला. नवीन रूम्स्. उत्कृष्ट भोजन व्यवस्था - व्हेज-नॉन व्हेज अनलिमिटेड बुफे सर्विस.

**२) निराश व असहाय्य लोकांचा आश्रयदाता संत ज्यूड (झांशी) नोव्हेना व साईट सीन :**
दिनांक २४ ते २९ ऑक्टोबर २०२६. डिलक्स हॉटेल, ए.सी.रूम, प्रवास, निवास, भोजन खर्च रु.२१,०००/- (राजधानी एक्सप्रेस 3Tier A.C). रु. १९,०००/-मात्र. (पंजाब मेल 3Tier A.C).

**३) केरळ सहल :** दिनांक ६ ते १६ नोव्हेंबर २०२६. खर्च रु. ४४,०००/-. (दोन व्यक्ती एक रूम प्रमाणे). एर्नाकुलम, कोची, मुन्नार, टेकडी, कोट्टयम, त्रिवेंद्रम, कन्याकुमारी.

**४) रॉयल राजस्थान सहल :**
दिनांक ०५ ते १६ नोव्हेंबर २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. ४४,०००/-मात्र. (दोन व्यक्ती एक रूम प्रमाणे). माऊंट अबू, जयपूर, चितोडगड, बिकानेर, जोधपूर, जैसेलमेर, उदयपूर.

**५) दिल्ली, आग्रा, भरतपूर, जयपूर सहल :**
दिनांक ५ नोव्हें. ते १३ नोव्हें २०२६.
एकूण खर्च रु. ३४,०००/-मात्र .

* सहल क्रमांक २-३-४-५ ट्रेन प्रवास ३टायर ए.सी. (विमान प्रवास पर्याय उपलब्ध). हॉटेल ३स्टार कॅटेगरी. साईटसीन २×२ ए.सी. कोच, सर्व एन्ट्री फी, गाईड, भोजन खर्च समाविष्ट.

* **विश्वासपात्र नाव विश्वासपात्र सहली**

**अधिक माहितीसाठी संपर्क : न्यूमन तुस्कानो, नंदाखाल**
**8007621516 / 9222337051**

# SARAH & SARAH TOURS
Since 2005

**१) मद्रास-वेलंकनी नोव्हेना :**
दिनांक २९ ऑगस्ट ते ८ सप्टें. २०२६.
अलिशान चर्चजवळील हॉटेल्स, व्हेज-नॉनव्हेज बुफेची रेलचेल. वेलंकनी येथे डायरेक्ट येणाऱ्या गेस्टसाठी जेवणाचे अनलिमिटेड बुफे उपलब्ध आहेत.

**२) स्टॅच्यू ऑफ युनिटी-बडोदा-सुरत सहल :**
दिनांक २५ ते २७ सप्टेंबर २०२६ आणि दिनांक २८ ते २९ डिसें. २०२६. वंदे भारत व इंटरसिटी ए.सी. ट्रेन, श्री स्टार हॉटेल सयाजी इफ्फोटेल. एकूण खर्च प्रत्येकी रु. ११,०००/- (चार जणांस एक रूम).

**३) अंदमान-निकोबार, पोर्टब्लेअर-हॅवलॉक सहल :**
दिनांक ०३ ते ८ ऑक्टो. २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. ६५,०००/-विथ फ्लाईट.

**४) दिल्ली, आग्रा, ग्वाल्हेर, सेंट ज्युड नोव्हेना, झाशी :**
राजधानी ट्रेनने : दिनांक २० ते २९ ऑक्टो.२०२६. खर्च प्रत्येकी रु. ३१,०००/- (चार जणांस एक रूम)

**५) रमणीय श्रीलंका-कॅन्डी बेनटोटा, न्यू एलिया, कोलंबो**
दिनांक ७ ते १२ नोव्हेंबर २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. ७२,०००/- विथ स्पेशल डिस्काऊंट.

पापडी कथिड्रलमध्ये अनेक चर्चसंलग्न संघटना कार्यरत आहेत. त्यामध्ये स्त्रियांच्या सोडॅ्यालिटीचे कार्य विशेष स्पृहणीय आहे. स्वत:ची आध्यात्मिक प्रगती साधणे, हा सोडॅ्यालिटीचा मुख्य उद्देश आहे. हा हेतू साध्य करीत असतानाच चर्चच्या प्रत्येक कार्यात त्यांचा सहभाग असतो. मरिया मातेप्रमाणे सर्वांवर मायेची पाखर घालण्यासाठी व मदत करण्यासाठी त्या तत्पर असतात.

आज स्त्रिया नवीन आव्हाने स्वीकारित आहेत. त्यांच्याकडे ज्ञान, अनुभव आणि नेतृत्व गुण आहेत. त्यामुळे सर्वच क्षेत्रांत त्या चमकू लागल्या आहेत. त्यांच्या सक्षमीकरण, सबलीकरणाला केवळ त्याच जबाबदार आहेत. सोडॅ्यालिटीच्या माध्यमातून स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाला व कर्तृत्वाला वाव मिळतो. जिवाभावाच्या मैत्रिणी मिळाल्याने सुख-दु:खे वाटून घेता येतात. प्रार्थना व प्रबोधनामुळे दोन शब्द कानावर पडल्यामुळे ते संस्कार घरादारापर्यंत झिरपतात.

[*ऋणनिर्देश : प्रस्तुत लेखासाठी ९५ वर्षीय श्रीमती कॉलेट फिलीप डिसोजा (ओळंबवाडी) ह्यांनी विशेष माहिती पुरवली आहे.*]

•



NG
NIKHIL GROUP
EMPOWERING PEOPLE | ENHANCING LIVES
Nikhil N. Gonsalves
Founder & Chairman
Nikhil Group - Since 2014
8551861295
8983704654
NIKHIL GROUP HAS 3 VENTURES
Nikhs Consultancy International Firm
PHOENIX EVENT MGT CO
We Create, You Celebrate
REGINA FOUNDATION (PUBLIC TRUST)
Offices at Merces, Bangli, Stella & Palghar
GST No:- 27AEKPG2575A1ZR
Nikhs Consultancy
international Firm
Consulting & Advisory Firm - 2014
LIST OF SERVICES
Net Worth Certificate
Udyam Aadhar
Gumasta
Domicile
Pan card
Gazzate
Life Insurance
Mediclaim
Food License (FSSAI)
Income Tax Returns
GST Registration
LLP & Company Registration
NGO & Trust Registration
Start Up India Registration
Project Report (Loan)
Internal Audit
International Tax
Merger & Acquisitions
Arbitration & Negotiations
We are income Tax Specialists,
File your returns with us Today
INCOME TAX RETURN
EXPERT ADVICE
TRUSTED SERVICE
TIMELY DELIVERY
100% COMPLIANCE

# लोक परमेश्वरापासून दुरावत आहेत?

**- जॉना वि. फरेरा**
पाली



हे प्रभो परमेश्वरा तू म्हणतोस, ''भिऊ नकोस. मी तुझ्या पाठीशी आहे.'' इतका विश्वास देत असूनही बरीच माणसे, तरुण-तरुणी तुझ्यापासून दूर का जात आहेत?

जग बदलत चाललंय. पूर्वीचा काळ आणि आताचा काळ ह्यात जमीन अस्मानाचा फरक पडला आहे. आताच्या ह्या यांत्रिक युगात नवनवीन शोध लागत आहेत. परंतु जितकी प्रगती तितकी अधोगतीही होत आहे. मोबाईलमुळे सर्व चांगले संस्कार मागे पडले. कारण ह्या वस्तूचा वापर चांगल्या गोष्टींसाठी कमी व वाईट गोष्टींसाठी अधिक प्रमाणात होत आहे. ह्यामुळे माणूस आळशी बनला आहे. अंगमेहनत कमी, बुद्धीला चालना नाही. घरातील अन्नापेक्षा फास्टफूडला अधिक महत्त्व. कारण एक कॉल करताच हवं ते रेडिमेड आपल्या दारात हजर असते. हातात चोवीस तास मोबाईल असतो. त्यामुळे घरातील व्यक्तीशी संवाद कमी. मोठ्यांना ना मान, ना सन्मान. घरातील आजारी व्यक्तीबद्दल सहानुभूती नाही. इतके ह्या मोबाईलमध्ये बरेच जण गुरफटून गेले आहेत. मोबाईलचे वेड म्हाताऱ्या-कोताऱ्यापासून तर चड्डीत सु-सू करणाऱ्या छोट्या बाळापर्यंत लागले आहे. कानाला लावून तोही 'हॅलो' करतच आईच्या हातचा घास घेतो. मोबाईल हा कुठपुतली बाहुलीसारखे एक खेळणे झाले आहे.

अनेक तरुण-तरुणी रात्रभर आपल्या खोलीत मित्र-मैत्रिणींबरोबर मोबाईलवरून काय चॅटींग करत असतात. देवाला ठाऊक! रात्रभर जागरण, सकाळी उठवत नाही. आळसावलेलं शरीर, निरुत्साही चेहरा. रविवारी आठवड्यातून एकदाच देवळात जातात; पण तेही उशिरा, चर्चमध्ये तर प्रवेश सुद्धा करत नाहीत. चर्चच्या आवारात दूरवर आपल्या मित्र-मैत्रिणींबरोबर बसतात. हातात मोबाईल चालू व गप्पागोष्टी रंगात येतात. चर्चमधील विधींकडे लक्षच नसते. हातात मोबाईल सांभाळतील परंतु तेच हात देवापुढे जोडले जात नाहीत. हाताने कपाळावर क्रुसाची खूण नाही, हाताने पिता-पुत्र नाही. इतके हात जड होतात. तोंड तर उघडत नाही. हातात सतत

> **आपण गरजेपुरता देवाचा धावा करतो. गरज संपली की देवाला विसरतो.**

मोबाईल बाळगणाऱ्या किती मुलांच्या हातात किंवा खिशात रोझरी असते? कारण ती मोबाईलपेक्षा जड वाटते.

सर्व रेडिमेड. त्यामुळे वाचनाची गोडी नाही. मग आपला पवित्र ग्रंथ बायबलच्या बाबतीत काय? मुलांना बायबलची ओळख आहे का? की फक्त आम्ही नावाला ख्रिस्ती? आपला प्रभू परमेश्वर कर्ता-करविता सर्व इच्छा पूर्ण करणारा, त्याची दिवसभरात किती वेळा आपण आठवण करतो? गरजेपुरती देवाचा धावा करतो. गरज संपली की देवाला विसरतो. 'गरज सरो, वैद्य मरो.' पण लक्षात ठेवा ''मनी नाही भाव आणि देवा मला पाव! देव अशाने पावायचा नाय रं, देव बाजारातला भाजीपाला नाय रं!''

माणसं काम झालं की देवाला व जन्मदात्या आईवडिलांना एकटे सोडून किंवा आश्रमात ठेवून दूर परदेशी जाऊन संसार थाटतात. मग आईवडील जगो वा मरो, त्याचे आम्हांला सोयरसुतक नाही. लढाया, भूकंप, वादळ, पूर, रोगराई, महागाई, राजकारण, जातीभेद, दहशतवाद, बलात्कार, खून, मारामाऱ्या, आत्महत्या, जात, धर्म, भाषा ह्यावरून चाललेले वाद ह्या सर्व गोष्टींमुळे माणसाला जीवन जगणं कठीण झाले आहे. आता कोण कुणाचा राहिला नाही. बरीच मुलं वाईट नाद, वाईट छंद, वाईट संगत ह्यात इतकी गुरफटून गेली आहेत की त्यातून त्यांना बाहेर पडणं कठीण झालं आहे.

बाळांनो, देव दयाळू-मायाळू-कृपाळू-ममताळू, दयेचा सागर आहे. तो सर्वांवर सारखेच प्रेम करतो. प्रभूला नको तुमचा पैसा-अडका, नको तुमची धनदौलत. तो फक्त तुमच्या प्रेमाच्या दोन शब्दांचा भुकेला आहे. म्हणून निदान सकाळी उठल्यावर व रात्री झोपताना तरी त्याचे आभार माना. त्याची स्तुती करा. त्याला धन्यवाद द्या. अशक्य असे काहीच नाही. तुम्ही मनापासून मागा. तो तुम्हाला सर्वकाही देईल.

मोबाईल : 86 98 73 88 67

## O2 HOLIDAY S

CONTACT NO. 9867681493- 9503569393
EMAIL : 02holidays1403@gmail.com

### आगामी सहल कार्यक्रम

**१) मद्रास - वेलंकनी माता सहल :**
दिनांक ४ ते ८ सप्टेंबर २०२६. वास्तव्य : हॉटेल व्हीपीएन ग्रॅण्ड. सहल खर्च. ए.सी.रूम व जेवण स्वतंत्र रुम पर्याय उपलब्ध आहे.

**२) व्हिएतनाम :** दि. ३ नोव्हेंबर ते ११ नोव्हेंबर २०२६. ७ रात्र ८ दिवस, हनोई, दानांग, हो ची मिन, हॅलोग बे क्रुझ, जेवण व स्थळदर्शन, ४ वेळा विमान प्रवास. खर्च रु. १,२८,०००/-.

**३) अंदमान,** हेवलॉक, नील, बाराटांगा आयलँड, पोर्ट ब्लेअर सहल : दि. ८ ते १३ नोव्हेंबर २०२६. खर्च रु. ७५,०००/-

**४) बँकॉक-पट्टाया-थायलंड :** दिनांक ८ ते १२ नोव्हें. २०२६. विमान प्रवास, स्थळदर्शन, जेवण, सहल खर्च रु. ७५,०००/-.

**५) अप्रतिम श्रीलंका :** दि. ७ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २६. कोलंबो, कँडी, न्युआरा एलिया, बेनटोटा, सहल खर्च रु. ७५,०००/-.

**६)पावसाळी सहल - भंडारदरा धरण व धबधबा :**
दि. २२ ते २३ऑगस्ट. ए.सी.बस. सहल खर्च रु. ५,५००/-.

**टिप :-** देश विदेशात स्वतंत्र, ग्रुप टुर, चर्च, शाळा, महिला व ज्येष्ठ नागरिक संघटना आणि हनिमून पॅकेजसाठी संपर्क करा.

**संपर्क :** मिल्टन डिकोस्टा : C/o **9867681493**
विन्सेंट रॉड्रिग्ज : **9503569393**
सोन्या गासकर : C/o **9004754696**

## अॅडवेंचर टूर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स्

**१) हाय-फाय श्रीलंका, कँडी,नुवारा एलिया,बेंटोटा,कोलंबो:** दिनांक ०७ नोव्हेंबर ते १३ नोव्हेंबर २०२६. ६ रात्री व ७ दिवस. ४ स्टार हॉटेल, फक्त रु. ७५,०००/- प्रति व्यक्ती.

**२) निसर्गरम्य हिरवेगार केरळ मुन्नार, टेकडी, अलॅप्पी (हाऊसबोट), कोवलम, कन्याकुमारी, तिरूवनंतपुरम :** दिनांक ८ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर २०२६. येताना-जाताना एसी ३ टायर रेल्वे तिकिटांसह. ६ रात्री व ७ दिवस. फक्त रु. ४०,०००/- प्रति व्यक्ती.

**३) रॉयल राजस्थान, जयपूर, उदयपूर, जोधपूर, जैसलमेर (टेंट स्टेसह)** : दि. ९ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२६. येताना-जाताना एसी ३ टायर रेल्वे तिकिटांसह ८ रात्री व ९ दिवस. फक्त रु. ३३,७५०/- प्रति व्यक्ती.

**४) बर्फाळ मनाली (जानेवारी स्पेशल) :** मनाली, कुलू, सोलांग व्हॅली, पॅराग्लायडिंग, रिव्हर राफ्टींग, स्नो अॅक्टिव्हिटीज आणि बरेच काही. १ रात्र टेंटमध्ये व २ रात्री हॉटेलमध्ये, एसी ३ टायर रेल्वे प्रवास. फक्त रु. १९,९९९/- प्रति व्यक्ती.

**सीटस् मर्यादित आहेत. आजच बुकिंग करा आणि अविस्मरणीय सहलीचा आनंद घ्या.**

सहल क्रमांक २ ते ४ हा रेल्वेचा प्रवास असल्यामुळे दोन महिने अगोदर रेल्वे तिकीट बुकिंग होणार.

**संपर्क : मनोज डायस, मुळगाव**
869889414/8698894242/ 9833211715
email : adventurestourstravels@gmail.com

## व्ही.एम्. टूर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स

**आयोजक : टोनी डायस,** ओळंबवाडी–पापडी
**Contact : 8485890360 / 9320385977 / 9766398405**

### दुधनी सिल्वासा : २० ते २१ ऑगस्ट २०२६

रु. ४,५०० : एसी बस, व्हेज./नॉन.व्हेज. जेवण आणि एसी रुममध्ये राहण्याची व्यवस्था (४ जणांसाठी १ रूम), धमाल गेट-टुगेदर, चर्चसंलग्न ग्रुप असल्यास १ धर्मगुरू व १ धर्मभगिनीसाठी कुठलाही आकार घेतला जाणार नाही.

### वेलंकनी नोव्हेना : २७ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०२६

१०,२५०- ३ दिवस नोव्हेना, ए.सी.रूम+ जेवण. १३,५००- ५ दिवस नोव्हेना, ए.सी.रूम+ जेवण. २३,०००- संपूर्ण नोव्हेना, ए.सी. रूम+जेवण. २८,५००- संपूर्ण नोव्हेना, ए.सी.प्रवास 3AC (वसई/मुंबई ते वेलंकनी व रिटर्न)+ए.सी. रूम+जेवण (४ जणांसाठी १ रुम) ३९,०००- संपूर्ण नोव्हेना, विमान+ ए.सी. रूम+जेवण. निवासव्यवस्था- **हॉटेल होली सँड,** मुख्य देवळाच्या समोर (एक मिनिटभराच्या अंतरावर) (वेलंकनी येथे घरगुती जेवण दिले जाईल. रोटी/चपाती/व्हेज/नॉनव्हेज. जेवणाच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील. ब्रेकफास्ट, व्हेज/नॉनव्हेज. थाळी पार्सलद्वारे दिली जाईल.)

### सेंट ज्यूड नोव्हेना, झाँसी (२४ ते ३० ऑक्टो. २६)

२१,०००- जाता-येता राजधानी 3AC+ए.सी.रूम+ जेवण+ १दिवस- आग्रा सिटी/ ताजमहाल/लाल किल्ला, १ दिवस- ग्वाल्हेर सिटी, ३ दिवस- झाँसी सिटी/ किल्ला व शॉपिंग (सर्व एन्ट्री समाविष्ट) (४ जणांसाठी १ रुम). **निवासव्यवस्था:** हॉटेल यात्रिक एसी डायनिंग हॉल+लिफ्ट+वायफाय (स्पॉट प्राईजसह स्पेशल गेट टुगेदर- २७ ऑक्टो.) (चर्च पाच मिनिटे पायी अंतरावर)

### झाँसी–दिल्ली–आग्रा–ग्वाल्हेर (२४ ऑक्टो. ते २ नोव्हें. २६)

४ दिवस झाँसी/३ दिवस दिल्ली. दिल्ली साईटसीन- कुतुब मीनार, अक्षरधाम मंदिर, राजघाट, लोटस टेंपल, जामा मस्जिद, इंडिया गेट, राष्ट्रपती भवन, लाल किल्ला, चांदनी चौक, शॉपिंग- मीना बाजार, सदर बाजार. ३५,०००- जाता-येता राजधानी 3AC + ए.सी. रूम+ जेवण

### रॉयल राजस्थान : ४ ते १६ व ९ ते २१ नोव्हें. २०२६

**जयपूर** (२ रात्र)- हवा महल, बिर्ला मंदिर, आमेर किल्ला, पॅलेस. **पुष्कर** (१ रात्र)- ब्रह्मा मंदिर, पुष्कर लेक. **बिकानेर** (१ रात्र)- जुनागड किल्ला, पटवा हवेली. **जेसलमेर** (२ रात्र)- कँपमध्ये १ रात्र वास्तव्य, कॅमल सफारी, कलबेलीया नृत्य, जेसलमेर फोर्ट, तनोत माता मंदिर, गडिसर लेक. **जोधपूर** (१ रात्र)- मेहरागड फोर्ट, जसवंत थडा, उमेद भवन. **चित्तोडगड** (१ रात्र)- कुंभा पॅलेस, मीरा मंदिर, विजयस्तंभ, जोहार स्थल, पद्मिनी पॅलेस, कीर्तिस्तंभ. **उदयपूर** (२ रात्र)- सिटी पॅलेस, सहेलीयों की बारी, पिचोला लेक, फतेहसागर लेक. **माऊंट अबू** (१ रात्र)- अचलगड किल्ला, नख्खी लेक, दिलवाडा मंदिर, सनसेट पॉईंट.

**मुंबई ते जयपूर आणि माऊंट अबू ते मुंबई (3AC) साईटसीन 2x2 AC बस. घरगुती जेवण, (3/4 Star) हॉटेलात राहण्याची सुविधा AC रुम (दोघांसाठी १ रुम) एकूण खर्च : रु. 45,000/- लहान मुलांचे रु. 39,000/- (४–११ वर्षे)**

### केरळ टूर : ४ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर २०२६

**मुन्नार** (२ रात्र)- माटुपेटी व कुंडला डॅम, टी म्युझियम, ब्लॉसम पार्क, बोटॅनिकल गार्डन ग्लास ब्रीजसह, झिप लेन, एर्नाकुलम नॅशनल पार्क, रोझ गार्डन. **ठेकडी** (१ रात्र)- मसाले प्लँटेशन, स्वखर्चाने एलिफंट सफारी, बोटींग, स्वखर्चाने कथकली नृत्य व इतर. **अलेप्पी** (१ रात्र)- हाऊसबोटमध्ये वास्तव्य. **कोवालम** (१ रात्र)- जटायू अर्थ सेंटर, वरकला बीच. मंदिरे व चर्चला भेट, शॉपिंग इ.

**वसई ते एर्नाकुलम व एर्नाकुलम ते वसई (3AC Rajdhani) साईटसीन 2x2 AC बस. घरगुती जेवण, (3/4 Star) हॉटेलात राहण्याची सुविधा AC रुम (दोघांसाठी १ रुम) एकूण खर्च : रु. 43,000/- लहान मुलांचे रु. 40,000/- (४–११ वर्षे)**

### वेलंकनी ख्रिसमस वीक टूर : २६ ते ३० डिसेंबर २०२६

रु. १०,००० : जेवण आणि एसी रुममध्ये राहण्याची व्यवस्था (४ जणांसाठी १ रूम), रु. २७,००० : संपूर्ण पॅकेज. जेवण आणि एसी रुममध्ये राहण्याची व्यवस्था (४ जणांसाठी १ रूम) मुंबई ते चेन्नई विमानप्रवास व चेन्नई ते वेलंकनी (3AC) रेल्वेप्रवास. सर्व साईटसीन (१ दिवस पॉंडिचेरी आणि १ दिवस पुंडीमाता तंजावर)

**Contact : Alister- 9011890360 / Francis- 9765443414 / Dennis- 8766589780 / Aurice- 9960107733**

# एक ‘मंथन मेळावा’

- **नोएल डाबरे**
निर्मळ

प्रख्यात साहित्यिक विजय तेंडुलकर ह्यांनी वसईतील आपल्या भाषणात सांगितले होते, ‘‘एक मोर्चा काढला म्हणजे तुमची लढाई संपली, असं नाही; तर हा अखंड चालणारा लढा आहे आणि तो अधिक तीव्रतेने तुम्हाला लढावा लागेल.’’ आज त्यांचे शब्द खरे ठरताना दिसत आहेत.

संघर्ष अजून थांबलेला नाही आणि तो थांबूनही चालणार नाही. परंतु आज आपल्या संघर्षाची दिशा भरकटत तर जात नाही ना? अशी चिंता वाटू लागली आहे.

गेल्या दहा-पंधरा वर्षांत राजकारणामध्ये जो बदल झालेला आहे, तो विधायक स्वरूपाचा नाही, हे आपण अनुभवत आहोत. ही आपली दुखरी जखम आहे. त्यामुळे ह्या बदलाचे परिणाम आपल्यालाही भोगावे लागत आहेत... आज कुणाच्या मांडीला मांडी लावून बसावे, कुणाचा हात हातात घ्यावा आणि कुणाच्या पायावर डोकं टेकवावं... हा प्रश्न सर्वसामान्य वसईकरांना पडलेला आहे. आपले अस्तित्व धोक्यात आले आहे का? हा प्रश्न मनाला सतत भेडसावतो. वसई-विरार, नालासोपारा, नायगाव स्टेशन परिसरामध्ये टोलेजंग इमारती, टॉवर उभे राहत आहेत, त्याचा शिरकाव आपल्या गावातही झालेला आहे. मुंबईला घरं परवडत नाहीत. म्हणून लोक आपल्या परिसरामध्ये घरं घेत आहेत. त्यामुळे प्रचंड प्रमाणामध्ये लोकसंख्या वाढत आहे आणि त्या लोकसंख्येला पुरेशा नागरी सुविधा उपलब्ध नाहीत. वीज, रस्ते, पाणी, परिवहन सेवा, आरोग्य, स्वच्छता ह्यांचा पूर्ण बोजवारा उडालेला आहे. परप्रांतीयांचा हा भार स्थानिकांना सहन करावा लागत आहे. प्रत्येक सुट्टीच्या दिवशी आणि आदल्या दिवशी मोठ्या



प्रमाणात ट्राफिकचा प्रश्न निर्माण झाला आहे. अर्नाळा, नवापूर, राजोडी, कळंब, भुईगाव, रानगाव ह्या किनारपट्टीवर पर्यटनासाठी मोठ्या प्रमाणामध्ये लोक बाहेर पडतात. हे बहुतांश लोक स्टेशन परिसरातील इमारतीमध्ये राहणारी आहेत. त्यांच्यासाठी मनोरंजनाच्या पार्क, गार्डनसारख्या कोणत्याच सोयी उपलब्ध नाहीत. त्यामुळे विरंगुळा किंवा मनोरंजनासाठी ते समुद्रकिनाऱ्याचा सहारा घेतात आणि आपल्या गावातले सर्व रस्ते ट्रॅफीकने जाम होतात. तासनतास लोक ट्रॅफीकमध्ये अडकतात.

> **दिवसागणिक नवीन समस्या, संकट आणि अडचणी निर्माण होत आहेत.**

निर्मळची यात्रा ही स्थानिकांची फार मोठी डोकेदुखी बनली आहे. जवळजवळ आठ ते दहा दिवस निर्मळला येणारे सर्व रस्ते जाम होऊन जातात. निर्मळच्या तलावातले पाणी तीर्थ म्हणून प्राशन केले जात असे. आज त्या तलावाची एका सांडपाण्याच्या डबक्याहूनही वाईट अशी अवस्था झालेली आहे. पिण्याचे शुद्ध पाणी पुरविणे हे महानगरपालिकेचे काम आहे; परंतु गेल्या दहा-पंधरा वर्षात कोणाच्याही घरात पाण्याचा एक थेंबही आलेला नाही आणि ह्या वर्षापासून कर आकारणी मात्र केलेली आहे.

आपल्या गाव नाक्यावर, आपल्या बसमध्ये किंवा आपल्या ट्रेनमध्ये प्लॅटफॉर्मवर आपला माणूस शोधून सापडत नाही. सर्वत्र अनोळखी चेहरे वाढत आहेत. काही दिवसांपूर्वी ट्रेनमध्ये एका २२वर्षाच्या तरुणाचा क्षुल्लक कारणावरून खून करण्यात आला. ज्याचा खून झाला तो मुलगा विरारला राहणारा होता आणि खून करणारा हा मुंबईचा होता. दिवसागणिक नवीन समस्या, संकट आणि अडचणी निर्माण होत आहेत.

आपल्या वसईमध्ये अनेक संघटना आपापल्या परीने ह्या समस्या सोडविण्यासाठी सतत संघर्ष करत आहेत. निवेदन देत आहेत, मोर्चे काढत आहेत आणि आंदोलनेही करत आहेत. ही खूप चांगली आणि जमेची बाब आहे. परंतु प्रत्येकाच्या वेगळ्या वाटा झाल्या तर आपलीच ताकद विभागली जाते ना?

आपण ज्यांना निवडून दिले आहे ते सर्व नगरसेवक आणि आपल्या समस्या ह्या काही वेगळ्या आहेत का? त्यांनादेखील ह्याची जाणीव असेलच ना? आणि नसेल तर ती जाणीव करून देण्याची जबाबदारी आपलीच आहे. कारण काही नगरसेवक अगदी तरुण आणि नवखे आहेत. संघटना आपल्या, नगरसेवक आपले, वसई आपली आणि आपण भूमिपुत्र... म्हणून सर्व संघटनांचे पदाधिकारी आणि आपण निवडून दिलेले सर्व नगरसेवक ह्यांचा एक विचार मंथन मेळावा घेतला आणि सर्वांनी एकत्र येऊन सर्व समस्यांवर संघटितपणे काम केले तर नक्कीच आपल्या समस्या बऱ्यापैकी सुटू शकतील.

मोबाईल : 96 73 07 20 55 •


ELECTRO SOLAR
SOLAR & SECURITY SYSTEM
DON'T WORRY
Electro Solar
Will give 100% Zero Bill Solution
माझी स्वतःची वीज
कितीही लोडशेडिंग झालं तरी २४×७ घरातील सर्व विजेची साधने चालविण्यास पुरेशी वीज. आपल्या घरातच वीज तयार करा, बॅटरीमध्ये साठवा आणि गरजेनुसार वापरा.
२४×७ अखंड वीज
100% झिरो वीज बिल
बॅटरीमध्ये वीज साठवा, गरजेनुसार वापरा
हायब्रिड सिस्टम – ग्रिड, सोलर आणि बॅटरीचा परफेक्ट संगम
पर्यावरणपूरक आणि सुरक्षित
24 X 7 HOT WATER
सोलर पॅनल्स हाय एफिशन्सी
हायब्रिड इन्व्हर्टर
लिथियम / लीड बॅटरी
१० वर्षाची सर्व्हिस गॅरंटी
व्यावसायिक इन्स्टॉलेशन
वीज बिलात मोठी बचत
ELECTRO
BAT 100%
LiFePO4
30 वर्षापर्यंत जास्त अनुभव
का निवडाल Electro Solar?
✔ गुणवत्तापूर्ण साहित्य
✔ वेळेवर इंन्स्टॉलेशन
✔ कमी देखभाल, जास्त कामगिरी
✔ संपूर्ण तांत्रिक सपोर्ट
✔ ग्राहक समाधान हीच आमची ओळख
10 YEAR SERVICE GUARANTEE
The proprietor has not used the electricity meter for the past 20 years.
Contact: +91 9890298008 / +91 9022098008
Vasai (West), Palghar, Maharashtra
Time: 9:30 AM - 6:00 PM

# आपल्या भारत देशाची गौरवशाली बाब

## आपुलकी

मी आगाशीला १०वर्षांपासून 'आस्वाद किचन' हे छोटेसे हॉटेल चालवतो. इथे श्रीमंतांपासून रोजंदारीवर काम करणारा मजूर एकाच ताटात जेवतो. कोणी उपाशी राहत असेल तर शेजारचा बिल भरतो. पावसात भिजलेला माणूस आला की आधी चहा देतो, पैसे नंतर. धर्म, जात, पैसा इथे दुय्यम ठरतो. फक्त माणुसकी शिल्लक राहते. ही आपुलकी, हे प्रेम, हे एकमेकांना सांभाळून घेणे - हेच भारताचे खरे सोने आहे. हेच आपल्याला जगावेगळे बनवते.

- **नागेश प्रमोद राऊत**, आगाशी, भंडारवाडा
मोबाईल : 90 28 28 38 75

## बहुसांस्कृतिक वारसा

भारताची सर्वांत गौरवशाली बाब म्हणजे आपली 'विविधतेतील एकता' आणि आपली 'समृद्ध संस्कृती'. 'मेरे देश की धरती सोना उगले, उगले हिरे मोती, मेरे देश की धरती!' जगाच्या पाठीवर भारत हा एकमेव असा देश आहे, जिथे अनेक भाषा, अनेक धर्म, विविध संस्कृती, परंपरा आणि वेशभूषा असूनही आपण सर्वजण भारतीय म्हणून एकमेकांशी प्रेम, बंधुभाव आणि आदराने राहतो. आपल्या देशाचा हा बहुसांस्कृतिक वारसा जगाला अचंबित करतो. आज शाळा, कॉलेज, कचेरी, बाजारपेठ, हॉटेल, सिनेमागृह, बस-ट्रेन इत्यादी सार्वजनिक ठिकाणी सर्वधर्मस्नेहभावाचे उदाहरण आपल्याला पाहायला मिळते. भारताने जगाला योग, आयुर्वेद, शून्याचा शोध, अध्यात्म आणि अहिंसेचा संदेश दिला आहे. ह्यासोबतच, भारताने जगाला शांतता, अध्यात्म आणि 'वसुधैव कुटुंबकम्' हा उदात्त विचार दिला आहे.

आज आपला देश प्राचीन वारसा जपत विज्ञान, तंत्रज्ञान व क्रीडा क्षेत्रांत जागतिक स्तरावर नवनवीन शिखरे सर करत आहे. अवकाश संशोधन ह्या क्षेत्रांतही भारताने उल्लेखनीय प्रगती केली आहे. भूतकाळातील गौरवशाली इतिहास आणि भविष्यातील प्रगतीची स्वप्ने ह्यांचा हा सुंदर संगमच भारताला जगात सर्वांत श्रेष्ठ आणि अद्वितीय बनवतो. ह्या सर्व गोष्टींमुळे प्रत्येक भारतीयाला आपल्या देशाचा अभिमान वाटतो आणि भारताची गौरवशाली परंपरा अधिक उज्ज्वल करण्याची प्रेरणा मिळते. आपल्या भारत देशाला भ्रष्टाचाराची कीड लागली नसती तर आपला देश जगामधील सर्वांत प्रगतीशील व प्रबळ देश बनला असता ह्यात शंका नाही.

- **कॅथरीन इरेमस फरगोज,** गास

## उत्सवप्रियता!

भारतीय संस्कृतीची सर्वांत मोठी ताकद म्हणजे आपली उत्सवप्रियता. आपल्याकडे सण केवळ साजरे केले जात नाहीत, तर ते जगले जातात. विविधतेने नटलेल्या ह्या देशात सण-उत्सव हे सर्वांना एकाच धाग्यात बांधणारे माध्यम आहेत. आजच्या धावपळीच्या आणि एकाकी युगात हेच उत्सव आपल्यातील संवाद जिवंत ठेवतात. जाती, धर्म आणि भेद विसरून जेव्हा लोक एकत्र येतात, तेव्हा सामाजिक सलोखा आणि एकतेची भावना अधिक दृढ होते. सुख-दुःख वाटून घेण्याची आणि एकत्र आनंद साजरा करण्याची ही आपली गौरवशाली परंपरा आहे ती संपूर्ण जगाला एकत्र येण्याचा आणि आनंदाने जगण्याचा संदेश देते.

- **जोसेफ डाबरे,** मावंडा, निर्मळ

## एकत्र कुटुंबपद्धती

आपला भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे. अधिकतर युवक संख्या ही आपल्याच देशाची आहे. कोणताही देश घडविण्यासाठी युवकांचे परिश्रम व मोठ्यांचा सल्ला उपयोगी पडत असतो आणि आपल्या लोकसंख्येनुसार आपणास दोन्ही लाभले आहेत.

सर्वांत गौरवशाली बाब म्हणजे एकत्र कुटुंबपद्धती. इतर देशांच्या तुलनेत भारत हा एकमेव देश आहे जिथे तरुण व वृद्ध एकत्र राहून एकमेकांस सांभाळतात. भारतात कुठल्याही तरुणास आपल्या आई-वडिलांस भेटण्यासाठी अपॉईंटमेंट घ्यावी लागत नाही. हवा तितका काळ ते आई-वडिलांसोबत राहू शकतात. आदर, प्रेम, बंधुभाव सतत अंगीकारणे हे इथल्या प्रत्येकाचे कर्तव्य समजले जाते. परंपरा आणि आधुनिकतेचा संबंध आणि समन्वय भारताचे विशेष वैशिष्ट्य आहे. म्हणूनच देशाची एकता आणि संस्कृती ह्या गौरवशाली बाबी आहेत.

- **ब्रिनल सेल्विन क्रास्टो,** नंदाखाल

# साधना सहकारी पतपेढी मर्यादीत

मुख्य कार्यालय : 'साधना भवन' आक्टण, सांडोर, ता. वसई, जि. पालघर - ४०१ २०१.
दूरध्वनी : 8080940385 Email : gm@sspmonline.com

| आक्टण शाखा | होळी शाखा | गणनाका शाखा | रमेदी शाखा | नाळा शाखा | सातिवली शाखा |
|---|---|---|---|---|---|
| 8080940386 | 8080940387 | 8080940388 | 8080940389 | 8080940390 | 8080940391 |

## तुमच्या प्रत्येक गरजेसाठी
## योग्य कर्ज
## साधना पतपेढीमध्ये उपलब्ध आहे.



- जामिनकी पत कर्ज
- गृह कर्ज
- वाहन कर्ज
- व्यवसाय कर्ज
- दागिना तारण कर्ज
- शैक्षणिक कर्ज

**सामान्य कर्ज रु. ४ लाखांपर्यंत**
**वैयक्तिक महत्तम कर्ज रु. १.२५ कोटीपर्यंत**
**एकत्रित महत्तम कर्ज रु. १.७५ कोटीपर्यंत**



आमची वैशिष्ट्ये
कमी व्याजदर । जलद कर्ज मंजूरी
सोपी व पारदर्शक प्रक्रिया । कमी कागदपत्रे
लवचिक परतफेड सुविधा । विश्वास, सुरक्षितता आणि उत्कृष्ट सेवा

| श्री. नील कुटीनो | श्री. नेपोलियन डिसोजा | श्री. आर्थर कुटीनो |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | जन. मॅनेजर |

आजच नजिकच्या शाखेत संपर्क साधा आणि तुमच्या स्वप्नांना आर्थिक बळ द्या !

## विविधतेत एकता

भारताची सर्वांत मोठी ताकद आणि गौरवशाली बाब म्हणजे त्याची विविधतेत एकता. विविध जाती-धर्मांचे लोक, असंख्य भाषा आणि शेकडो बोलीभाषा, नाना प्रकारचे पेहराव, भिन्न संस्कृती आणि विविध खाद्यपरंपरा ह्यांनी नटलेला भारत हा जगातील एक अद्वितीय देश आहे. इतकी विविधता असूनही एकमेकांविषयीचा आदर, प्रेम आणि सहअस्तित्वाची भावना येथे आजही जिवंत आहे.

वसईत विविध सण व उत्सवात ख्रिस्ती युवक-युवती उत्साहाने सहभागी होतात, नाताळच्या गोठ्याची उभारणी करण्यासाठी हिंदू बांधवही तितक्याच हौसेने हातभार लावतात. विविध धर्मांचे लोक एकमेकांच्या सण-उत्सवात सहभागी होऊन आनंद वाटून घेतात; संकटाच्या वेळी धर्म, जात किंवा पंथ न पाहता मदतीसाठी धावून जातात.

काही वर्षांपूर्वी वसईत एका निराधार हिंदू महिलेचे निधन झाले. तिचे कोणीही नातेवाईक नसताना एका ख्रिस्ती कुटुंबाने पुढाकार घेऊन तिच्यावर हिंदू धर्माच्या रीतिरिवाजांनुसार अंत्यसंस्कार केले. ही घटना मानवतेच्या भावनेचे जिवंत उदाहरण आहे. भारताचा गौरव केवळ ताजमहाल, अजिंठा-वेरूळ, कोणार्क किंवा इतर वारसा स्थळांमध्ये नाही, तर विविध संस्कृतींनी जपणाऱ्या व परधर्माचा आदर करणाऱ्या समाज जीवनालाही आहे. ह्या सुंदर परंपरेला काही स्वार्थी प्रवृत्तींकडून तडा देण्याचा प्रयत्न होताना दिसतो. स्वत:चे राजकीय किंवा वैयक्तिक हित साधण्यासाठी धर्माच्या नावावर द्वेष पसरवला जातो, समाजात अविश्वास निर्माण केला जातो, ही बाब मनाला वेदना देते.

- **बॅप्टिस्ट एम. वाझ,** दारसेंग, गोम्सआळी
मोबाईल : 99 70 65 07 57

## वसुधैव कुटुंबकम्

विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरा असूनही भारतात सर्वजण एकात्मतेने व बंधुभावाने राहतात. ही विविधतेतील एकता आपल्या देशाचे खरे बलस्थान आहे. भारताला हजारो वर्षांचा वैभवशाली इतिहास आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभला आहे. आज भारत विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, कृषी आणि क्रीडा आदी क्षेत्रांत झपाट्याने प्रगती करत आहे. 'चंद्रायान'सारख्या मोहिमांमुळे अंतराळ क्षेत्रात आणि आधुनिक डिजिटल क्रांतीमुळे जागतिक स्तरावर भारताचा डंका वाजत आहे. आपल्या देशाचा तिरंगा, राष्ट्रगीत आणि लोकशाहीचे रक्षण करणारे महान संविधान प्रत्येक भारतीयाचा अभिमान आहेत.

भारत हा केवळ भौगोलिक दृष्ट्या विशाल देश नाही, तर मानवता, सहिष्णुता आणि शांततेचा संदेश देणारे राष्ट्र आहे. येथे विविध सण-उत्सव आनंदाने आणि परस्पर सन्मानाने साजरे केले जातात. आपल्या सैनिकांचे शौर्य, शेतकऱ्यांचे परिश्रम, वैज्ञानिकांचे संशोधन, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि कामगारांचे कष्ट ह्यांमुळे देशाची प्रगती अधिक वेगाने होत आहे. 'वसुधैव कुटुंबकम्' ही भारतीय संस्कृतीची शिकवण संपूर्ण जगाला बंधुभावाचा संदेश देते. देशाच्या प्रगतीमध्ये तरुणांचे योगदान व नवसंशोधन अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे.

- **डॉ. सुभाष डिसोजा,** भुईगाव

## अनेक भूषणांनी नटलेला

आपल्या भारत देशात हिंदू, ख्रिस्ती, मुसलमान, पारशी, जैन, बौद्ध असे अनेक धर्मांचे लोक राहतात. सगळ्यांचे राहणीमान वेगवेगळे; परंतु सर्व माणसे गुण्यागोविंदाने राहतात. एकमेकांना सहकार्य करतात. वेळप्रसंगी धावून जातात. जणू भारत मातेची ही लेकरे! आपल्या सीमेवर आपले रक्षक आपले सैनिक देशासाठी एकत्र येऊन लढत असतात. वेळप्रसंगी त्यांना वीरमरणही येते. दवाखान्यात डॉक्टर्स कोणत्याही धर्माचा पेशंट असो, भेदभाव कधीच करत नाही. हसतमुख आपली कामगिरी पार पाडतात. आपला भारत देश आपुलकी, माणुसकी, संरक्षण अशा अनेक भूषणांनी नटलेला आहे.

- **वनितामेरी वॉल्टर डिमेलो,** वरभाट, मुळगाव
मोबाईल : 91 - 86 98 22 76 59

## भारताचा दीपस्तंभ : बार्क

दिनांक १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला व पंतप्रधान पंडित नेहरू ह्यांच्या अधिपत्याखाली मानवी जीवनमान व भारताची शान उंचावण्याचे प्रकल्प मार्गी लागले. त्यातील एक म्हणजे बार्क होय. बार्क म्हणजे भाभा परमाणू अनुसंधान केंद्र. त्याची स्थापना १९५४ मध्ये 'अप्सरा' ह्या नावाने झाली. पुढे डॉ. होमी भाभा ह्यांचे विज्ञान संशोधनातील मोलाचे योगदान पाहून त्यांच्या स्मृतीला अनुसरून १९६७ला 'भाभा परमाणू अनुसंधान केंद्र' (Bhaba Atomic Research Centre) असे नामकरण करण्यात आले.

बार्कमुळे आपल्या भारताची शान वाढली आहे. आज सगळे जग हे युद्ध आणि युद्धाच्या तोंडावर आहे. ह्याप्रसंगी आपल्या भारताची ताकद अजमावण्यासाठी तथा शांतीचे एक पाऊल पुढे




# अल्फान्सो टूर्स ॲण्ड कॅटरर्स

**१) ऑगस्ट महिन्यात वेलंकनी फेस्टिवल नोव्हेना :**
दिनांक २७ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०२६. संपूर्ण नोव्हेना ए.सी. पॅकेज रु. २९,०००/-. पाच दिवसांचा नोव्हेना ए.सी. पॅकेज रु. १८,०००/-मात्र. व्हेज-नॉनव्हेज बुफे व जेवणाच्या रंगत मेजवानीसह.

**२) संत ज्युड नोव्हेना : झाशी, ग्वालियर-आग्रा व दिल्ली सहल :** दिनांक २४ ऑक्टोबर ते ०१ नोव्हेंबर २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. २९,०००/- मात्र.

अ) फक्त झाशी व ग्वालियर सहल :दिनांक २४ ते २८ ऑक्टो. एकूण खर्च प्रत्येकी रु. २१,०००/- मात्र.

* सर्व प्रवास राजधानी व ए.सी. बसने असेल.
* सर्व सहलींची बुकींग आता दोन महिने आधी करावी लागेल.
* सहल क्रमांक २मधील प्रवास हा जाता-येता राजधानीमधला असेल. व्हेज नॉन व्हेज जेवण आणि खूप सारी मौज घेऊन आपण जात आहोत. आपली नावे लवकरात लवकर द्यावी.
* सर्व सहलींचे तपशीलवार कार्यक्रम तयार आहेत.

**संपर्क :-**

| | | |
|---|---|---|
| **नेल्सन अल्फान्सो, गास** | : | **9970650770** |
| **नीलम कोरिया, आगाशी-पापडी** | : | **9130541082** |
| **हेलन डिमेलो, रमेदी** | : | **7559125435** |
| **मॅलेट फर्नांडीस, सांडोर** | : | **9545329770** |

# FRIENDS TOURS & TRAVELS

**श्री. मार्शल कोरिया**
**9673995052 / 9172280450**

**१) मद्रास वेलंकनी मातेचा नोव्हेना :**

**अ)** दि. २७ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०२६ ची बुकींग चालू आहे. ट्रेन प्रवास **Ac/3 Tr Or 2 Tr/Ac** आणि विमान प्रवासाची मुंबई-चेन्नई-मुंबई व मुंबई-त्रिची-मुंबई तिकीटे आमच्याकडे काढून मिळतील.

**ब)** प्रवास **Ac/3 Tr** ने, हॉटेल सिंगेटमध्ये २,३ व ४ बेडमध्ये ४,६ व ८ च्या पद्धतीने राहण्याची व्यवस्था व जेवणासहीत फक्त एकूण खर्च रु. ३४,०००/- मात्र.

**२) निराश व असहाय्य लोकांचा आश्रयदाता संत ज्यूड (झांशी) नोव्हेना व साईट सीन :** दि. २४ ते २९ ऑक्टोबर २०२६. डिलक्स हॉटेल, एसी रूम, प्रवास, निवास, भोजन खर्च रु. २१,०००/-. (राजधानी एक्सप्रेस **3TAC**). रु. १९,०००/-. (पंजाब मेल **3TAC**).

**३) केरळ सहल :** दि. ६ ते १६ नोव्हेंबर २०२६. खर्च रु. ४४,०००/-. (दोन व्यक्ती एक रूम प्रमाणे). एर्नाकुलम, कोची, मुन्नार, टेकडी, कोट्टयम, त्रिवेंद्रम, कन्याकुमारी.

**४) रॉयल राजस्थान सहल :** दिनांक ५ ते १६ नोव्हेंबर २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. ४४,०००/-. (दोन व्यक्ती एक रूम प्रमाणे). माऊंट अबू, जयपूर, चित्तोडगड, बिकानेर, जोधपूर, जैसेलमेर, उदयपूर.

**५) दिल्ली, आग्रा, भरतपूर, जयपूर सहल :** दिनांक ५ ते १३ नोव्हें २०२६. एकूण खर्च रु.३४,०००/-.

* सहल क्र. २,३,४,५ ट्रेन प्रवास **3TAC** (विमान प्रवास पर्याय उपलब्ध.) हॉटेल कॅटेगरी, साईडसीन **२x२ AC Coach.** सर्व एंट्री फी, साईडसीन, भोजन खर्च समाविष्ट.

**विश्वासपात्र नाव - विश्वासपात्र सहली**

**-: अधिक माहितीसाठी संपर्क :-**

| | | |
|---|---|---|
| विकी घोन्सालवीस, मर्सेस | : | 9923213752 |
| पिटर परेरा, भुईगाव | : | 9423908663 |
| सुभाष नाईक, गास | : | 7559365923 |
| लॉसन कोरिया, आगाशी | : | 8698710284 |
| आल्बिनो घोन्सालवीस, राणेभाट | : | 9637504445 |

टाकण्याचे काम बार्क करीत आहे. इतर बलाढ्य देशाकडे सुरक्षितता असेल पण भारताकडे ती तसूभरही कमी नाही ह्याचा अंगुलीनिर्देश भारत करीत आहे. परक्या देशांनी केलेल्या अणुबॉम्ब चाचण्या ह्यासाठी आपले १८ मे १९७४ व मे १९९९ हे उत्तर आहे. तरी भारताला बार्कचा अभिमान असणे क्रमप्राप्त आहे.

**- जेम्स अँथनी लोपीस**, पोंडेवाडी, पाली

## ख्रिस्ती समाज

माझ्या दृष्टीने सर्वांत गौरवशाली बाब म्हणजे ख्रिस्ती समाजाचे अस्तित्व व संस्कृती. ख्रिस्ती समाज दोन टक्के असून सुशिक्षित, सुसंस्कृत, शांतिप्रिय, सेवाभावी, परोपकारी आणि सर्वांना प्रगतीच्या शिखरावर घेऊन जाणारा, सर्वांना एकत्र घेऊन चालणारा, संपूर्ण समाज सुशिक्षित करण्याचे ध्येय ठेवणारा, संपूर्ण समाजात शिस्त लावणारा व दयाक्षमेचे व प्रेमप्रीतीचे धडे देणारा समाज मानला जातो. 'जशास तसे' वा 'ठोशास ठोसा' अशा प्रवृत्तीची शिकवण देणारा हा समाज नव्हे. तुमच्या उजव्या गालावर कोणी मारले तर तुमचा डावा गालही पुढे करा, अशी शिकवण देणारा व पालन करणारा हा समाज आहे. आपल्या शेजाऱ्यांवर प्रीती करणारा समाज आहे.

भारताचा ख्रिस्ती समाज म्हणजे भूमीचे मीठ आहे. हा समाज म्हणजे जगाचा प्रकाश आहे. परंतु काही दंडकशाहीचे लोक विनाकारण हिंसा करीत आहेत, त्यांना समाज सुशिक्षित झालेला पाहवत नाही. तुम्ही 'दंडकशाहीखाली राहून आम्हाला मत द्या' म्हणजे आमचाच द्वेष मत्सर करण्याऐवजी सर्वांना 'ख्रिस्ती संस्कृती' शिकवा भारताला प्रेम व दयेचा सागर बनवा!

**- फा. फिलीप वाझ,** 'पसायदान', नाळा

## पोप दुसरे जॉन पॉल ह्यांची भारत भेट १९८६

फेब्रुवारी १९८६ पोप दुसरे जॉन पॉल ह्यांनी भारताची तीर्थयात्रा केली. ह्या दौऱ्यात त्यांनी मुंबई-वसई, मद्रास, केरळ, गोवा, प.बंगालसह विविध ठिकाणी भेटी दिल्या होत्या. पोप दुसरे जॉन पॉल ह्यांनी दिलेली भेट ही स्वतंत्र भारत देशाला एक ऐतिहासिक गौरवशाली भेट आहे. हा इतिहासातील एक अविस्मरणीय, अभूतपूर्व धार्मिक व राजनैतिक दौरा होता. म्हणून १ ते १० फेब्रुवारी १९८६ हा दहा दिवसांचा दौरा म्हणजे आपल्या भारत देशाची सर्वांत गौरवशाली बाब आहे. ९ फेब्रुवारी १९८६ रोजी वसई येथे सेंट अगस्टीन हायस्कूल, भाबोळा येथील प्रांगणात हॅलिकॉप्टरने त्यांचे आगमन झाले. तो क्षण आणि तो दिवस माझ्या मते गौरवशाली बाब!

**- अँथनी डाबरे,** गिरीज

मोबाईल : 98 22 89 31 78


## निसर्ग टूर्स आयोजित सहल

**आयोजक : ऑस्टीन : 9270080947 / 9422681516**
**विनय : 9225432233**

१) **वेलंकनी मातेचा नोव्हेना :** २७ ऑगस्ट ते १० सप्टें. २०२६. १० दिवसांसाठी वास्तव्य, ए.सी.रूम, नाश्ता, जेवण व ए.सी. रेल्वे तिकीटासहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. ३०,०००/-. प्रति व्यक्ती (एका रूममध्ये चार व्यक्ती) पाच दिवसांची बुकींग करू शकता. वास्तव्य : हॉटेल व्ही.पी.एन रेसिडेन्सीमध्ये असेल.

२) **पावसाळी सहल : भंडारदरा धरण व धबधबा :** दोन दिवसीय. दिनांक ७ व ८ ऑगस्ट २०२६. प्रवास २×२ ए.सी.बसने असेल. गेट टुगेदर पार्टीसहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. ६,०००/-.

३) **बरोडा : स्टॅच्यू ऑफ युनिटी, सुरत सहल :** दिनांक १४ ते १६ सप्टें. २०२६. ए.सी.रेल्वे प्रवास, वंदे भारत ए.सी.बस, थ्री स्टार हॉटेल, हॉटेल सयाजी इफ्फोटेल, बुफे जेवण, सुरत मार्केट व साईड सीनसहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. १३,५००/-मात्र. (दोन जणांस एक रूम). रु. १२,५००/- (प्रत्येकी तीन जणांस एक रूम). रु. ११,५००/- (प्रत्येकी चार जणांस एक रूम)

४) **दिवाळी रजेतील सहल : केरळ :** कोचीन, मुन्नार, टेकडी (पेरियार), अलॅप्पी, बॅक वॉटर, त्रिवेंद्रम, कन्याकुमारी सहल. दिनांक ७ ते १७ नोव्हें. २०२६. थ्री टायर ए.सी.रेल्वे प्रवास, हॉटेल, जेवण साईड सीन व गेट टुगेदर पार्टीसहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. ४१,०००/- मात्र.

* **आम्ही ग्रुप, स्कूल, सिनियर सिटीझन पिकनिक आयोजित करून देतो.**

## ट्रिनिटी टूर्स अँण्ड ट्रॅव्हल्स्

१) **निराश व असाध्य लोकांचा आश्रयदाता संत ज्युड (झांशी) नोव्हेना व साईट सीन :** दिनांक २४ ते २९ऑक्टो. २०२६. डिलक्स हॉटेल, ए.सी.रूम, प्रवास, निवास, भोजन, एकूण खर्च रु. २१,०००/- मात्र. राजधानी एक्सप्रेस, ३टायर ए.सी., पंजाब मेल ३ टायर ए.सी. एकूण खर्च रु. १९,०००/- मात्र.

१) **वेलकंणी मातेचा नोव्हेना :** दिनांक २७ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०२६. थोड्याच जागा शिल्लक.

३) **राजस्थान सहल :** दिनांक ५ ते १६ नोव्हें.२०२६. संपूर्ण ए.सी.प्रवास. जोधपूर, जैसलमेर, बिकानेर, जयपूर, चितोडगढ, उदयपूर, माऊंट अबू, एक दिवस ट्रेंटमध्ये वास्तव्य. एकूण खर्च प्रत्येकी रु. ४४,०००/-मात्र.

४) **दिल्ली-आग्रा-भरतपूर, जयपूर सहल :** दिनांक ५ ते १३ नोव्हें. २०२६. लोटस टेम्पल, जंतरमंतर, इंडियागेट, अक्षरधाम, राजघाट, ताजमहाल, आग्रा किल्ला, अभयारण्य, जयपूर पिंक सिटी, हवामेहल व शॉपिंग. एकूण खर्च प्रत्येकी रु. ३४,०००/-. संपूर्ण ए.सी.प्रवास.

५) **केरळ-कन्याकुमारी सहल :** दिनांक ६ ते १६ नोव्हें.२०२६. त्रिवेंद्रम, कन्याकुमारी, कोट्टायम, टेकडी, मुन्नार, कोचिन. संपूर्ण ए.सी.प्रवास. एकूण खर्च प्रत्येकी रु.४४,०००/-.

**संपर्क :** मोजेस : 9850429351 राजेश : 9881489610
एलायस : 9767250373 पॅट्रीक : 9226181212
मतेस : 9561707125



## मुंबई लोकल

लागला असेल बाबा एखादा धक्का,
म्हणून काय जीव घ्यायचा..

मारता आला असता एक दोन मुक्का,
माणसंच आपण सगळी, होत असतात चुका..

ती आई आक्रोशली, डोळेही गेले सुकून
बापाला धड रडता येईना, खांदाही गेला झुकून..

डब्यात चढायला धजणार नाही पाय
माणसं बघत राहिली,
राक्षसाने मारली २२ वर्षांची गाय..

जीव पार तुटतो हो बघताना हे सगळं,
काय जगणं राहिलं नरकाहून वेगळं..

**- विजय डायगो रॉड्रिग्ज**

## कप्पाच कप्पा त्या रस्त्याला!

गावरस्ता कप्प्याचा, राजरस्तासुद्धा कप्प्यांचा
हायवे पण कप्प्यांचाच, नववारी लुगड्यासारखा.

कप्प्याचा मार्ग कशासाठी?
अंगाची हाडे खिळखिळी करण्यासाठी;
ना आपली कंबर सेटींग करण्यासाठी!

भरीसभर, तर सर्वत्र गतिरोधक!
वाहनांना व प्रवाशांना हिसका देण्यास,
ना लुज हड्डी बसवण्यासाठी;
नाहीतर जागृत बांधकाम विभागले
त्यावर पांढरा रंग नाही का फासला असता?
प्रवाशांना जागृत करण्यासाठी!

दुचाकीने जा, कारने जा, बसने प्रवास करा;
कोलांट्या खातो आपण!
आणि वाहनांची गळाभेट करतो आपण?

मग आकाशातील तारे
दिवसाढवळ्या दर्शन देतात
पी.डब्ल्यू.डी.चा सत्कार करू आपण!
त्यांच्या ऑर्थोपेडिक शाखेबद्दल.
त्यातील रामबाण औषधी बोनसेटिंग
रस्त्यांबद्दल!



**- फा. अॅण्ड्र्यू रॉड्रिग्ज,**
सांडोर चर्च



## अवयव दान

जन्मताना रिक्त हातांनी आलो
जातानाही रिक्त हातांनी जाणार.
परि जाताना अवयव दान करूनी गेलो
तर गरजवंतांना नवजीवन देऊनी जाणार!

डोळे माझे कुणाच्या अंधाराला उजेड देतील
हृदय माझे कुणाच्या छातीत पुन्हा धडधडेल
प्रत्येक अवयव माझा नवजीवनाचे गीत गाईल
माझ्यातला मी कधीच संपणार नाही मरणाने
ज्यांच्या शिरात माझे जीवन
धावेल अवयव दानाने
त्यांच्या घराचा दिवा पेटेल माझ्या स्मरणाने!

अवयव दानाने आशेचे नवदीप उजळू या
मृत्यू शेवट नव्हे;
नवजीवनाचा प्रारंभ बनू या!

**- ज्यो परेरा,**ज्योती

## तू आणि मी

तू आणि मी इतिहासाच्या चक्रात,
अजूनही गुंतलो आहोत.

तू आणि मी भूगोलाच्या विश्वात,
पृथ्वीप्रमाणे फिरत आहोत.

तू आणि मी विज्ञानाच्या प्रगतीत,
पोरके झालो आहोत.

तू आणि मी अर्थशास्त्राच्या वेलीवर,
गटांगळ्या खात आहोत.

तुझी भूमितीची प्रमेय विखुरली आहेत.
माझी बीजगणिताची सुत्रे विस्कटली आहेत.

म्हणूनच,
तू आणि मी गणितामधील समांतर
येणेप्रमाणे आहोत.

म्हणूनच की काय?
कधीही न भेटण्यासाठी
जन्मास आलो आहोत...

**-फ्रँको संजाव डिसोजा,** माणिकपूर-चौक
मोबाईल : 93 22 48 05 03





## मनास वाटते कवी व्हावे

मनास वाटते कवी व्हावे
आणि कवितेच्या रंगात रंगून जावे
निसर्गाच्या नंदनवनात बसावे
देहभान हरपून काव्य करावे.

मनास वाटते फुलपाखरू व्हावे
फुलपाखरासारखे जीवन जगावे
वेगवेगळ्या फुलांच्या बागेत फिरावे
गंध फुलांचा घेत जावे.

मनास वाटते चांगला माणूस व्हावे
आणि माणुसकीवर काव्य करावे
माणसाने माणसाशी प्रेमाने जगावे
एक दिलाचा समाज घडवावे.

मनास वाटते कवी व्हावे
मृत्यूनंतरही शब्दांत जिवंत रहावे
माझ्या लेखणीने ह्या जगात
माणुसकीचे एक सुंदर गीत गावे.

**-रॉनल्ड गॅब्रिएल ग्रेशियस,** डोंगरी,भाईंदर
मोबाईल : 70 21 25 81 34

## कहर



पावसाने केला कहर
धो धो वर्षावाची लहर
परिसर झाला सागर
कसा चालेल नांगर !

वाहतुकीची झाली कोंडी
वाहून गेली भांडी-कुंडी
सुसाट वारा सुटला
जनसंपर्क तो तुटला !

जनजीवन झाले ठप्प
घरात बसले सर्व गप्प
ही नव्हे नैसर्गिक आपत्ती
ओढवून घेते मानवी कृती !

जातो निष्पापांचा बळी
असह्य आक्रोशाची हाळी
पुरे करू पृथ्वीचा उत्पात
थांबवू चराचराचा घात !

पावसाला दिले दूषण
तो तर आहे खरा भूषण

**- ब्रिजदिन गिल्डस लोपीस,** न्यू गिरीज
मोबाईल : 88 06 04 61 99



## खूप दूर आलो आपण...!

घरं एवढी मोठ्ठी झाली की
माणसं घरातल्या घरात हरवू लागली...!

'स्पेस'च्या नावाखाली
ह्या खोलीतले ना कळे त्या खोलीत...!
पोरं स्वतंत्र खोलीत फास घेऊ लागली...!

तेव्हा कसं...?
मस्तपैकी खेळायचं, हुंदडायचं
भावंडांसह ओसरीत दंगा करायचा
अभ्यासही करायचा मन लावून
छान मैफल रंगवत गप्पांची
कधी झोप लागायची कळायचंही नाही.

'स्पेस' काय, 'डिप्रेशन' काय
'टेन्शन' काय ऐकलंच नव्हतं कधी!

आता... जीवनशैलीच बदलली
जीवघेणी स्पर्धा अन् ताण सोसून
तरुणाई एकलकोंडी झाली
मी, मी आणि फक्त मी...
माणसांना माणसं नकोशी झाली!
खूप दूर आलो का आपण
माणूसपणापासून...?

- **उज्ज्वला लेमॉस,** नेवर्ले, सांडोर
मोबाईल : 83 90 26 90 15





## तू याजक युगायुगाचा

तारुण्याच्या उंबरठ्यावर असताना
घेतला तू निर्णय अनोखा
हात घातलास नांगराला
प्रभूच्या मळ्यात कार्यसिद्धीचा.

नोकरी, ऐहिक सुख, मोहमाया
खुणावीत असताना
स्वीकारीला मार्ग अरुंद वाटेचा
वचनबद्ध झालास प्रभूच्या प्रेमात
अविरत सुवार्ता घोषविण्या.

अंधारात मार्ग दाखविणारा
तू एक दीपस्तंभ
शिक्षणाच्या कक्षा रुंदावीत
दुर्बलांना सबल करणारा
तू एक निष्ठावान शिक्षक.

समाजामध्ये बीज प्रीतीचे पेरून
दीनांना जवळ करणारा
तू एक ध्येयवेडा संन्यासी.

दु:खितांचे अश्रू पुसणारा तू
तुझे अश्रू मात्र कोंडून ठेवतोस
चार भिंतीमध्ये.

तुलाही बोचतो
मनाचा एकाकीपणा
परी प्रभू सदा तुझ्या सोबतीला.

- **जेन ग्रेगरी मच्याडो,** करीजभाट, पाली
मोबाईल : 99 23 71 41 54

## सोबत

डोंगर कोसळले, सागर खवळले
पैसे बुडाले, सारे सोबती पळाले
मान-सन्मान हिरावले, अन्न-वस्त्र-घर हरपले
तरी मी परमेश्वराचाच गौरव गाईन ।।धृ।।

प्रभू दया, क्षमा विसरेल?
प्रभू कुणाला एकटा सोडेल?
आई पोटच्या पोराला नाकारेल?
परमेश्वर कुणाला वाऱ्यावर सोडेल? ।।१।।

तुम्ही त्याला पाठ दाखवाल
पण तो तुम्हाला पाठीशी घालील
तुम्ही त्याच्यापासून पळून जाल
तरी तो तुमच्या मागे धावत येईल ।।२।।

दमलात तर जा तुम्ही त्याच्याकडे
तो तुम्हाला गरुडाच्या पंखांवर बसवेल
तुम्ही धावाल पण थकणार नाहीत
कारण प्रभू आपले सामर्थ्य आहे ।।३।।

तांबड्या समुद्रातून तो आरपार नेतो
नोहाच्या तारवात सुखरूप ठेवतो
खवळलेल्या समुद्रात,
वादळ-वाऱ्यात किनारा गाठतो
कारण प्रभू आपल्या सोबत असतो ।।४।।

- **फा. जोएल डिकुना**
(धर्मगुरूंची वार्षिक रिट्रीट, आत्मशोध दर्शन केंद्र, सांडोर - ०७/०७/२०२६)



# माझे मत

## प्रत्येक निरोपातून एका वृक्षाचा जन्म

आज वसई धर्मप्रांतात सुमारे १.२लाख कॅथलिक बांधव विविध गावात वास्तव्यास आहेत. संख्येने आपण कमी असलो, तरी शिक्षण, संस्कृती, समाजसेवा, श्रद्धा आणि पर्यावरण संवर्धनात आपल्या समाजाचे योगदान नेहमीच मोठे राहिले आहे. दरवर्षी आपल्या वसईतील अनेक कुटुंबे आपल्या अत्यंत जवळच्या व्यक्तीला गमावतात - आई, वडील, आजी, आजोबा, पती, पत्नी, मूल, भाऊ, बहीण किंवा घराचा एकमेव आधार असलेली व्यक्ती. अंत्यसंस्काराच्या दिवशी घर लोकांनी भरून जाते. सांत्वन केले जाते. प्रार्थना केल्या जातात. काही दिवसांनी आयुष्य पुन्हा सुरू होते... पण दु:ख कधीच संपत नाही... आणि ह्याच क्षणी माझ्या मनात एक विचार आला, जर प्रत्येक व्यक्तीच्या अंत्यसंस्काराच्या दिवशी त्या कुटुंबाला श्रद्धांजली म्हणून एक रोप भेट दिले गेले तर? आपल्या चर्चमधील विविध संघटना (युवा संघटना, महिला मंडळ, ज्येष्ठ नागरिक संघटना किंवा इतर कोणतीही सेवाभावी संस्था) जर शोकाकुल कुटुंबाला फक्त सांत्वनच नाही, तर प्रेमाने एक फळझाड किंवा फुलझाडाचे रोप भेट दिले तर? अंत्यसंस्कारानंतर ते कुटुंब ते रोप आपल्या घराजवळ लावील आणि त्या दिवसापासून ते त्या रोपाची काळजी अगदी त्याच प्रेमाने घेईल, ज्या प्रेमाने त्यांनी आपल्या प्रिय व्यक्तीची घेतली होती. ते झाड त्या व्यक्तीची जिवंत आठवण बनेल. नातवंडे म्हणतील, ''हे आजोबांचे झाड आहे.'' त्या झाडाखाली बसून पुढच्या पिढ्या त्या व्यक्तीच्या आठवणी ऐकतील. भिंतीवरच्या एका फोटोपुरती आठवण मर्यादित राहणार नाही, ती रोज जगली जाईल. कुटुंब त्या झाडाला आपल्या प्रिय व्यक्तीचे नावही देऊ शकेल. जर शक्य असेल तर स्मशानभूमीत किंवा चर्चच्या स्मृतिस्थळीही अशी वृक्षलागवड करता आली तर?

आज जिथे फक्त समाधी दिसतात, तिथे काही दशकानंतर फुलांनी, फळांनी, पक्ष्यांनी आणि हिरवाईने भरलेली सुंदर बाग दिसेल. कदाचित हीच हरित वसई ह्या स्वप्नाला पुढे नेण्याची आणखी एक सुंदर वाट ठरेल.

काही वर्षांनी आपल्या गावागावांत हजारो झाडे उभी असतील. प्रत्येक झाड एक कथा सांगेल. प्रत्येक फांदी एक आठवण जपेल. प्रत्येक फळ हे सांगेल की मृत्यूनंतरही जीवन देत राहता येते. हा फक्त पर्यावरणाचा विषय नाही. ही दु:खातून सावरण्याची प्रक्रिया आहे. ही निसर्गाच्या माध्यमातून भावनिक उपचाराची वाट आहे. ही श्रद्धा, संस्कृती आणि निसर्ग ह्यांची सुंदर सांगड आहे. आपला समाज पिढ्यान्‌पिढ्या नाती जपणारा समाज आहे. आपण आपली घरे, भाषा, परंपरा, गाणी, श्रद्धा व संस्कृती जपतो. कदाचित आपण आठवणीही झाडांच्या रूपाने जपू शकतो. पण प्रत्येक मोठी चळवळ ही एका छोट्याशा विचारातूनच सुरू होते. वसईतील प्रत्येक कॅथलिक कुटुंबाने आपल्या प्रत्येक प्रिय व्यक्तीच्या स्मरणार्थ एक झाड लावलं तर काही वर्षात आपण हिरवीगार वसई निर्माण करू शकू.

**- आर्किटेक्ट मेलिसा परेरा,** सांडोर

## वसई-विरार तीन दिवस अंधारात...

मुसळधार पाऊस ही नैसर्गिक आपत्ती असली तरी सलग तीन दिवस वीज नसणे ही नागरिकांसाठी अत्यंत गंभीर बाब आहे. वीज गेल्यामुळे पाणीपुरवठा बंद, लिफ्ट बंद, मोबाईल चार्ज नाही, इंटरनेट बंद, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी रुग्णांचे मोठे हाल झाले. आपत्तीच्या काळात तात्पुरती अडचण समजू शकतो, पण भविष्यात अशी परिस्थिती टाळण्यासाठी वीज वितरण यंत्रणा अधिक सक्षम करणे, आवश्यक सुधारणा करणे आणि नागरिकांना वेळेवर व स्पष्ट माहिती देणे गरजेचे आहे. वसई-विरारकरांना सुरक्षित, विश्वासार्ह व अखंड वीजपुरवठा हा हक्क आहे. आता तरी ह्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना व्हाव्यात हीच अपेक्षा!

**- फ्रँक डिमोन्टी,** गास

## विद्यार्थ्यांकडून अपेक्षा

विद्यार्थी मित्रांनो, आपणा प्रत्येकाला प्रेरणेची, ध्येयाची व प्रकाशाची पंखे लाभली आहेत. म्हणून आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या गतिमान युगात करिअर करण्यासाठी आत्मपरीक्षणाने अभ्यास करून, स्वत:ला आणि देशाला पुढे नेले पाहिजे. ही तुमच्याकडून मोठी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा करताना आपल्या पुरोगामी विवेकी विचार, सत्य-न्याय, सामाजिक समता, धर्मनिरपेक्षता, सर्वधर्म स्नेहभाव, संविधान, भारतीय घटना बचाव आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याची मशाल हाती घेऊन बाहेर पडावे लागेल. हे तुमच्या जागृत पिढीसमोर मोठे आव्हान आहे आणि ते तुम्ही पेलाल अशी अपेक्षा आहे. स्वातंत्र्य ही भीक नाही, ती शूरांच्या रक्ताने मिळविलेले संपत्ती आहे. ती जपणं ही केवळ सरकारची नाही, तर प्रत्येक भारतीयांची जबाबदारी आहे.

स्वातंत्र्य दिन म्हणजे भारतीय जवानांना अभिवादन करण्याचा हा दिवस आहे. मित्रांनो, सैनिक सीमेवर लढतो. पण आपण शहरांत, गावांत, रस्त्यांवर काय करतो? ह्याचे चिंतन झाले पाहिजे. देशभक्ती म्हणजे केवळ झेंडा फडकावणे किंवा घोषणा देणे आहे काय?

आज भारताचा ७९वा स्वातंत्र्यदिन साजरा करताना आपले पारशी बंधू आपले नूतन वर्ष, म्हणजे 'पतेती' साजरा करीत आहेत. त्यांना शुभेच्छा देऊन आंतरिक स्वातंत्र्याचा आणि शांतीचा आनंद व्यक्त करू या. 'सत्यमेव जयते!'

**- आलेक्स पिटर डाबरे**

मोबाईल : 86 98 96 96 51

## रेन हार्व्हेस्टिंग - एक वरदान

अनेक वर्षांपूर्वी हरित वसई संरक्षण समितीने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन बहुतेक वसईकरांनी रेन हार्व्हेस्टिंग केले आहे. ह्यात छतावरील पाणी 'पोंदळ' (पन्हाळी) द्वारे विहिरीत सोडले जाते. ह्या ठिकाणी एका 'पन्हाळीला' मी एक छिद्र पाडून त्याला पी.व्ही.सी. पाईप जोडून ते पिण्याच्या पाण्याच्या टाकीत सोडले आहे. टाकीचे आऊटलेट विहिरीत सोडले आहे.

जेव्हा पवसाळा सुरू होतो तेव्हा सुरुवातीचे माती मिश्रित पाणी बाहेर सोडायचे व त्यानंतर स्वच्छ, शुद्ध पाणी पाण्याच्या टाकीत सोडायचे. गेली ३२ वर्षे ह्याद्वारे संपूर्ण पावसाळ्यात आम्हाला फार क्वचित वेळा मोटार लावावी लागते. विशेषत: जेव्हा विद्युत पुरवठा खंडित होतो तेव्हा आमच्या घरात मुबलक पाणी असते. शिवाय टाकी भरली की पाणी ओव्हर फ्लो होऊन विहिरीत पडते. आपणसुद्धा हा प्रयोग करून बघा.

**- थॉमस अे. परेरा,** गास

मोबाईल : 99 75 10 22 21


**+ Praise the Lord +**

**आयोजक :** १) ग्लोरिया (बेबी) डिकोस्टा : ९९६०२७३३१३
२) ग्रेगरी डिकोस्टा : ९०९६३६०८३४
३) शालिनी निग्रेल : ९९२३२५९५२८

**२०२६मधील सहलीच्या कार्यक्रमाचे आयोजन**

**१. दिवाळीच्या रजेतील केरळ-पोट्टा रिट्रीट व सहल :** दिनांक ०५ ते १६ नोव्हें. २०२६ (१२ दिवस). ६ दिवस रिट्रीट व अडीच दिवस केरळ साईडसीन. ३ए.सी. गाडीचे तिकीट, रिट्रीट रजिस्ट्रेशन व रूम, कुर्ला टर्मिनलला जाण्या-येण्यासाठी बसची सोय. एकूण खर्च प्रत्येकी १०,९००/-मात्र. स्लीपर तिकीट हवे असल्यास खर्च प्रत्येकी रू. ८,७००/-मात्र.

**२. निराश व असहाय्य लोकांचा आश्रयदाता संत ज्युड (झांशी) :** साईड सीन, झांशी व ग्वालियर. चार जणांस एक रूम. ए. सी. रूम, ए.सी.गाडी. खर्च रु. १९,५००/- मात्र. दिनांक २४ ऑक्टो. ते २९ ऑक्टो. २०२६ (६दिवस). मुंबई ते झांशी व झांशी ते मुंबई परतीचा प्रवास राजधानी.

**३. रॉयल राजस्थान - जयपूर, जैसलमेर, जोधपूर, उदयपूर, माऊंट अबू सहल :** दिनांक ०४ ते १५ नोव्हें. २०२६. एकूण १२ दिवस. ए.सी.ट्रेन, ए.सी.रूम, ए.सी. बस व जेवण, स्थळदर्शन एकूण खर्च रु. ४५,०००/- मात्र.

**४) कास पठार सातारा सहल :** दि. १४,१५,१६सप्टें. २०२६. ए.सी.बस, गेट टुगेदर पार्टी. एकूण खर्च रु. १०,०००/- चार जणांस एक रूम. रु १२,५००/-दोन जणांसाठी एक रूम.

* नावे नोंदवण्याची शेवटची तारीख २० ऑगस्ट २०२६. ॲड. रु. ५०००/-भरून आपली नावे लवकरात लवकर द्यावीत.


**छापता - छापता**

## आस्था - आपुलकी - बांधिलकी

शिक्षण व्यवस्थेतील गैरप्रकारांविरोधात जंतर-मंतर, दिल्ली येथे महिन्याभरापासून सुरू झालेले कॉकरोज जनता पार्टी ह्यांचे आंदोलन आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक ह्यांनी केलेले उपोषण ह्या संदर्भात न्याय मागण्यासाठी संपूर्ण देशातून, निरनिराळ्या प्रांतांतून आलेले असंख्य युवक-युवती व लोक संसदेच्या मुख्य द्वारावर येऊन थडकले.



दिनांक २० जुलै रोजी जेन झी क्रांतीची मशाल राजधानी दिल्लीत पेटली. तरुणाईचे हे आंदोलन चिरडण्यासाठी सत्ताधारी पक्षाने अनेक अडथळे उभे केले. मेट्रो स्टेशन्स बंद केली. इंटरनेट सेवा थांबवली. पोलिसांनी अमानुषपणे आंदोलकांवर लाठीमार केला. निमलष्करी दलालाच्या सैनिकांनी अश्रुधुरांच्या नळकांड्या फोडल्या. तरुणांची डोकी फुटली, विद्यार्थिनींचे कपडे फाटले. शेकडो तरुण-तरुणी जखमी झाले. मात्र रक्तबंबाळ अवस्थेतही मोर्चा पुढे गेला. ह्या दडपशाहीला न घाबरता आंदोलक तरुणांनी संसदेच्या प्रवेशद्वारावर धडक दिली. तरुणांच्या मुखांतून 'मोदी सरकार हाय हाय'.

'धमेंद्र प्रधान इस्तिफा दो' आदी घोषणांनी आसमंत निनादले. आंदोलक संसदेत घुसतील ह्या भीतीने संसदेचे मुख्य प्रवेशद्वार साखळदंडाने बंद करण्यात आले.

राजधानी दिल्ली नगरीने आजवर शेकडो धरणे-मोर्चे-निदर्शने-आंदोलने पाहिली आहेत. मात्र 'नीट' पारदर्शक परीक्षा पद्धतीच्या मागणीसाठी अहिंसात्मकरीत्या आक्रोश करणाऱ्या जेन झी किशोरवयीन युवक-युवतींना अमानुष वागणूक देणाऱ्या प्रवृत्तींमुळे 'सुवार्ता' परिवार दु:ख व्यक्त करीत आहे.

आंदोलन करणे हा राज्यघटनेने दिलेला अधिकार कोणत्याही सरकारला डावलता येणार नाही. अधिकार डावलणे म्हणजे मूलभूत हक्क पायदळी तुडवणे.

●

## Sophia BEAUTY PARLOUR

"HIGHLIGHT YOUR NATURAL BEAUTY"

SOPHIA ANDRADES

9823301327
7744000333
9049000555

◈ अपॉइन्टमेन्ट स्विकारल्या जातील ◈

## युनिक पेस्ट कंट्रोल

**प्रो. : थॉमस वर्गिस**
माळुंगी, मुळगाव, वसई.
**7770026783,**
**9320032074**



१) २६ वर्षे कार्यरत असलेली.
२) सेवाभावी संस्था, हॉस्पिटल्स, कार्यालये, हाऊसिंग सोसायटी, हॉटेल्स, बंगलोज, फॅक्टरी यांसारखे संतुष्ट ग्राहक.
३) नवीन बांधकाम, नूतनीकरण व राहत्या घरासाठी वाळवी प्रतिबंधक योजना.
४) झुरळ, मुंग्या, कोळी, रांगणारे किटक, उंदीर, पाली ह्यांच्यासाठी जनरल प्रतिबंधक योजना.
५) नॉन टॉक्सीन केमिकल हर्बल व जेलमध्ये सर्विस उपलब्ध.

**-: संपर्क :-**

**9323232074, 7768000260**

**ऑफिस :** डिकुनावाडी, मुळगाव, वसई.

## जागा हवी आहे

वसईमध्ये घर बांधण्यासाठी
२-३ गुंठे जागा पाहिजे
(रोड टच)
पॉल्टींगमध्ये नको.

**: संपर्क :**

**9890156206**

* रोज Rs.99 फक्त 15 वर्षे बचत करा आणि Rs. 9 करोडची Property बनवा.
* बचत करा रोज Rs.333 व Rs.1,40,000 दरवर्षी आयुष्यभर, टॅक्स फ्री घ्या. सोबत Rs. 40 लाखांची **Maturity** पण मिळवा. तसेच Rs. 80 लाख **Family** साठी देखील.

*ही Offer मर्यादित कालावधीसाठीच उपलब्ध.

* Contact For Mediclaim Policy, Cancer Cover Plan, Pension, SIP & SWP.

**Jayesh Chaudhari**
**9422483785**

**प्रेस द लॉर्ड**

## दिवाळी सुट्टीतील पोट्टा रिट्रीट व केरळ दर्शन

''तुम्ही मला शरण याल व पूर्ण जिवेभावे माझ्या शोधात लागाल तेव्हा मी तुम्हास पावेन''
(यिर्मया २९:१३)

**दिनांक ५ ते १५ नोव्हें. २०२६**
**आयोजक : सेबेस्टीन रॉड्रिक्स, बोळींज**
**Mob. : 9850679088**
**रेल्वे तिकीट बुकींगसाठी आपली नावे ३१ ऑगस्टपर्यंत स्वीकारली जातील.**

"PRAISE THE LORD"

## २०२६ दिवाळीच्या सुट्टीतील केरळ पोट्टा रिट्रीट

तू विश्वास ठेवशील तर देवाचे गौरव पाहशील - योहान : ११.४०

**कार्यक्रम : ४ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर २०२६ (१३ दिवस)**



सर्व वयोगटांसाठी प्रत्येकी रुपये ८६००/- स्लिपर
सर्व वयोगटांसाठी प्रत्येकी रुपये १२१००/- सेकंड एसी
सर्व वयोगटांसाठी प्रत्येकी रुपये १०९००/- थर्ड एसी



**संपूर्ण प्रवास कोकण रेल्वेने असेल.**
**जाताना-येताना दोन्ही प्रवास सुरवातीच्या स्टेशनपासून असतील**

स्थळ दर्शन : मुनार चहाचे मळे, स्पाईस गार्डन व धबधबा, चहाची फॅक्टरी, जेरुसलेम, होली लॅन्ड, सेंट थॉमस चर्च व डिजिटल शो संत सिस्टर अल्फोन्सा, कोरेटी चर्च (रोझरी व्हिलेज) सेंट जॉर्जचे ४० करोडचे चर्च, वेल्हार पदम चर्च, शॉपींग ब्रॉड वे मार्केट एर्नाकुलम येथे असेल. २ तास बोटींग

येताना जाताना ट्रेन प्रवासातील जेवण स्वखर्चाने असेल.
फक्त ट्रेनमधील परतीच्या प्रवासातील दुपारचे जेवण आयोजक देतील.

माणिकपूर पार्वती क्रॉस (गुजराती शाळा) ते कुर्ला टर्मिनस प्रवास बसने असेल.
परतीचा प्रवास एर्नाकुलम जंक्शन ते वसई रोड असेल.
ॲडव्हान्स रु. ३०००/- स्लिपरसाठी भरुन आपली नावे नोंदवा,
ॲडव्हान्स रु. ६०००/- एसी साठी भरुन आपली नावे नोंदवा,

**रेल्वे बुकींग ६० दिवस (२ महिने) अगोदर असल्यामुळे**

**नावे नोंदवण्याची शेवटची तारीख : ३१ ऑगस्ट २०२६ असेल**

आयोजक : ज्युलियाना ग्रेशस : ९१५८५६७५११ / ९९२२४६४४६७
७०३०२१६५६३
संपर्क : झेविअर परेरा (सांडोर बामणभाट) - ९६३७१४२०४७
लुसी डिमेलो (आगाशी कुंभारवाडा) - ८६९८७०९४२९
ममता व सुनिल वरठा (तलासरी) ८१४००७२८७८ / ९७२३३६६२४६

इजाग्रेस, दुसरा मजला, माणिकपूर, कुंभारवाडा, जॉना व्हिलाच्या मागे, चर्च रोड, वसई रोड (पश्चिम), जि. पालघर - ४०१ २०२.

## INFANT TOURS & TRAVELS

1) **Jaipur, Jodhpur, Jaisalmer,** Sand Dunes, Stay in Super Deluxe Tenst in the desert fully furnished
Date : 08th Nov. to 16th Nov. 2026.
Cost : Rs. 31,000/- Twin Sharing.
Rs. 29,000/- Triple Sharing.

2) **(Kerala) Cochin Alleppey, Munnar, Trivandrum, Kovalam**
Date : 13th Nov. to 22nd Nov. 2026.
Cost : Rs. 33,000/- Twin Sharing.
Rs. 31,000/- Triple Sharing.

3) **Hyderabad Ramoji Film City**
Date : 16th Nov. to 20th Nov. 2026.
Cost : Rs. 16,500/- Twin Sharing.
Rs. 14,500/- Triple Sharing.

* Train Journey by 3Tier A.C., Stay in Star category hotels. Breakfast, Lunch, Dinner (Veg. And Non-Veg.). Sightseeing by A/C Buses.

* **For Booking & Details Contact :-**

1) Johnson Miranda : 7387483220
2) Vijay D'Souza : 8796848900
3) Branklyn Rodrigues : 8976442743
4) Sunny Gadekar : 9892074548
5) Rohin Damania : 9987190500

# भक्तिमय जीवनाचा मार्ग - एक अमूल्य संचित

संत फ्रान्सिस डि सेल्स ह्यांनी लिहिलेल्या 'Introduction to the Devout Life' ह्या पुस्तकाचे अँथनी (किशोर) साळवे ह्यांनी केलेले मराठी भाषांतर 'भक्तिमय जीवनाचा मार्ग' हे ख्रिस्तसभेतील आणि मराठी सारस्वतातील एक अमूल्य संचित आहे. 'साधुसंत येति घरा तोचि दिवाळी दसरा' ह्या उक्तीनुसार आज ह्या पुस्तकाच्या भाषांतराने संत फ्रान्सिस डि सेल्स ह्यांचे विचारधन मराठी ख्रिस्ती वाचकांपर्यंत पोहोचत आहे.

ह्या पुस्तकात संत डि सेल्स ह्यांनी प्रत्येक प्रार्थनेच्या वेळी एक छोटासा पुष्पगुच्छ तयार करण्याची सूचना भाविकांना केलेली आहे, ''आपण जेव्हा एखाद्या बागेत फेरफटका मारतो तेव्हा त्या बागेतील काही फुले वेचून ती हुंगत हुंगत बागेबाहेर येत असतो. त्याप्रमाणे प्रार्थना संपली की लगेच त्या वातावरणातून बाहेर पडून थोडा वेळ शांत राहून त्या प्रार्थनेच्या वेळी आपल्याला मिळालेल्या मौलिक विचारांची फुले हृदयाच्या परडीत भरून त्याचा पुष्पगुच्छ सोबत ठेवावा आणि दिवसभरात अधूनमधून ती फुले हुंगत राहावे.'' हे पुस्तक नजरेखालून घालत असताना वेचलेली काही सौंदर्यस्थळे आजही आपापला सुगंध दरवळत आहेत.

### मूळ पुस्तकाचे सौंदर्य

संत फ्रान्सिस डि सेल्स हे घरंदाज कुटुंबातून आलेले उच्च विद्याविभूषित होते. त्याचा पगडा त्यांच्या लेखनावर दिसून येतो. ''ज्या कोणाला, भक्तिमय जीवन जगायचे आहे आणि जे परमेश्वराच्या प्रेमाचा शोध घेत आहेत त्यांना योग्य मार्ग मिळावा म्हणून मी ह्या पुस्तकाची मांडणी एकूण पाच भागांत केलेली आहे'' असे स्वतः संत फ्रान्सिस आपल्या प्रस्तावनेत म्हणतात व भक्तीच्या प्रांतात प्रवेश केल्यापासून आपल्या जीवनात कोणकोणत्या गोष्टींची काळजी घ्यायची असते त्याचे त्यांनी




मुद्देसूद वर्णन केलेले आहे. ''ज्याचे देवावर प्रेम आहे अशा व्यक्तीसाठी ते 'फिलोथिया' असे नाव वापरतात. एखादी मधमाशी फुलाला कोणताही धक्का न पोहोचविता त्यातील मकरंद अलगदपणे वेचते व साठवून ठेवते तसे आपल्या एकंदर जीवनाला कुठलीही हानी न पोहोचविता आपण त्यातील भक्तीचा रस प्राशन करीत आपल्या जीवनाचे माधुर्य वाढवीत राहिले पाहिजे'', अशी अनेक रूपके आणि प्रतिमा संत फ्रान्सिस ह्या पुस्तकात वापरतात.

आई आणि मुलांमधील नाते जसे गहिरे असते तसे भक्त आणि परमेश्वर ह्यांच्यातील परस्पर प्रेम गहन आणि बोलके असते, असे त्यांचे मत आहे. सदर पुस्तक केवळ वाचून नव्हे तर त्यातील मधुरस चाखत-चाखत आस्वाद घ्यायला हवा.

पुस्तकात देण्यात आलेले सराव आणि ध्यान-साधना आपल्या भक्तिमय जीवनाच्या भाग बनायला हव्यात. ह्या पुस्तकाद्वारे शुद्ध व सुरक्षित मैत्री आणि चंचल व धोकादायक जवळीकता ह्यांच्यात कोणता फरक आहे, आपल्या जीवनाचे खरे ध्येय काय आहे आणि ते कसे साध्य करायचे ह्या प्रश्नांची उत्तरे आपल्याला मिळत जातील आणि भक्तिमय जीवनाचे सौंदर्य आपल्याही दैनंदिन जीवनात दिसून आल्याशिवाय राहणार नाही.

### थोरा-मोठ्यांची शिफारस

ह्या पुस्तकाची नोंद खुद्द पोप महोदयांनी घेतलेली आहे. पोप अकरावे पायस हे १९२२साली संत फ्रान्सिस डि सेल्स ह्यांच्या मृत्यूच्या तिसऱ्या शताब्दीनिमित्ते आपल्या परिपत्रकात म्हणतात, ''एकेकाळी 'Introduction to the Devout Life' हे पुस्तक सर्वांच्या हाती होते. तसेच ते आताही सर्वांनी वाचावे अशी आमची इच्छा आहे. अशाप्रकारे ख्रिस्ती भक्ती सर्वत्र फुलेल आणि देवाची ख्रिस्तसभा आपल्या लेकरांच्या पावित्र्यामध्ये झालेली वाढ पाहून आनंदित होईल.'' तसेच पोप दुसरे जॉन पॉल म्हणतात, ''संत फ्रान्सिस डि सेल्स ह्यांनी प्रेमावर आधारित कठोर पण तरीही शांत अशी आध्यात्मिकता शिकविली... मी धर्मगुरूंना आणि श्रद्धावंतांना त्यांच्या उदाहरणातून व लेखनातून शिकण्याचे आमंत्रण देतो.''

### भाषांतरातील सौंदर्य

संत फ्रान्सिस ह्यांनी हे पुस्तक पहिल्यांदा १६०८मध्ये प्रसिद्ध केले. १९९० साली त्याचे भाषांतर भारतातील MSFS धर्मसंस्थेतर्फे प्रसिद्ध करण्यात आले. त्यानंतर २०१२ पर्यंत त्याच्या एकूण पाच आवृत्त्या निघाल्या. ह्या पुस्तकाचे मराठी भाषेत अनुवाद का होऊ नये, असा उदात्त विचार सांप्रत प्रांताधिकारी रेव्ह. फा. जॉन्सन गोन्साल्विस ह्यांच्या मनी आला. अँथनी साळवे ह्यांनी पुस्तकाच्या भाषांतराचे शिवधनुष्य हाती घेतले आणि ते लीलया पेलून दाखविलेले आहे.

सदर पुस्तकाचे इंग्रजीतून मराठी भाषेत भाषांतर पाचव्या आवृत्तीवर आधारलेले आहे. त्यामुळे ते सुबोध आणि वाचनीय तर झालेले आहेच; परंतु त्यातून संत फ्रान्सिस ह्यांची विचारधारा सोप्या भाषेत मराठी वाचकांसमोर सादर करण्यात साळवे बऱ्यापैकी यशस्वी झालेले आहेत.

स्वतः साळवे ह्यांनी ह्या पुस्तकातील सौंदर्याचा स्वतः आस्वाद घेतलेला आहे. एकीकडे मूळ मजकुराशी विश्वासू राहून त्यांनी मराठमोळ्या भाषेत संत फ्रान्सिसची अवघी आध्यात्मिकता नेमक्या शब्दांत शब्दबद्ध केलेली आहे.

'भक्तिमय जीवनाचा मार्ग' ह्या पुस्तकाचे प्रत्येक पान भक्तिरसाने ओथंबलेले आहे; त्यात ज्ञानमार्ग व कर्ममार्ग ह्यांचाही अनोखा संगम दिसून येतो. त्यामुळे भक्तीच्या प्रांगणातून ज्ञानाच्या अंगणात आणि तेथून पुढे भक्त हा कर्माच्या शिखरावर जाऊन पोहोचू शकतो.

**- फा.(डॉ.) रॉबर्ट बी. डिसोजा**

**'भक्तिमय जीवनाचा मार्ग'**
अनुवाद : अँथनी (किशोर) साळवे
पृष्ठ : ३१४; मूल्य २५०/-रुपये

- झेविअर डिमेलो

## पोप लिओ लॅम्पेडुसमध्ये



**व्हॅटिकन :** पोप लिओ ह्यांनी ६ जुलैला लॅम्पेडुसला भेट दिली. आफ्रिका खंडातून चोरीच्या मार्गाने युरोपकडे येत असताना समुद्रात बुडालेल्या निर्वासितांची येथे स्मशानभूमी आहे. मुस्लिम व ख्रिस्ती, प्रौढ व मुले ह्यांची थडगी ह्या विश्रामभूमीत विसावली आहेत. ते स्वातंत्र्याच्या शोधात असताना मृत्यूमुळे एकत्र आले आहेत. पोपनी पुष्पहार अर्पण करून त्यांना श्रद्धांजली वाहिली. त्यांनी निर्वासितांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

## ख्रिस्ताद्वारे मुक्तीची स्मृती जागवण्यासाठी

**व्हॅटिकन :** ख्रिस्ताने रक्त सांडून आणि वधस्तंभावर प्राण देऊन मानवाला पापाच्या गुलामगिरीतून सोडवले, ह्या घटनेला



२०३३ साली २००० वर्षे पूर्ण होत आहेत. ही ऐतिहासिक घटना साजरी करण्यासाठी ख्रिस्ती धर्मातील सर्व पंथांनी एकत्र यावे, असे आवाहन पोप लिओ ह्यांनी केले. आपापसातील मतभेद बाजूला ठेवून एका समान ध्येयासाठी एकत्र येण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. इकुमेनिकल पॅट्रिआर्केटचे प्रतिनिधी मंडळ पोपना भेटण्यासाठी व्हॅटिकनमध्ये आले असता पोपनी हे आवाहन केले.

## स्थलांतरितांना दोष देऊ नका - चर्च

**केप टाऊन :** दक्षिण आफ्रिकेतील स्थलांतरित विशेषत: आफ्रिका खंडातील देशांमधून कामानिमित्त आलेले लोक - स्थानिक लोकांच्या रागाला कारणीभूत ठरले आहेत. त्यांनी आपल्या देशात परत जावे म्हणून त्यांच्यावर हल्ले केले जात आहेत. दक्षिण आफ्रिकेतील कॅथलिक चर्चने त्याविरुद्ध आवाज उठवला आहे. आर्चबिशप सिथंबेल सरकारला व लोकांना उद्देशून म्हणाले, ''दोष आपला आहे. आपल्या शिक्षणपद्धतीचा, नियोजनाचा आहे. देशातील भ्रष्टाचाराचा आहे. स्थलांतरित गेले तरी आपल्या समस्या बदलणार नाहीत. म्हणून स्थलांतरितांना दोष देऊ नका.''

## ... म्हणजे मानवतावादी कायद्याचे उल्लंघनच

**न्यूयॉर्क (युनायटेड नेशन्स) :** पॅलेस्टिनी निर्वासितांसाठी मदतकार्य करणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या UNRWA ह्या एजन्सीला व्हॅटिकन ह्यापुढेही आर्थिक मदत करील, अशी ग्वाही युनायटेड नेशन्समधील व्हॅटिकनच्या प्रतिनिधीने दिली. पॅलेस्टाईन प्रांतात, विशेषत: गाझा पट्टीतील लोक हिंसाचार, विस्थापन आणि कठीण परिस्थितीला तोंड देत असताना ७०% लोक अन्न, पाणी आणि आश्रयाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यांना मदत करणाऱ्या UNRWAच्या कार्यात अडथळे आणले जात आहेत. अशी मदत रोखणे मानवतावादी कायद्याचे उल्लंघनच आहे, असे व्हॅटिकनच्या प्रतिनिधीने सांगितले.

## कार्डिनल्सची विशेष महासभा संपन्न

**व्हॅटिकन :** २६-२७जून ह्या दरम्यान कार्डिनल्सची विशेष महासभा संपन्न झाली. जगभरातील १२८ कार्डिनल्स त्यामध्ये



सहभागी झाले होते. भाषानिहाय २० कार्यगटांमध्ये कार्डिनल्सची विभागणी करण्यात आली होती. चर्चासत्रात युद्धे, सत्तेची संस्कृती, कृत्रिम बुद्धिमत्ता, तरुणांमधील वाढता एकाकीपणा, गरिबी, सामाजिक विभाजन, कुटुंब, चर्चची सामाजिक शिकवण, आंतरधर्मीय संवाद ह्या विषयांवर विचारविनिमय करण्यात आला.

## मंत्रिमंडळातील एकमेव ख्रिस्ती मंत्री

**नवी दिल्ली :** राज्यसभा सदस्यत्वाचा कार्यकाळ संपल्याच्या पार्श्वभूमीवर अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाचा कार्यभार सांभाळलेले केंद्रिय मंत्रिमंडळातील ख्रिस्ती मंत्री जॉर्ज कुरियन ह्यांनी मंत्रिपदाचा राजिनामा दिला. (केंद्रीय मंत्री मंडळातील एकूण ७१ मंत्र्यांमध्ये आता एकही ख्रिस्ती वा मुस्लिम मंत्री नाही.)

## डॉ. आर्मिडा फर्नांडीस ह्यांचा सन्मान

**नवी दिल्ली :** वैद्यकीय क्षेत्रातील क्रांतिकारी योगदाना बद्दल डॉ. आर्मिडा फर्नांडीस ह्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांनी १९८९मध्ये आशियातील पहिल्या 'ह्युमन मिल्क बँके'ची स्थापना केली. त्यामुळे नवजात बालकांमधील मृत्युदर कमी करण्यामध्ये अभूतपूर्व यश मिळाले आहे. त्यांनी वंचित समुदायाच्या आरोग्य सेवेसाठी 'स्नेहा' ह्या स्वयंसेवी संस्थेची स्थापना केली आहे.

## जगातील वयोवृद्ध धर्मगुरू देवाघरी



**ब्रासिलिया (जर्मनी) :** जर्मनीमधील आणि जगातील सर्वांत वयोवृद्ध धर्मगुरू फा. ब्रुनो कान्ट ह्यांचे वयाच्या ११०व्या वर्षी निधन झाले. अखेरच्या काळात आपले मन ताजेतवाने ठेवण्यासाठी ते सुडोकू आणि बुद्धिबळ खेळत असत. थोडा व्यायामही करीत. प्रार्थनेमुळे आपल्याला भरपूर आयुष्य मिळाले, असे ते सांगत असत.

## ते आहेत संख्येने कमी, पण कामाने मोठे

**रोम :** बांगला देशातील कॅथलिक चर्च दृढ श्रद्धा आणि भाविकांच्या सक्रिय सहभागामुळे कार्यरत आहे, असे ढाक्याचे आर्चबिशप बिजॉय डिक्रुझ ह्यांनी येथे सांगितले. बिशपांच्या ॲडलिमिना (पंचवार्षिक) भेटीसाठी ते येथे आले होते. पोप लिओ ह्यांना त्यांनी बांगला देशातील त्यांच्या कार्याची माहिती दिली. १७ कोटी लोकसंख्येच्या बांगला देशात कॅथलिक अवघे चार लाख आहेत. तरीही ते देशात ७००पेक्षा जास्त सुविधा - शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ, तांत्रिक व व्यावसायिक संस्था, हॉस्पिटल्स, क्लिनिक्स, आरोग्य केंद्रे चालवतात. हजारो सर्वधर्मीय त्याचा लाभ घेत आहेत.

## निकाराग्वन सरकारने बिशपांना केले स्थानबद्ध

**इस्तेली (निकाराग्वा) :** निवृत्त बिशप आल्बेराडो माटा ह्यांना निकाराग्वाच्या पोलिसांनी अटक केली असून त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले आहे. पेसमेकरच्या तपासणीसाठी ते दवाखान्यात गेले असताना त्यांना अटक करण्यात आली. रविवारच्या मिस्सावर प्रवचन करताना देशातील छळग्रस्त चर्चचा त्यांनी उल्लेख केला म्हणून ही अटक झाली. बिशप आल्बेराडो ह्यांची त्वरीत सुटका करण्यात यावी, अशी मागणी आंतरराष्ट्रीय स्तरावर होत आहे.

## शाळेला बौद्ध साधू व बिशपांचे नाव

**नोम पेन्ह (कंबोडिया) :** येथील एका बौद्ध धर्मीय शाळेला बौद्ध साधू आणि कॅथलिक बिशपांचे नाव देण्याचा कार्यक्रम पार पडला. शाळेचे नाव चामरोन ऑलिव्हर असे ठेवण्यात आले आहे.



चामरोन हे एका मठाचे साधू असून ऑलिव्हर हे नोम पेन्हचे बिशप आहेत. कंबोडिया ह्या बौद्ध धर्मीय देशात आंतरधर्मीय संवादाचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

## शांतीप्रिय धर्मगुरूची हत्या



**झेमिवो (मध्य आफ्रिकन प्रजासत्ताक) :** फा. क्रिपिन मोंगा संध्याकाळी आपले काम आटोपून चर्चकडे येत असताना गोळ्या घालून त्यांची हत्या करण्यात आली. चर्चजवळील लष्करी तपासणी नाक्यावर ही घटना घडली. देशातील अस्थिर वातावरणात लोकांमध्ये शांती व समेट निर्माण करण्याचे काम फा. मोंगा करीत असत.

## जपानची राजकन्या कथिड्रलमध्ये



**मॉंटेरी (मेक्सिको) :** फिफा वर्ल्डकपच्या निमित्ताने येथे आलेल्या जपानच्या राजकन्या टाकमाडो ह्यांनी मॉंटेरी कथिड्रलला भेट दिली. कथिड्रलमधील कलाकुसरीची, वास्तुकलेची पहाणी करून त्यांनी आनंद व्यक्त केला. मॉंटेरीचे आर्चबिशप रॉजेलिओ लोपिझ ह्यांनी राजकन्येचे स्वागत केले आणि कथिड्रल भेटीबद्दल आभार मानले.

## होनोलुलू धर्मप्रांताचा द्विशताब्दी सोहळा

**होनोलुलु (हवाई) :** कॅथलिक धर्माच्या हवाईमधील आगमनाचा २००वा सोहळा वर्षभर (जुलै २०२६ ते २०२७) साजरा होत आहे, असे बिशप लॅरी सिल्वा ह्यांनी सांगितले. ७ जुलै १८२७ ह्या दिवशी सेक्रेड हार्ट ऑफ जिझस ॲण्ड मेरीचे फ्रेंच ब्रदर्स येथे आले. त्यावेळी येथील लोकांना येशू ख्रिस्ताविषयी काही माहीत नव्हते. आपल्या सेवेद्वारे त्यांनी लोकांना आपलेसे केले. आज येथे ६६ धर्मग्राम आणि २६ मिशन चर्च आहेत. मध्य पॅसिफिक महासागरात बेटांचा समूह असलेले हवाई हे अमेरिकेचे ५०वे राज्य आहे.

## सिस्टर स्मेरिली व्हॅटिकनच्या मंत्रिमंडळात

**व्हॅटिकन :** पोप लिओ ह्यांनी व्हॅटिकन प्रशासनात आणखी काही बदल केले असून सिस्टर अलेक्झांड्रो स्मेरिकी ह्यांची मानवी विकास खात्याच्या प्रमुख म्हणून नेमणूक केली आहे. १ सप्टेंबरपासून त्या आपला कार्यभार स्वीकारतील.

## मिस्सावर प्रवचन करण्यास प्रापंचिकांना परवानगी नाही

**व्हॅटिकन :** जर्मन बिशप परिषदेचे अध्यक्ष बिशप विल्मर ह्यांनी मिस्सावर प्रवचन करण्यास प्रापंचिकांना परवानगी द्यावी, अशी व्हॅटिकनकडे विनंती केली होती. व्हॅटिकनने परवानगी नाकारताना म्हटले आहे की प्रवचन हा पूजाविधीचा (मिस्साचा) महत्त्वाचा भाग असल्याने बिशप, धर्मगुरू वा डिकन्स ह्यांच्याशिवाय अन्य व्यक्तींना मिस्साविधीच्या वेळी प्रवचन करता येणार नाही.

## Wanted Bride

**Groom :** 35 years (Divorce), Roman Catholic, B. E., good looking, 6'.2", from a well cultured family with strong christian values from Vasai.

**Job :** operations Manager in a reputed semi government company in the UAE with excellent benefits.

**Expected :** Roman Catholic, suitable to the groom, caring family oriented and with good christian values.

**Contact: groom4822@gmail.com**

## Wanted Bride

**Groom :** R.C.from Vasai with well educated family, Age 30 years, Ht. 5'-9", **Edu. :** B.E., M.B.A. in Data Analytics (U.S.A.), **Work :** Since 5 years (U.S.A.) **Bride :** R.C. from Vasai with well educated family. **Age :** 25 to 30 years. Height : 5 to 5.9 ft. **Edu. :** B.E. Medical field or other fields. Suitably educated & interested in settling down in U.S.A., Europe or U.A.E. Should have no prior or current relationship history.

**Post Box No. AUG . 01**

## वधू पाहिजे

**वर :** रोमन कॅथलिक, वसईतच वास्तव्य, वय वर्षे ३४, शिक्षण : बी.कॉम व बँकींग कोर्स, **नोकरी :** नामांकित बँकेत मॅनेजर, परमनंट जॉब.

**अपेक्षित वधू :** रोमन कॅथलिक, वरास अनुरूप.

**संपर्क : मोबाईल**

**8208698005 / 8657785909**

(Pl. drop message if not connected)

## वर पाहिजे

**वधू :** जन्म - दिनांक ३ मार्च १९९४, उंची : ५'-५'', शिक्षण : M.Sc. Chemistry, B.Sc. Computer Science, B.Ed., D.Ed., इंग्लिश मिडियम, नोकरी : शिक्षिका.

**अपेक्षित वर :** रोमन कॅथलिक, अनुरूप.

**Contact : 8261025865**

## जेम्स ट्रॅव्हल्स आयोजित

१) **कोकण दर्शन : मालवण तारकर्ली , देवबाग, चिवला बीच, वेंगुर्ला बीच सहल** : दिनांक ६ ते ९ नोव्हें.२०२६. प्रवास २×२ ए.सी. बसने, निवास ए.सी. हॉटेल (चार जणांस एक रूम) एकूण खर्च प्रत्येकी रु. १४,०००/-मात्र.

२) **राजस्थान सहल : माऊंट अबू, उदयपूर, चित्तोडगड, जोधपूर, जेसलमेर, जयपूर सहल** : दिनांक ११ ते २२ नोव्हें. २०२६. रेल्वे प्रवास : ३ ए.सी.ने, बस प्रवास २×२ ए.सी.कोचने. एकूण खर्च प्रत्येकी रु. ३९,५००/-. मात्र.

३) **अंदमान सहल : पोर्ट ब्लेअर, सेल्युलर जेल, हॅवलॉक आयलंड, बाराटांग रॉस आयलंड, नील आयलंड, नॉर्थ बे आयलंड सहल** : दिनांक ११ ते १६ नोव्हें. २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. २६५००/- + विमान भाडे.

**संपर्क : जेम्स परेरा**

**7020547396 / 8975784472**



# Ryan Caterers

## OUR LADY OF HEALTH VELANKANNI NOVENA
## 26TH AUGUST TO 10TH SEPTEMBER 2026

**FULL NOVENA**

1) FULL NOVENA NON A/C TICKET & NON-A/C ROOM WITH FOOD 19,000/-
2) FULL NOVENA 3 TIER A/C TICKET & A/C ROOM WITH FOOD 28,000/-
3) FULL NOVENA NON-A/C TICKET & A/C ROOM WITH FOOD 26,000/-
4) FULL NOVENA A/C TICKET & NON A/C ROOM 21,500/-
5) FULL NOVENA ONLY FOOD WITH NON-A/C ROOM 16,000/-
6) FULL NOVENA ONLY FOOD WITH A/C ROOM 23,000/-
7) FULL NOVENA FOR 4 TO 11 YEARS CHILDREN NON-A/C PACKAGE 14,000/-
8) FULL NOVENA FOR 4 TO 11 YEARS CHILDREN A/C PACKAGE 22,000/-

**5 DAYS NOVENA**

1) FOR 5 DAYS ONLY FOOD WITH NON-A/C ROOM 12,500/-
2) FOR 5 DAYS ONLY FOOD WITH A/C ROOM 16,500/-
3) FOR 5 DAYS FOR 4 TO 11 YEARS OLD CHILDREN NON-A/C ROOM & FOOD 9,500/-
4) FOR 5 DAYS FOR 4 TO 11 YEARS OLD CHILDREN A/C ROOM & FOOD 13,000/-

**3 DAYS NOVENA**

1) FOR 3 DAYS ONLY FOOD WITH NON-A/C ROOM 9,500/-
2) FOR 3 DAYS ONLY FOOD WITH A/G BOOM 12,500/-

**SPECIAL ROOM FOR 1 OR 2 PEOPLE**

1) FULL NOVENA - SPECIAL ROOM FOR 1 OR 2 PEOPLE (NON-A/C PACKAGE) NON-A/C TICKET & NON-A/C ROOM + FOOD 46,000/-
2) FULL NOVENA - SPECIAL ROOM FOR 1 OR 2 PEOPLE (A/C PACKAGE) A/C TICKET & A/C ROOM + FOOD 62,000/-

**ONLY FOOD AVAILABLE**
**BREAKFAST, LUNCH & DINNER**
**RS.750/- PER PERSON PER DAY**



**SINCE THE RAILWAY TICKETS HAVE TO BE BOOKED 2 MONTHS IN ADVANCE, KINDLY BOOK YOUR SEATS AT THE EARLIEST**

**CONTACT NO.: 9987080007 / 8898578959 / 7977832861**

**Our Lady of GOOD HEALTH VAILANKANNI Pray for us**

**धार्मिक**

## दृढीकरण शिक्षकांची सभा

**गिरीज :** जीवन ज्योती आयोजित गुरुवार १८ जून रोजी सेंट फ्रान्सिस झेवियर चर्च, गिरीज येथे दृढीकरण शिक्षकांची सभा वसई धर्मप्रांताचे बिशप थॉमस डिसोजा ह्यांच्या अध्यक्षतेखाली



संपन्न झाली. निर्मळ धर्मग्रामातील दृढीकरण शिक्षकांनी सभेची सुरुवात प्रार्थनेने केली. त्यानंतर जीवन ज्योतीचे संचालक फा. निलेश तुस्कानो ह्यांनी प्रास्ताविक केले.

कॅथलिक कॅटेकेटिकल डिरेक्टरीची उद्दिष्टे लक्षात घेऊन प्रत्यक्ष संवाद, वैयक्तिक साक्ष व गटचर्चेद्वारे शिक्षण देणे गरजेचे आहे व त्यासाठी तयार केलेल्या प्रश्नांवर गटचर्चा करून आराखडा तयार करण्यास मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन ज्योत्स्ना डाबरे ह्यांनी केले. सभेसाठी ८४ सदस्य उपस्थित होते.

**- ज्योत्स्ना व प्रमिला डाबरे**

## धर्मप्रांतातील धर्मशिक्षकांची सभा

**गिरीज :** दिनांक १८ जून रोजी धर्मप्रांतातील सर्व धर्मशिक्षकांची सभा बिशप थॉमस डिसोजा ह्यांच्या अध्यक्षतेखाली संत फ्रान्सिस झेवियर चर्च हॉल, गिरीज येथे पार पडली. माणिकपूर धर्मग्रामातील शिक्षकांच्या प्रार्थनेने सभेची सुरुवात



झाली. गिरीज धर्मग्रामातील संडेस्कूल शिक्षकांनी ॲक्शन साँग सदर केले. बिशप थॉमस डिसोजा, मॉन्सि. फ्रान्सिस कोरिया, फा. निलेश तुस्कानो व फा. अविनाश धोधडे ह्यांचे स्वागत करण्यात आले. फा. निलेश ह्यांनी भारतीय कॅथलिक बिशप परिषद (CCBI) ने प्रकाशित केलेली New National Catechetical Directory ह्यात नमूद केलेली मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट केली : ''धर्मशिक्षक हा केवळ शिक्षकच नव्हे तर साक्षीदार, सहप्रवासी, मिशनरी शिष्य आणि समुदाय निर्माता.''

सहसंचालक फा. अविनाश ह्यांनी जीवन ज्योतीचा सन २०२५ ते २०२६ ह्या वर्षाचा अहवाल सादर केला. सर्व शिक्षकांनी गट चर्चेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. बिशप थॉमस डिसोजा ह्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना धर्मशिक्षक नव्हे; तर ख्रिस्ताचे साक्षीदार असे संबोधिले. श्रद्धा व सेवाकार्य हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत व धर्मशिक्षणाला प्राधान्य देणे आवश्यक आहे हे सांगितले. प्रथम ख्रिस्तशरीर व दृढीकरण साक्रामेंताची तयारी करणाऱ्या वर्गासाठी विशेष मार्गदर्शनपर सूचना देत असताना ते म्हणाले, पोप लिओ चौदावे ह्यांनी हे वर्ष संत फ्रान्सिस असिसी ह्यांना समर्पित केलेले आहे. त्यामुळे संत फ्रान्सिस असिसी ह्यांचा साधेपणा आपल्या सोहळ्यावेळी अमलात आणण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत, असे त्यांनी सांगितले. सभेचे सूत्रसंचालन स्नेहल व प्रीतिका ह्यांनी केले. फा. अविनाश ह्यांनी सर्वांचे आभार मानले. सभेस ३७ धर्मगुरू व १५४ धर्मशिक्षक उपस्थित होते.

**- डॉल्सी डिकोस्टा,** गास

## नूतनीकरण केलेल्या सभागृहाचा आशीर्वादविधी

**गिरीज :** नूतनीकरण केलेल्या सभागृहाचा आशीर्वादविधी व थिऑलॉजी कोर्स (इंग्रजी व मराठी) चे उद्घाटन बिशप थॉमस डिसोजा ह्यांच्या हस्ते शनिवार दिनांक ११ जुलै रोजी जीवन दर्शन केंद्र, गिरीज येथे संपन्न झाले.



**सामाजिक**

## बालमेळावा

**गांगणगाव :** वसईचा सुपुत्र आणि भारताचा पहिला संत गोन्सालो गार्सिया ह्यांच्या संतीकरणाच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून ८ जून २०२६ रोजी परमपिता चर्च, गांगणगाव ह्या धर्मग्रामात बालमेळावा आयोजित करण्यात आला होता. गांगणगाव, वसा-करजगाव आणि धामणगाव परिसरात वर्षभरात शाळकरी मुलांचे १५ बालसंघ स्थापन करण्यात आले आहेत. ह्या मुलामुलींची समूहबांधणी करण्याच्या हेतूने बालमेळावा आयोजित करण्यात आला होता. १५ बालसंघातून १ली ते ९वीची ९७ मुलंमुली हजर होते. प्रार्थना आणि प्रभू भजन घेऊन उत्साहात कार्यक्रमाला सुरुवात झाली. सकाळच्या सत्रात कृतिगीत, मैदानी खेळ, टॅली खेळ इत्यादी विविध कार्यक्रमात मुले रंगून गेली होती.

दुपारच्या सत्रात बिना सेरेजो (पापडी) ह्यांनी बनवलेल्या रुचकर जेवणाचा मुलांनी आस्वाद घेतला. मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ह्यात मुलांनी पारंपरिक आदिवासी गीते गायली आणि तारपा नृत्य सादर केली. मुलांना शालोपयोगी वस्तूंचा वाटप करण्यात आला. वेळ आणि बक्षिसांचे संयोजन करण्यासाठी रिया घोन्सालविस (पापडी) आणि ऑव्हीलॉन घोन्सालविस (रमेदी) ह्यांनी सहकार्य केले. शेवटी मिस्साबलिदानाने बालमेळाव्याचा समारोप करण्यात आला.

## सोनम वांगचुक ह्यांच्या समर्थनार्थ वसईत धरणे आंदोलन

**वसई :** 'नीट' परीक्षेतील भ्रष्टाचार आणि शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान ह्यांचा राजीनामा ह्या मागण्यासाठी केलेल्या दिल्ली येथील जंतर-मंतर आंदोलनप्रसंगी दिल्ली पोलिसांनी केलेल्या कारवाईचा निषेध नोंदविण्यासाठी आणि सोनम वांगचुक ह्यांच्या समर्थनार्थ वसईतील तहसील कार्यालयासमोर सोमवार दिनांक २० जुलै रोजी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत धरणे आंदोलन पुकारले होते. ह्या आंदोलनात अ‍ॅड. सुमित डोंगरे, पायस मच्याडो, जॉन परेरा, मिलिंद खानोलकर, मॅकेन्झी डाबरे, कुमार राऊत ह्या सामाजिक कार्यकर्त्यांसह विद्यार्थी, शिक्षक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ह्यावेळी बोलताना ''हा वैचारिक लढा असून



'नीट' पेपरफुटीच्या विरोधात आपण एकत्र आलो आहोत. ज्या परीक्षा चुकीच्या पद्धतीने घेतल्या गेल्या त्यामुळे लाखो मुलांचे नुकसान झाले. त्याचा निषेध आपण करत आहोत,'' असे मत अ‍ॅड. धनंजय चव्हाण ह्यांनी व्यक्त केले.

विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी हे आंदोलन असून सरकारच्या दडपशाही विरोधात लोकशाही मार्गाने लोक एकत्र येत आहेत, अशी प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते मिलिंद खानोलकर ह्यांनी दिली. तसेच सरकारकडून आंदोलन चिरडण्याचा जो प्रयत्न सुरू आहे, तो अतिशय लज्जास्पद असल्याचे 'आप'चे पदाधिकारी जॉन परेरा ह्यांनी म्हटले आहे.

ह्या प्रसंगी वसईचे शाहीर जुराण लोपीस ह्यांनी स्फूर्तिदायी गीत गाऊन आंदोलनाची चेतना जागवली.

**शैक्षणिक**

## धर्मशिक्षण, नैतिक शिक्षण व मूल्यशिक्षण सभा

**गिरीज :** धर्मशिक्षण, नैतिक शिक्षण आणि मूल्यशिक्षण शिकविणाऱ्या शिक्षकांची सभा ११ जुलै रोजी संत फ्रान्सिस झेवियर चर्च, गिरीज येथे संपन्न झाली. बैठकीची सुरुवात नाझरेथ विद्यालयातील शिक्षकांच्या प्रार्थनेने केली. ब्रिनल अंड्राडिस ह्यांनी





अहवाल सादर केला. धर्मप्रांतीय शिक्षण केंद्राचे संचालक फा. किरण लोपीस ह्यांनी शालेय स्तरावरील धर्मशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना प्रत्येक विद्यार्थ्याच्या सर्वांगीण घडणीत धर्मशिक्षण हा अविभाज्य घटक असल्याचे सांगितले. फा. निलेश तुस्कानो ह्यांनी मूल्यशिक्षण हे केवळ एक व्यवसाय नसून हे एक ध्येय आहे ह्या विषयावर मार्गदर्शन केले. शिक्षकांना केवळ ज्ञान देणारे शिक्षक म्हणून नव्हे तर ख्रिस्ताचे साक्षीदार म्हणून स्वत:कडे पाहण्याचे आवाहन केले.

युवदर्शन संचालक फा. ख्रिस्तोफर वाझ ह्यांनी विद्यार्थ्यांना नागरी सेवा (Civil Services) परीक्षांसाठी प्रेरित करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच यंग स्टुडंट्स मुव्हमेंट (YSM) आणि यंग ख्रिश्चन स्टुडंट्स (YCS) ह्या चळवळींच्या माध्यमातून जबाबदार सामाजिक भान असलेले आणि नेतृत्वगुणांनी परिपूर्ण विद्यार्थी घडविण्याच्या संधीबद्दल माहिती दिली. शिक्षकांनी गटचर्चेत सहभाग घेतला. ह्या सभेला वसई धर्मप्रांताचे बिशप थॉमस डिसोझा ह्यांची विशेष उपस्थिती लाभली. आपल्या प्रेरणादायी संदेशात त्यांनी सर्व शिक्षकांच्या नि:स्वार्थ आणि समर्पित सेवेबद्दल मन:पूर्वक कौतुक व्यक्त केले.

## करिअर मार्गदर्शन शिबिर

**उमराळे :** रविवार दिनांक १२ जुलै रोजी युवा अभियान आणि ज्ञानज्योत संघटना, उमराळे आयोजित इयत्ता ९वी ते



पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन ख्रि. फा. अलॉयशियस सभागृह, उमराळे येथे करण्यात आले. ह्याप्रसंगी करिअर गुरू प्रकाश आल्मेडा ह्यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख धर्मगुरू फा. नितीन डिसोजा ह्यांनी विद्यार्थी व पालक ह्यांना मोलाचा संदेश दिला. सूत्रसंचालन एव्हरिना गोन्सालविस ह्यांनी केले.

## अभिनंदन



**मर्सिस :** ईथन रुडॉल्फ कोलासो, मर्सिस ह्यांची निवड 'मल्हार फेस्ट' ह्या आंतर-महाविद्यालयीन सांस्कृतिक महोत्सवाच्या अध्यक्षपदी झाली आहे. मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधील अर्थशास्त्राचा विद्यार्थी असून २०२६च्या कार्यकाळासाठी ह्या संस्थेचे नेतृत्व करत आहेत. ह्या फेस्टचे नेतृत्व करण्यासाठी पहिल्यांदा एका वसईमधील युवकाची निवड झाल्याबद्दल ईथन ह्यांचे 'सुवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन!

## इंडियन प्राईड अवॉर्डने सन्मानित



**भुईगाव :** वसईतील गायिका कुमारी लॅरिसा आल्मेडा ह्यांना इंडियन प्राईड अवॉर्डने सन्मानित करण्यात आले आहे. मुंबईतील मेयर्स ऑडिटोरियम, अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## साहित्यिक

## जीवन गौरव पुरस्कार

**गिरीज :** मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त डॉ. नाझरेथ मिस्किटा ह्यांना पुणे येथे जय मल्हार व वसंत सेना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. 'सुवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन!




## 'अ आणि बा' काव्यसंग्रहाचे प्रकाशन




**पापडी :** थॉमस बॅप्टिस्टा ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य व धर्मप्रांतीय शिक्षण विभागाचे संचालक फा. किरण लोपीस लिखित 'अ आणि बा' ह्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन २७ जून रोजी वसई धर्मप्रांताचे चान्सलर व कॉलेजचे मॅनेजर फा. जॉन फरगोज ह्यांच्या हस्ते संपन्न झाले. ह्या प्रसंगी फा. जॉन फरगोज, फा. निलेश तुस्कानो, फा. किरण लोपीस, लुकस परेरा ह्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रिया रॉड्रिग्ज व संदीप जाधव ह्यांनी केले. आभार प्रदर्शन एरिना डिकुना ह्यांनी केले.

## सहवेदना



**विरार :** गेली पाच दशके पत्रकारितेच्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे आणि 'साहित्य संगम' अंकाचे संपादक-पत्रकार श्री.उमाकांत वाघ ह्यांचे दिनांक ६ जुलै रोजी वयाच्या ७१व्या वर्षी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले.



**नानभाट :** येथील सामाजिक कार्यकर्ते व संत विन्सेंट डी पॉल संघटनेचे समर्पित धर्मग्रामस्थ विन्सेंट मिनेझीस (भाटी) ह्यांचे दिनांक १०जुलै रोजी वयाच्या ७५व्या वर्षी निधन झाले.

## डॉ. कुमार सप्तर्षी ह्यांचे निधन



**पुणे :** ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष, माजी आमदार, लेखक आणि 'सत्याग्रही विचारधारा' मासिकाचे संस्थापक-संपादक डॉ. कुमार सप्तर्षी ह्यांचे दिनांक १८ जुलै रोजी वयाच्या ८४व्या वर्षी निधन झाले. युवकांना संघटित करून सामाजिक आणि राजकीय परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशांनी त्यांनी 'युवक क्रांती दल' (युक्रांद) ह्या संघटनेची १७ नोव्हें. १९६७ रोजी स्थापना केली होती. डॉ. सप्तर्षी ह्यांनी वैद्यकीय व्यवसायाऐवजी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सामाजिक चळवळींना वाहून घेतले. त्यांनी 'येरवडा विद्यापीठातील दिवस', 'मोहनदास गांधी', 'चंद्रशेखर', 'व्यक्तिरंग' आदी पुस्तकांचे लेखन केलेले आहे.

'सुवार्ता' परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

# जेरूसलेम टूर्स अ‍ॅन्ड कॅटरिंग सर्व्हिस, आगाशी

* **दिनांक ४ ते १८ जुलै २०२६ची वेलंकनी माता नोव्हेना ट्रिप फूल झाली आहे त्याबद्दल वेलंकनी मातेचे व माझ्या कोळी बांधवाचे मी आभारी आहे.**

१) **आता चला** दिनांक २७ ऑगस्ट ते १० सप्टें. २०२६ : **वेलंकनी मातेच्या नोव्हेनासाठी.** भव्य-दिव्य अशा जागेत वसलेली बिल्डिंग व पॉश बंगले. मोठ्या रूम्स व त्यात सर्व अ‍ॅमिनिटीस हॉटेल V.P. N Residency वेलंकनीत एकमेव नावाजलेले हॉटेल. ए.सी.ट्रेन,ए.सी.रूम. Quality N Quantity फूड एकूण खर्च रुपये २८,५००/- मात्र. तसेच स्वतंत्र येणाऱ्या भाविकांसाठी ५ दिवसांसाठी खर्च रुपये ११,०००/-.

२) **मँगलोर, उडीपी, कुर्ग सहल** : दिनांक ७ ते १४ नोव्हें. २०२६. ए.सी.ट्रेन, ए.सी.बस, ए.सी.रुम, सर्व साईट सीन, एन्ट्री फी व पार्टीसहीत खर्च रु.२७,०००/-व लहान मुलांस रु.२२,०००/-

* **कोकण, मालवण, तारकर्ली सहल** : दिनांक २१ ते २६ नोव्हें. २०२६. थंड व हिरव्यागार निसर्गाची मजा लुटण्यासाठी ए.सी.ट्रेन, ए.सी.बस, ए.सी.रुम, सर्व साईटसीन, एन्ट्री फी व पार्टीसहीत खर्च रुपये १९,०००/- व मुलांस रु. १५,०००/-.
* **Quality And Quantity No Compromise.**
* संज्याव घोन्सालवीस, आगाशी : **9320888907**(Whatsap)
* पायस घोन्सालवीस, उमराळे :**C/O 9766092738**


**प्रेमळ स्मरणार्थ**



**ख्रिस्तवासी मागरिट फ्रान्सिस कार्लोस**

कोकरमवाडी, दिघा, पापडी

जन्म : ०१/०५/१९५४; मृत्यू : १९/१२/२०२०

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. जे अंत:करणाने शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***

(मत्तय ५:३,८)

*हे प्रभू, आमच्या आईला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती लाभू दे हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**मुले, सून, मुलगी, जावई व नातवंडे**

---

**४८ वर्षांची आठवण**

**ख्रिस्तवासी ऑस्टीन आसिस मच्याडो**

पाली, करीजभाट

जन्म : १०/०९/१९५३

मृत्यू : १०/०८/१९७८

**कुटुंबीय**



---

**२३ वर्षांची आठवण**



**ख्रिस्तवासी विन्सन मायकल फरेरा**

सुतारभाट, सालोली

जन्म : २१/०४/१९४५

मृत्यू : १६/०८/२००३

**पत्नी :क्लेरा; मुलगा :डेल्वीन मुलगी :डॉरेटी**

---

**२५ वर्षांची आठवण**



**ख्रिस्तवासी फिलीप पास्काल नुनीस,** किरावली, पाली

***''प्रभू माझा प्रकाश व माझे तारण आहे.''***

(स्तोत्र २७:१)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवात तुम्हाला चिरंतन शांती लाभो!*

**नुनीस कुटुंबीय**

---

**वार्षिक स्मृती** | **१५ वर्षांची आठवण**





**ख्रिस्तवासी कोसू डॉमणिक डिसोजा** | **ख्रिस्तवासी डॉमणिक पास्काल डिसोजा**

ओळंबवाडी, पापडी

जन्म : २८/०९/१९३८ | जन्म : १५/०१/१९२९

मृत्यू : २६/०८/२०२५ | मृत्यू : १२/१२/२०११

वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक २३/०८/२०२६

सकाळी ७.१५ वाजता, कृपामाता कथिड्रल, पापडी.

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो!* - **कुटुंबीय**

शब्दकोडे

# ‘सुवार्ता’ शब्दकोडे क्रमांक - १२

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | ╳ | ३ | ╳ | ४ |
| | ╳ | ╳ | | ╳ | | ╳ | |
| ५ | | ६ | ╳ | ७ | | ╳ | |
| | ╳ | | ╳ | ८ | | ╳ | |
| | ╳ | ९ | १० | ╳ | ११ | १२ | |
| १३ | १४ | ╳ | १५ | | ╳ | १६ | |
| ╳ | १७ | १८ | | ╳ | १९ | ╳ | ╳ |
| २० | | | | ╳ | २१ | | |

**रचना : अनिल डायगो गोन्साल्वीस**
उमराळे

**आडवे शब्द :-** १) कळा ज्या लागल्या जीवा, मला की ईश्वरा ठाव्या. कुणाला काय हो त्यांचे, कुणाला काय सांगाव्या, ह्या अजरामर भावगीताचे राजकवी (गीतकार) × × ×× (४)
५) वसईतील एक सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार राजकीय नेते मनवेल तुस्कानो संपादित एक मासिक ××× आंदोलन (३)
७) चांभार, चर्मकार ×× (२) ८) दश ×× (२)
९) ×× हे पोळी, भाकरी, डोसा, पराठा इत्यादी भाजण्यासाठी किंवा शिजवण्यासाठी वापरले जाणारे सपाट धातूचे भांडे आहे ×× (२)
११) कडू, कटू, तित्क, कठोर, पाषाणहृदयी ××× (३)
१३) नाडी ×× (२) १५) भीती ×× (२)
१६) हस्त, हात ×× (२) १७) कुर्म, कच्छप, कमठ ××× (३)
२०) ‘सुवार्ता’चे लेखक, साहित्यिक स्टीफन एम. परेरा ह्यांच्या ×××× (४) ह्या कथासंग्रहाला कै. शरश्चंद्र वासुदेव चिरमुले सर्वोत्कृष्ट कथा पुरस्कार प्राप्त झाला आहे.
२१) ××× हे वसई धर्मप्रांताचे मराठी मासिक आहे. ह्यात धार्मिक, सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक, पर्यावरण आदी अनेक विषयांवरील लेख प्रसिद्ध केले जातात ××× (३)

**उभे शब्द :-** १) लोड शेडींग ×× ×××× म्हणजे विजेची मागणी वाढल्यास आणि पुरवठा कमी पडल्यास वीज पुरवठा पद्धतशीरपणे खंडित करणे होय (६)
२) सर्व बाजूनी पाण्याने वेढिलेली जमीन द्वीप ×× (२)
३) नामवंत कवियत्री, साहित्यिका, प्राध्यापिका डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांचे एक पुस्तक ××× ×× (५)
४) हे १ ऑगस्ट २०१२ ते २८ फेब्रु.२०१८ या कालावधीत ‘सकाळ’ वृत्तसमूहात मुख्य संपादक म्हणून कार्यरत होते ××× ××× (६)
६) पित्ताशय ××× (३) ७) आनंद, हर्ष ×× (२)
१०) ×××× समाज (सोमवंशीय क्षत्रिय) हा महाराष्ट्रातील, उत्तर कोकण, प्रामुख्याने पालघर ते डहाणू, ठाणे उपनगर विशेषत: वसई-विरार - नालासोपारा या विभागात या समाजाची मोठी लोकसंख्या आहे. पारंपरिक शेती आणि बागायती (वाड्या) करणाऱ्या या समाजाला ‘वाडीवाली’ किंवा पुढे अपभ्रशाने ×××× म्हटले जाऊ लागले (४)
१२) बदक (इंग्रजी) (२) १४) पहाट ××× (३)
१८) सोबत, सह ×× (२) १९) धन, संपत्ती, समृद्धी, ऐश्वर्य ×× (२)

### ‘सुवार्ता’ शब्दकोडे क्रमांक - ११ चे उत्तर

**आडवे शब्द :-** १) सुमन कल्याणपूर ५) महान ६) धमनी ८) शांतीवन ९) राशी १२) कृतज्ञतेची ज्योत १६) तपस्वी १७) रावा

**उभे शब्द :-** १) सुमन २) महा ३) नन ४) रक्त ६) धन ७) नीरा १०) शीत ११) यकृत १३) तेजस्वी १४) ज्योत १५) गोवा.

# हास्यरंग

## पांढरे केस

मुलगा : बाबा, माणसाचे केस पांढरे का होतात?
बाप : तुझ्यासारखी खट्याळ व खोडकर मुले असली की माणसाचे केस पांढरे होतात.
मुलगा : बाबा, म्हणूनच आपल्या आजोबांचे सगळे केस पांढरे झाले आहेत.

* * * *

## प्रगती

लहानपणी अब्राहम लिंकन शाळेत असताना त्याचे शिक्षक एकदा त्याला रागाने म्हणाले, ‘‘अब्राहम, नुसती खाण्याच्या कामात तुझी प्रगती दिसते आहे. अभ्यासाच्या बाबतीत शून्य!’’ तेव्हा अब्राहम नम्रतेने म्हणाला, ‘‘सर, त्याचे काय आहे, खाण्याचे काम मी स्वत: करतो म्हणून ते चांगले होते. पण मला शिकविण्याचे काम तुम्ही करता म्हणून अभ्यासात माझी प्रगती होऊ शकत नाही!’’

## उशीर

मुंबईच्या गायवाडीत आचार्य अत्र्यांचे एकदा भाषण होते. त्यांना येण्यास खूप उशीर झाला. लोक कंटाळले होते. आयोजकांनी लोकांची क्षमा मागितली. अत्रे भाषणास उभे राहिले व म्हणाले, ‘‘मला यायला उशीर झाला हे खरे आहे. आता खोटं कसं बोलू!’’

मग कमरेवर एक हात ठेवून व दुसरा उंचावून म्हणाले, ‘‘अरे, पण गायवाडीत वेळेवर यायला मी काय बैल आहे?’’

* * * *

## रिक्षाचा प्रवास

कवी सोपानदेव चौधरी एकदा रिक्षातून जात असताना, रस्ता खाचखळग्यांचा असल्यामुळे त्यांचे डोके रिक्षाच्या छताला आपटू लागले. तेव्हा ते रिक्षावाल्यास म्हणाले, ‘‘अरे, मी रिक्षात बसलोय खरा; पण मला अंतरिक्षात पोहचवू नकोस!’’

## उपासना वर्ष दिनदर्शिका : ऑगस्ट २०२६

**वाचनग्रंथ : रवि., सोहळे, सण - पहिले वर्ष; सप्ताह - दुसरे वर्ष**

१. **संत आल्फोन्सस लिगोरी-स्मृती**
यिर्मया २६:११-१६,२४
स्तोत्र ६९:१५-१६,३०-३१, ३३-३४
मत्तय १४:१-१२

२. **सामान्यकाळ १८वा रविवार**
यशया ५५:१-३
स्तोत्र १४५:८-९,१५-१८
रोम ८:३५,३७-३९
मत्तय १४:१३-२१

३. यिर्मया २८:१-१७
स्तोत्र ११९:२९,४३,७९-८० ९५, १०२
मत्तय १४:२२-३६

४. **संत जॉन मारी व्हियानी-स्मृती**
यिर्मया ३०:१-२,१२-१५, १८-२२
स्तोत्र १०२:१६-२१,२९, २२-२३
मत्तय १५:१-२,१०-१४

५. यिर्मया ३१:१-७
स्तोत्र : यिर्मया ३१:१०-१३
मत्तय १५:२१-२८ किंवा
प्रकटीकरण २१:१-५
स्तोत्र : यहुदीथ १३:१८-१९
लूक ११:२७-२८

६. **प्रभू येशूचे रूपांतर-सण**
दानिएल ७:९-१०,१३-१४
स्तोत्र ९७:१-२,५-६,९
२पेत्र १:१६-१९
मत्तय १७:१-९

७. नहूम १:१५;२:२;३:१-३,६-७
स्तोत्र : अनुवाद ३२:३५-३६, ३९, ४१
मत्तय १६:२४-२८

८. **संत डॉमनिक-स्मृती**
हबक्कूक १:१२-२:४
स्तोत्र ९:८-९,१०-१३
मत्तय १७:१४-२०

९. **सामान्यकाळ १९वा रविवार**
१राजे १९:९,११-१३
स्तोत्र ८५:९-१४
रोम ९:१-५
मत्तय १४:२२-३३

१०. **संत लॉरेन्स-सण**
२करिंथ ९:६-१०
स्तोत्र ११२:१-२,५-९
योहान १२:२४-२६

११. **संत क्लेर - स्मृती**
यहेज्केल २:८-३:४
स्तोत्र ११९:१४,२४,७२, १०३,१११,१३१
मत्तय १८:१-५,१०,१२-१४

१२. यहेज्केल ९:१-७;१०:१८-२२
स्तोत्र ११३:१-६
मत्तय १८:१५-२०

१३. यहेज्केल १२:१-१२
स्तोत्र ७८:५६-५९,६१-६२
मत्तय १८:२१-१९:१

१४. **संत मॅक्सीमिलन कोल्बे**
यहेज्केल १६:१-१५,६०,६३
स्तोत्र यशया १२:२-६
मत्तय १९:३-१२

१५. **प. मरियेचे स्वर्गनयन-सोहळा**
**भारताचा स्वातंत्र्यदिन**
प्रकटी. ११:१९;१२:१-६,१०
स्तोत्र ४५:१०-१२,१६
१करिंथ १५:२०-२७
लूक १:३९-५६

१६. **सामान्यकाळ २०वा रविवार**
यशया ५६:१,६-७
स्तोत्र ६७:२-३,५-६,८
रोम ११:१३-१५,२९-३२
मत्तय १५:२१-२८

१७. यहेज्केल २४:१५-२४
स्तोत्र : अनुवाद ३२:१८-२१
मत्तय १९:१६-२२

१८. यहेज्केल २८:१-१०
स्तोत्र : अनु. ३२:२६-२८, ३०,३५-३६
मत्तय १९:२३-३०

१९. यहेज्केल ३४:१-११
स्तोत्र २३:१-६
मत्तय २०:१-१६

२०. **संत बर्नड**
यहेज्केल ३६:२३-२८
स्तोत्र ५१:१२-१५,१८-१९
मत्तय २२:१-१४

२१. **संत पोप पायस दहावे-स्मृती**
यहेज्केल ३७:१-१४
स्तोत्र १०७:२-९
मत्तय २२:३४-४०

२२. **पवित्र मरियेचे राणीपद**
यशया ९:२-७
स्तोत्र ११३:१-८
लूक १:२६-३८

२३. **सा. का. २१वा रविवार**
यशया २२:१९-२३
स्तोत्र १३८:१-३,६,८
रोम. ११:३३-३६
मत्तय १६:१३-२०

२४. **संत बार्थोलोम्यू- सण**
प्रकटी २१:९-१४
स्तोत्र १४५:१०-१३,१७-१८
योहान १:४५-५१

२५. २ थेस्स. २:१-३,१४-१७
स्तोत्र ९६:१०-१३
मत्तय २३:२३-२६

२६. २ थेस्स. ३:६-१०,१६-१८
स्तोत्र १२८:१-२,४-५
मत्तय २३:२७-३२

२७. **संत मॉनिका - स्मृती**
१करिंथ १:१-९
स्तोत्र १४५:२-७
मत्तय २४:४२-५१

२८. **संत ऑगस्टीन-स्मृती**
१करिंथ १:१७-२५
स्तोत्र ३३:१-२,४-५,१०-११
मत्तय २५:१-१३

२९. **संत योहान बाप्तिस्ताचा शिरच्छेद - स्मृती**
यिर्मया १:१७-१९
स्तोत्र ७१:१-६,१५,१७
मार्क ६:१७-२९

३०. **सामान्यकाळ २२वा रविवार**
यिर्मया २०:७-९
स्तोत्र ६३:२-६,८-९
रोम १२:१-२
मत्तय १६:२१-२७

३१. १करिंथ २:१-५
स्तोत्र ११९:९७-१०२
लूक ४:१६-३०

### सप्टेंबर २०२६

१. १करिंथ २:१०-१६
स्तोत्र १४५:८-१४
लूक ४:३१-३७

२. १करिंथ ३:१-९
स्तोत्र ३३:१२-१५,२०-२१
लूक ४:३८-४४

३. **संत ग्रेगरी द ग्रेट - स्मृती**
१करिंथ ३:१८-२३
स्तोत्र २४:१-६
लूक ५:१-११

४. १करिंथ ४:१-५
स्तोत्र ३७:३-६,२७-२८, ३९-४०
लूक ५:३३-३९

५. **कोलकत्त्याची संत तेरेजा-स्मृती**
१करिंथ ४:६-१५
स्तोत्र १४५:१७-२१
लूक ६:१-५ **किंवा**
होशेय २:१४-१५,१९-२०
स्तोत्र ४५:११-१२,१४-१७
मत्तय २५:३१-४६

६. **सामान्यकाळ- २३वा रविवार**
यहेज्केल ३३:७-९
स्तोत्र ९५:१-२,६-९
रोम. १३:८-१०
मत्तय १८:१५-२०

७. १करिंथ ५:१-८
स्तोत्र ५:५-७,१२
लूक ६:६-११

८. **पवित्र मरियेचा जन्मदिन-सण**
बालिका दिन
मीखा ५:१-५ **किंवा**
रोम ८:२८-३०
स्तोत्र १३:६-७
मत्तय १:१-१६,१८-२३

९. १करिंथ ७:२५-३१
स्तोत्र ४५:११-१२,१४-१७
लूक ६:२०-२६

# न संपणारी गोष्ट

गोष्ट गमतीदार आहे, मजेशीर आहे, रम्य आहे. विशेष म्हणजे, गोष्टीचे नावच मुळी 'न संपणारी गोष्ट' असे आहे. त्यामुळे धीर धरावा लागेल, चिकाटी बाळगावी लागेल, अंगी सहनशीलता लागेल. कारण गोष्ट थांबवल्यावर सुद्धा गोष्ट थांबत नाही, चालूच राहते, मनात घोळत राहते, अस्वस्थ स्वस्थता निर्माण करते. आहे का वेळ, उमेद, हिम्मत? खचितपणे तुमच्या बुद्धी, शक्ती नि क्लुप्तीला भरपूर वाव आहे...

तर, एक होता राजा. राजा हुशार होता. जाणता होता. एके वर्षी भरपूर पाऊस पडला. सगळ्या ठिकाणी पाणीच पाणी. पण पाणी काही कुठेच तुंबत नसे, पाण्याचा निचरा पटकन् होत असे, आपल्या ५०० वर्षांच्या वसई किल्ल्याप्रमाणे. मस्त पीक आले. घरोघर धान्याची कोठारे भरू लागली. धान्य साठवायला जागा आणि कोठारे अपुरी पडू लागली. राज्यात आबादी आबाद होती. कुणालाही काहीही कमी पडत नव्हते. सारे सुखात होते...

आणि अचानक एक अफवा पसरली : ''चोरी, राजाच्या गोदामात चोरी झाली आहे;'' बस्स! अफवेचे रूपांतर बातमीत होऊ लागले. सर्वांचे धाबे दणाणले. राजाने एक 'अभ्यास समिती' नेमली. काम सुरू झाले. समिती फिरू लागली. मुलाखती घेऊ लागली. एके दिवशी 'अभ्यास समिती' राजेमहोदयांच्या मुख्य गोदामात शिरली आणि त्यांना धक्का बसला : एक चिमणी कुठूनशी आली, एक दाणा उचलून निघून गेली, दुसरी चिमणी आली, एक दाणा उचलून उडून गेली... तिसरी चिमणी आली, एक दाणा उचलून भुरकन निघून गेली...

हे सारे अव्याहतपणे चालूच होते, 'अभ्यास समिती' सदस्य बघतच राहिले; पुढे चालत राहिले, पाहणी करीत, न्याहाळीत. परंतु त्यांना काही कोठे संशय आला नाही, त्यांचा संभ्रम वाढला नाही की काही संशयास्पद आढळले नाही. परंतु त्यांना मात्र एव्हढ्या मोठ्या गोदामात ठिकठिकाणी चिमण्या येताना दिसल्या, एकेक दाणा उचलून निघून जाताना, दुसरी चिमणी येताना, जाताना आदी.

कित्येक वर्षे 'अभ्यास समिती'चा उपक्रम सुरू होता पण हाती काही लागत नव्हते. चोरी होत होती पण चोर सापडत नव्हता. दरम्यान राजा मरण पावला, दुसरा राजा आला, 'अभ्यास समिती'पैकी काही जण जग सोडून गेले परंतु प्रश्न तसाच राहिला. नवीन राजाने नवीन माणसे नेमली. परत अभ्यास सुरू; ही चोरी करतो कोण? भ्रष्टाचाराला जबाबदार कोण? नवीन 'अभ्यास समिती' सदस्य आले, पाहणी केली पण एकेक चिमणी एकेक दाणा नेत्येय ह्याबद्दल त्यांच्या मनात शंकासुद्धा उत्पन्न झाली नाही.

नक्की मूळ मुद्दा होता कोणता? राजाच्या कार्यपद्धतीचा? गोदामाच्या बांधकामाचा? राजाने नेमलेल्या 'अभ्यास समिती'चा? एका चिमणीचा? एका दाण्याचा? राजा बदलला म्हणून निर्माण झाला? समिती सभासद नवे आले म्हणून उफाळून वर आला का? पण सरतेशेवटी समस्येचा उलगडा झाला का, उपाय योजलेत का, प्रतिबंधक इलाज लागू केलेत का? की ज्या रितीने एकंदरीत समस्या हाताळली त्यामुळे आजही प्रश्न मिटलेला दिसत नाही?

वस्तुत: नेतृत्वशैलीच्या दोन प्रमुख पद्धती आहेत : स्थूल (Macro) आणि सूक्ष्म (Micro) व्यवस्थापन :

स्थूल व्यवस्थापन राजा / नेता करतो. तो व्यापक ध्येय्य, कार्यदिशा, लक्ष्य, उद्दिष्ट्ये, अपेक्षित फलप्राप्तीच्या दृष्टिकोनातून कार्यक्रम-उपक्रम ठरवतो तद्वत अनपेक्षित परिणामांची आधीच बडदास्त व्यक्त करतो. योग्य व्यक्तींवर कामगिरी सोपविताना कामाची व्याप्ती व मर्यादा (Limit & Scope) तसेच अभिप्रेत सक्रिय दृष्टिकोन (Pro-active Approach) योजण्यास प्रेरणा दिली जाते नि जबाबदारी पार पाडली जात्येय ह्याची वेळोवेळी खातरजमा केली जाते.

सूक्ष्म व्यवस्थापन सोपविले आहे त्या व्यक्ती लहान, बारीक-सारीक गोष्टी, बारकावे, संबंधित अगदी सामान्य व्यक्ती/पशू/पक्षी, त्यांच्यातील परस्पर संबंध, पूर्वेतिहास-भूगोल, सवयी आदींचा साकल्याने अभ्यास करतात. सूक्ष्म व्यवस्थापन अभ्यासकांचा पूर्वानुभव व प्राविण्य (Experience & Expertise) नि निरीक्षण ह्याकामी उपयुक्त ठरते. सारासार विचारविनिमय व विवेकबुद्धी निर्णायक ठरतात. अर्थात, हाती आलेल्या मसुद्याचे विश्लेषण (निर्णय कोण घेतो? फायदा कुणाला? परिणाम कोण भोगतो?) अत्यावश्यक असते.

चोरी ती चोरीच. मग ती चिमुकली चोरी (भूक भागविण्यासाठी) असो, भुरटी चोरी (लाज-शरम लपविण्यासाठी) असो, मामुली चोरी (देखाव्यासाठी) असो, उचलेगिरी (साठेबाजी वाढविण्यासाठी) असो वा लूटमारी (गरिबांच्या अन्न-वस्त्र-निवारा-शिक्षण ह्या मूलभूत गरजांवर गदा आणणारी) असो; तारतम्य हेरणे, निर्णयाची पारख करणे, भीती व मर्जी (No fear / favour) ह्याची पर्वा न करता, नि:पक्षपातीपणे, चिरस्थायी इलाज योजणे हे स्थूल व सूक्ष्म व्यवस्थापन सफल करते.

तर, तो राजा आणि त्या कोठाराचे, त्या चिमण्यांचे, त्या अभ्यास समितीचे पुढे काय झाले? त्या चोरीचे काय झाले? चोरी थांबली का? की ती कथा अजूनही आपल्या आजूबाजूला घडत तर नाही ना? अजूनही 'न संपणारी गोष्ट' सुरूच आहे का? चोर कुठे शोधत आहेत? लक्ष कुठे आहे? कोणाचे? किती? नाहीतर एक चिमणी येतच राहील, एका वेळी एकच दाणा घेऊन जाईल पण एकेक दाण्यांनी तर धान्याचे कोठार होते ना?

**- फा. (डॉ.) जोएल डिकुना**


PM SHAH GROUP
65
YEARS OF
TRUST
परंपरा। विश्वास । शुद्धता
— Since 1961 —
मानकः पथप्रदर्शकः
पिढ्यांचा विश्वास,
सोन्यातील सुरक्षित
गुंतवणूक.
PM शाहच्या सोन्यासह
तुमच्या गुंतवणूकिंची
सुरक्षा करा.
शुद्ध आणि हॉलमार्क दागिने
सुरक्षित गुंतवणूक
पिढ्यांचा विश्वास
PM SHAH
JEWELLERY
— Since 1961 —
65 वर्षाचा विश्वास. एक अमूल्य वारसा.
www.pmshah.com
pmshah_jewellers
Marine Lines: Chirabazar. Ph: 7757070763
Vasai: Ambadi Road. Ph: 7757070764
OPEN 7 DAYS A WEEK


JEWEL OF CHIRABAZAR
MK JEWELLERS
Shah & Co.™
528, Chira Bazar, Mumbai - 400 002.
Tel. 2205 6380, 2205 1124 | Fax : 022 - 2206 5421
Email : mkshahjewellers@gmail.com
HALLMARK JEWELLERY 100%
सणांचा आनंद,
आठवणींची शान,
दागिन्यांची ओळख
फक्त तुमच्यासाठी खास!
सण खास,
ऑफर खास,
दागिनही खास!
सण लाईन खास कलेक्शन
आता आपल्या आवडत्या शोरूममध्ये!
Dear Customer Please Save Our Mob No 7718019981 to your Contact List & get Daily updates of New Collection & Prices
77180 19981 | Email : mkshahjewellers@gmail.com
OUR NEW LANDMARK
Now Facing
Kalbadevi Metro Station
WE HAVE NO BRANCH AT VIRAR, VASAI & MUMBAI
Our Showroom is Very Nearby Marine Lines Station (Mumbai)
VALET PARKING

RNI MAHMAR - 11692 / 1960




हे मासिक, मालक, मुद्रक, सुवार्ता ट्रस्ट ह्यांनी मॅन्युएल प्रिन्ट, वालीव फाटा, सातिवली, ता. वसई, जि. पालघर -४०१ २०८ महाराष्ट्र येथून छापून सुवार्ता कार्यालय, जीवन दर्शन केंद्र, गिरीज, ता. वसई, जि. पालघर, जि. ४०१ २०१ येथून प्रकाशित केले. संपादक : फा. डॉ. जोएल डिकुना.